उत्सव विकासाचा
Celebration of Development

एम एम आर डी ए
MMRDA

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

## वार्षिक कार्ये कार्यक्रम २०२५-२६



**मुंबई महानगर प्रदेशात पायाभूत सुविधांच्या सर्वांगीण व समतोल विकासास कटिबद्ध ....**

# परिवहन व दळणवळण विभाग

**(अ)**

**अनुसूची**

## परिवहन व दळणवळण विभाग

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | योजना | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **(कर्ज /अग्रीम)** | | |
| १ | वाहतूकीच्या मुलभूत कामांकरीता कर्ज | १.०० | १ |
| | **एकूण** | **१.००** | |
| | **(सर्वेक्षणे, अभ्यास आणि प्रशिक्षणे)** | | |
| २ | परिवहन व इतर क्षेत्रातील सल्लागार, सर्वेक्षणे व अभ्यास | १४.०० | ३ |
| ३ | राष्ट्रीय संशोधन व प्रशिक्षण संस्था (NaMTTRI) | ०.१० | ६ |
| ४ | मुंबई मेट्रो बृहत आराखडयातील मेट्रो मार्गाचे पुनर्विलोकन व अद्यावतीकरण आणि अभ्यास | ३.१५ | ८ |
| | **एकूण** | **१७.२५** | |
| | **(प्रकल्प)** | | |
| ५ | मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प : वर्सोवा - अंधेरी - घाटकोपर (आवाज प्रतिरोध अभ्यास, इ.) | १८.०० | ११ |
| ६ | हस्तांतरण व संपादन - मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प : वर्सोवा - अंधेरी - घाटकोपर (लवाद खर्चासहीत) | २४.४० | |
| ७ | मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प : वर्सोवा - अंधेरी - घाटकोपर - होमगार्ड इमारत बांधकाम (अभियांत्रिकी) | २२.०० | |
| ८ | रेट्रो-रेफ्लेक्टीव्ह अनिवार्य, सूचनात्मक आणि सावधगिरीचे बोर्ड बसविणे | ८.५० | १३ |
| ९ | एकीकृत मुंबई महानगर परिवहन प्राधिकरणाचे अंतर्गत (UMMTA) ITS आणि इतर प्रकल्प | १.०० | १४ |
| १० | मेट्रो मार्ग ७ उन्नत पादचारी मार्गांचे बांधकाम करण्यासाठी अभियांत्रिकी संरचना, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती व प्रकल्प अंमलबजावणी. | ११७.६० | १५ |
| ११ | कांजूरमार्ग ते बदलापूर या मार्गांकरीता योग्य जलद परिवहन सेवेची अंमलबजावणी | १.०० | १६ |
| १२ | मुंबई मेट्रो स्थानकांसाठी नियोजन आणि बहु-वाहतुक एकत्रीकरण डिझाईन (आराखडा) (भू - संपादनासह) | ९०३.३० | १७ |
| १३ | पश्चिम द्रुतगती महामार्गावर प्रवेश नियंत्रण शहरी संरेखन, वाहतूक प्रणाली संरेखन तसेच मुंबईत वाढील वाहतुकीसाठी सिग्नल फ्री जंक्शन (Access control system on WEH) आणि अंमलबजावणी करणे | ०.५० | १९ |
| १४ | नरिमन पॉईंट ते कुलाबा / कफ परेडला जोडणाऱ्या पुलाची अंमलबजावणी करणे (भू - संपादनासह) | ५१.०० | २१ |
| १५ | माहुल येथे ट्रक टर्मिनलचे बांधकाम करणे | ५२.०० | २३ |
| १६ | मुंबई पारबंदर प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर मुंबई शहरातील रस्त्यांवर व जंकशनवर वाहतुकीचा प्रभाव आणि वाहतूक निवारणाचा अभ्यास करणे व अंमलबजावणी करणे | १.२५ | २४ |
| १७ | महानगर प्रदेशातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील क्षेत्रांमध्ये प्रस्तावित विविध परिवहन आणि वाहतूक योजनांची अंबलबजावणी | ३.०० | २५ |
| १८ | कुळगांव बदलापूर रेल्वे स्टेशन (SATIS) | २०.०० | २६ |
| | **एकूण** | **१२२३.५५** | |
| | **एकूण** | **१२४०.८०** | |

| परिवहन व दळणवळण विभाग -१ (कर्ज /अग्रीम) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीमधून वाहतुकीच्या मूलभूत कामांकरिता कर्ज सहाय्य.** |
| २. | चालू योजना/नवीन योजना | : | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | मुंबई महानगर प्रदेशातील विविध वाहतूक विषयक मुलभूत कामे हाती घेण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीमधून सुलभ कर्जे मंजूर करुन देणे हे या योजनेचे उद्दीष्ट आहे. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | १९९१-९२ |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | अव्याहत योजना |
| ६. (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंत अपेक्षित कामगिरी/ | | • सन २००१: सार्वजनिक बांधकाम विभाग, रु४४.०० कोटी, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गासाठी जमीन संपादन करण्याकरीता.<br>• सन २००१: महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, रु.०.८० कोटी, जलद वाहतूक प्रकल्पाचा अभ्यास.<br>• मे, २००६, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, रु.२२३.०० कोटी, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग बांधण्याकरीता.<br>• मे, २००६, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, रु.३०२ कोटी, मुंबईतील उड्डाणपूल बांधण्याकरीता.<br>• सन २००७-०८ मध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कर्जाच्या अटींची पूर्तता आणि करारनाम्यावर स्वाक्षरी केल्यानंतर रु. १२२.४४ कोटी देण्यात आले व रु.३०२.५६ कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ / सार्वजनिक बांधकाम विभाग यांना देण्यात आलेल्या इतर कर्जाच्या पतरफेडीतून वळते करण्यात आले.<br>• सन २००८-०९, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ रु. ४००.०० कोटी, अल्प मुदती-करिताचे कर्ज दि. २४/०६/२००९ रोजी रु.२००.०० कोटी पतरफेड केली व उर्वरित रु.२००.०० कोटीची परतफेड दिनांक ४ ऑक्टोबर, २०११ रोजी केली.<br>• सन २००८-०९, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, रु.५००.०० कोटी, दिर्घ मुदती-करिताचे कर्ज, वितरीत कर्ज रु.१३७.४५ कोटी.<br>• सन २००८-०९, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने रु. ५०० कोटी दिर्घ मुदती करिताचे वितरीत रु. १३७.४५ कोटी रकमेपैकी दि. २१ सप्टेंबर २०१५ रोजी रु. १३७.४५ कोटी रुपये परतफेड केली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • एस्क्रो लेखा खाते उघडण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर.<br>• इतर अटींची पूर्तता करण्यासाठी पाठपुरावा चालू.<br>• सन १९९७ -९८ सार्वजनिक बांधकाम विभाग – महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, रु, ८१.६५ कोटी, परतफेड रु. ५२५ कोटी, कर्जाच्या रक्कमेतून वळती करण्यात आली.<br>• सन २००९-१० नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम, रु. २० कोटी, १८० बस गाडया खरेदीकरीता कर्ज- सदर कर्जाची परतफेड पूर्णपणे करण्यात आलेली आहे. |
| ६ (ब) | २०२५-२०२६ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | १) त्या व्यतिरिक्त सर्वंकष परिवहन अभ्यासामध्ये नमूद करण्यात आलेल्या विविध परिवहन व वाहतूक प्रणालींची सुधारणा करण्यासाठी दिलेल्या प्रस्तावांची पूर्तता करण्यासाठी विविध शहरी स्थानिक संस्था, महानगरपालिकांना पालिकांकडून येणाऱ्या वाहतूक विषयक प्रस्तावांची पात्रता तपासून कर्ज सहाय्य उपलब्ध करणे.<br>२) वाहतूक व्यवस्थेसाठी योग्य रचना तयार करण्यासाठी शहरी स्थानिक संस्थांना परिवहन उपक्रम राबविण्यासाठी सहाय्य करणे.<br>३) विविध वाहतूक संस्थांना बस सेवा आणि प्रवासी माहिती प्रणालीमध्ये सुधारणा करणे, तसेच बससेवा खरेदी करण्यासाठी सुलभ कर्ज सहाय्य पुरविणे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **१.००** | **१.००** | **१.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | | **सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक परिवहन उपक्रम (PTOs).आणि स्थानिक स्वराज्य संस्था (Urban Local Bodies)** |

| परिवहन व दळणवळण विभाग -२ (सर्वेक्षणे, अभ्यास आणि प्रशिक्षणे) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **परिवहन क्षेत्रातील सर्वेक्षणे, अभ्यास आणि प्रशिक्षणे** |
| २. | चालू योजना/नवीन योजना | : | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | या योजनेअंतर्गत वाहतूक क्षेत्रातील प्रकल्पांच्या आखणीसाठी आवश्यक असलेली सर्वेक्षणे आणि अभ्यासकार्य या स्वरूपाच्या कामांचा मुख्यत: समावेश आहे. तसेच यामध्ये इतर संस्थांनी/विभागांनी सुरु केलेल्या अभ्यासकार्यामध्ये सहभागी होणे आणि यापूर्वीच मान्यता मिळालेल्या योजनांचा व प्रकल्पांचा पाठपुरावा करणे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. यामध्ये खालील योजनांचा समावेश होईल -<br>**अ) मुलभूत सांख्यिकी आकडेवारी अंक:**<br>"मुंबई महानगर प्रदेशाकरिता परिवहन व दळणवळण विषयक मुलभूत सांख्यिकी आकडेवारी" या नियतकालीकाचे प्रकाशन.<br>**ब)मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक, परिवहनव्यवस्थापन सर्वेक्षण, अभ्यास आणि इतर संकिर्ण कामे :**<br>सर्वंकष परिवहन अभ्यासानुसार मुंबई नागरी पायाभूत सुविधा आणि इतर पायाभूत सुविधांची अंमलबजावणी करतेवेळी वाहतूक आणि परिवहन सर्वेक्षणाची कामे वेळोवेळी हाती घेणे आवश्यक असते. उक्त सर्वेक्षणे आवश्यकतेनुसार हाती घेण्यात येतील. मुंबई महानगर प्रदेशातील विविध योजनांच्या/ प्रकल्पांच्या वाहतूक व्यवस्थापन योजना व परिवहन विषयक दृष्टीकोन वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार आवश्यक ते सर्वेक्षण व अभ्यास कार्य हाती घेतले जातील.<br>**क)** प व द विभागातील अधिकारी कर्मचारी यांना विविध प्रशिक्षणे, कार्यशाळा व तत्सम कार्यक्रमांसाठी निर्देशित करणे. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | एप्रिल १९७६. |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | : | अव्याहत योजना. |
| ६. (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंत अपेक्षित कामगिरी | : | **(अ) मुलभूत सांख्यिकी आकडेवारी अंक-**<br>"मुंबई महानगर प्रदेशाकरीता परिवहन व दळणवळण विषयक मुलभूत सांख्यिकी आकडेवारी" चा२० वा अंकप्रकाशित झाला आहे. या अंकामध्ये मुंबई महानगर प्रदेशातील परिवहन व दळणवळण विषयक भविष्यकाळातील स्वरुप व अद्ययावत स्थिती विषद करण्यात आलेली असून मुंबई मेट्रो बृहत् आराखडा व मोनोरेल मार्गाचे नकाशे या अंकात प्रकाशित करण्यात |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | येतील. मुंबई महानगर प्रदेशातील पर्यावरण विषयक सांख्यिकी माहिती देखील या अंकात देण्यात आली आहे.२१वा अंक तयार करण्याच्या कामाची सुरुवात पुढील वित्तीय वर्षे २०२५-२६ पासून करण्यात येणार आहे. २१ व्या अंकात देखील परिवहन व दळणवळण विषयक सांख्यिकी माहिती अद्यावत करण्यात येईल. तसेच या अंकामध्ये मुंबई महानगर प्रदेशातील पर्यावरणविषयक सांख्यिकी माहिती विस्तृतपणे प्रकाशित करण्यात येईल. **याकरीता रुपये २०.०० लाखांचा अंदाजित खर्च अपेक्षित आहे.**<br>**(ब)मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक, परिवहनव्यवस्थापन सर्वेक्षण, अभ्यास आणि इतर संकिर्ण कामे**<br>आतापर्यत खालील अभ्यास कार्ये हाती घेण्यात आले होते-<br>१) वांद्रा-कुर्ला संकुलाभोवती रस्त्यांविषयीच्या योजना,<br>२) मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाकरीता तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अभ्यास.<br>३) बहूविध (मल्टीप्लेक्सेस) संकुले व मॉल्ससाठी पार्किगच्या जागेची मागणी व रहदारींच्या खेपांचे सर्वेक्षणे.<br>४)वांद्रे कुर्ला संकुलातील वाढीव चटईक्षत्र निर्देशांकामुळे वाढणाऱ्या वाहतुकीचा अभ्यास करणे.<br>५) वांद्रे कुर्ला संकुलांन वाहतूक सुधारणा उपाययोजना.<br>६) मुंबई महानगर प्रदेशात वाहतूक मुल्यांकन अभ्यास/ वाहतुक सुधार करणे.<br>७)नरिमन पॉईट ते कुलाबा /कफ परेड ला जोडणा-या पुलासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे.<br>**ड) सॉफ्टवेअर आणि प्रशिक्षणे.**<br>१)प व द विभागातील अधिकारी कर्मचारी यांना विविध प्रशिक्षणे, कार्यशाळा व तत्सम कार्यक्रमांसाठी निर्देशित करणे.<br>२) सॉफ्टवेअर आणि प्रशिक्षण. |
| ६ (ब) | २०२५-२६ ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | : | अ)“मुंबई महानगर प्रदेशाकरीता परिवहन व दळणवळण विषयक मुलभूत सांख्यिकी आकडेवारी” चा २० वा अंक प्रकाशित केला. तसेच एप्रिल, २०२५ नंतर नविन अंकाचे काम हाती घेण्यात येईल. नविन अंकातदेखील परिवहन व दळणवळण विषयक सांख्यिकी माहिती अद्यावत करण्यात येईल. पायाभूत प्रकल्पाच्या विकास कामामधून निर्माण होणाऱ्या उत्पन्नांच्या पर्यायांचा अभ्यास, सांख्यिकी कामे. आयआयटी, मुंबईच्या मदतीने कायमस्वरुपी स्वयंचलित वाहतूक मोजणी केंद्राद्वारे वाहतूक आकारमान (Traffic |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | Volume) बाबतची माहिती संकलित करण्यात येईल. आवश्यक असलेली इतर क्षेत्रिय सर्वेक्षण आवश्यक असेल तेव्हा हाती घेण्यात येतील.ज्यावेळी आवश्यकता भासेल त्यावेळी सल्लागारातर्फे अशा काही प्रकल्पांचा विचार करण्यात येईल.<br>क) चालू कामे/ प्रस्तावित कामे -<br>१) सर्वकष परिवहन अभ्यासाचे अदयावतीकरण करणे.<br>२) मुंबई शहरात इतर महत्वाच्या रस्त्यावर स्वतंत्र बस मार्गिकेबाबत सुसाध्यता तपासणी.<br>३) शहरी हवाई रज्जू मार्ग (Urban Ropeway System) —चारकोप मेट्रो स्टेशन ते मार्वे आणि महावीर नगर मेट्रो स्टेशन ते गोराई गाव या प्रस्तावित हवाई रज्जू मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल वनिविदा दस्ताऐवज तयार करणे.<br>४) वांद्रे कुर्ला संकुलात स्वयंचलीत जलदगती परिवहन प्रणाली (Autometed Rapid Transit System) राबविण्याबरीता तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अभ्यास करणे.<br>५) मुंबई महानगर क्षेत्रात परिवहन विषयक इतर सुसाध्यता व प्रकल्प अहवाल तयार करणे.<br>६) मुंबई पारबंदर प्रकलप कार्यान्वीत झाल्यानंतर मुंबई शहरातील रस्त्यांवर व जंक्शनवार वाहतुकीचा प्रभाव आणि वाहतुक वितरणाचा अभ्यास करणे.<br>७) ठाणे ते पडघा दरम्यान उन्नत मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे<br>८) कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापुर शहरे मुंबई व नवी मुंबईशी थेट जोडण्याकरिता प्रवेश नियंत्रित महामार्ग प्रकल्पाचा (Access Controlled Highway Project) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे.<br>९) नवी-मुंबई, ठाणे शहरांचा परिसर मुंबई शहरास जोडणाऱ्या विविध प्रकल्पाचा वॉक-थ्रु (Walkhrough)तयार करणे.<br>ड) सॉफ्टवेयर्स आणि प्रशिक्षणे.<br>१) प. व द. विभागातील अधिकारी कर्मचारी यांना विविध प्रशिक्षणे, कार्यशाळा व तत्सम कार्यक्रम.<br>२)सॉफ्टवेअर आणि प्रशिक्षण. |
| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **४.०६** | **५.१२** | **१४.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| (८) | अंमलबजावणी करणारी संस्था | : | **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.** |

| परिवहन व दळणवळण विभाग -३ (सर्वेक्षणे, अभ्यास आणि प्रशिक्षणे) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **राष्ट्रीय सार्वजनिक वाहतूक प्रशिक्षण व संशोधन केंद्र National public Transport Training and Research Insitutute (NaMTTRI)** |
| २. | चालू योजना/नवीन योजना | | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | | भारत सरकारने व परिवहन विभाग, अमेरिका (DoT, USA) यांच्या बरोबर दिनांक २४ सप्टेंबर, २००७ रोजी, सार्वजनिक परिवहन व विज्ञान या क्षेत्रामध्ये परस्पर सहाय्य करण्यासाठी सहकार्य ज्ञापन (Memorandum Of Co-Operation) वर स्वाक्षरी केली. तसेच महाराष्ट्र शासनानेही व फेडरल ट्रान्सीट ॲडमिनीस्ट्रेशन (FTA) परीवहन विभाग अमेरिका यांच्याबरोबर दिनांक २९ सप्टेंबर, २००८ रोजी वरीलप्रमाणे सहकार्य ज्ञापनावर स्वाक्षरी केली. या अनुषंगाने राष्ट्रिय सार्वजनिक वाहतूक प्रशिक्षण व संशोधन केंद्राची स्थापना करणे यावर सहमती करण्यात आली. परस्पर सहकार्य व सहयोगामध्ये समाविष्ट क्षेत्र पुढील प्रमाणे :-<br>सार्वजनिक परिवहन, आंतरराष्ट्रीय परिवहन, परिवहन सुरिक्षतता, अपंग व्यक्तीसाठी परिवहन व्यवस्था, अत्याधुनिक परिवहन प्रणाली, वाहतूक व परिवहन माहिती केंद्र, सार्वजनिक परिवहनामध्ये क्षमता उभारणी व प्रशिक्षण आणि परस्पर हितसंबधीत इतर क्षेत्र. वरील विषयांचे या संस्थेमार्फत नियमितपणे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | सन २००९ |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | चालू योजना |
| ६ (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी/ | : | **NaMTTRI** अंतर्गत २००९ पासून ७ प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले असून त्यामध्ये खालील विषयांचा समावेश होतो.<br>• परिवहन योजना<br>• सुरक्षितता<br>• अद्ययावत परिवहन प्रणाली<br>• एकात्मिक भाडे पध्दती<br>• पर्यावरणाचे रक्षण<br>• ध्वनी प्रदुषण व त्यावरील नियंत्रण<br>• परिवहन पुरक विकास (TOD) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • नियोजन आणि संरचनेतील सुरक्षा एक महत्वाचा घटक<br>• दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी श्री. ॲथोनी फॉक्स, सचिव, परिवहन विभाग अमेरिका यांच्या उपस्थितीत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत खालील विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.<br>१) मेट्रो अंमलबजावणी योजना<br>२) अद्यावत शहर.<br>३) प्रकल्प मुल्यांकन आणि कार्यान्वयीत झाल्यानंतरचे मुल्यांकन |
| ६ (ब) | २०२५-२६ ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | सार्वजनिक जलद परिवहन नियोजन संकल्पना अंमलबजावणी यासंबधीचे अल्पावधी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याचे प्रयोजन आहे. तसेच मेट्रो/मोनो रेल व प्राधिकरणाशी संबंधित विषयावर प्रशिक्षण आयोजित करण्याचे प्रयोजन आहे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **०.०५** | **०.००** | **०.१०** |

| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |
|---|---|---|---|

| परिवहन व दळणवळण विभाग -४ (सर्वेक्षणे, अभ्यास आणि प्रशिक्षणे) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **मुंबई मेट्रो बृहत आराखड्यातील मेट्रो मार्गाचे पुनर्विलोकन व अद्यावतीकरण आणि सविस्तर प्रकल्प अहवाल.** |
| २. | चालू योजना/नवीन योजना | : | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | **(अ) मेट्रो मार्ग १३- घोडबंदर पुल-विरार** (२६.०० कि.मी.) - प्राधिकरणाने मेट्रो मार्ग-१३ (घोडबंदर पूल ते वसई विरार) चा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे.दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC)यांची सल्लागार म्हणून ऑगस्ट,२०१८मध्ये नियुक्ती केली असून सदर काम प्रगतीपथावर आहे. सदर अहवाल तयार होण्याकरीता सुमारे ९ महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. या मार्गाची एकूण अंदाजित लांबी २६ कि.मी. आहे. तसेच हा मेट्रो मार्ग, मेट्रो मार्ग ९, दहिसर ते मिरा-भाईदर याप्रल्पास जोडला जाईल. हा मार्ग मेट्रो मार्ग-१० (गायमुख — दहिसर) ला जोडला जाणार असून वर्सोवा चार फाटा येथे मार्ग अदलाबदलीची सुविधा उपलब्ध होणार आहे. वसई - विरार ठाणे,घोडबंदर परिसरातील रहिवाशांना या मार्गामुळे नक्कीच फायदा होईल.<br>**(ब) मेट्रो मार्ग ८- छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणारा जलद मेट्रो मार्ग :** छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतर राष्ट्रीय विमानतळाला जोडणारी जलद मेट्रो मार्गाने जोडण्याच्या दृष्टीकोनातून अंधेरी (पूर्व) - घाटकोपर - मानखुर्द - पनवेल या जलद मेट्रो मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) यांची एकस्त्रोत तत्वावर नियुक्ती करण्यात आली आहे. सदर अभ्यासासाठी रु. १.२ कोटी खर्च होणार असून मसूदा अहवाल मार्च, २०२० मध्ये प्राधिकरणास सादर करण्यातआले आहे. सदर प्रकल्पाचा मसुदा सविस्तर प्रकल्प अहवाल सिडको लिमीटेड यांना हस्तांतरण करण्यात आला असुन, यापुढील सदर प्रकल्पाची योग्य ती अंमलबजावणीची कार्यवाही सिडको लिमिटेड मार्फत करण्यात येईल.<br>**(क)** मेट्रो मार्ग -५ चा विस्तार दुर्गाडी (कल्याण) ते उल्हासनगर या मार्गासाठी योग्यत्या सार्वजनिक वाहतूक (Transit) प्रणाली साठी तांत्रिक व आर्थिक (Techno-Economic) सुसाध्यता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्याचे काम प्रगती पथावरआहे.<br>**(ड) मेट्रो मार्ग १४ - कांजूरमार्ग-बदलापूर मेट्रो कांजूरमार्ग — ऐराली -शिळफाटा-कटाई-बदलापूर मेट्रो प्रकल्प :**<br>कांजूरमार्ग ते बदलापूर मेट्रो प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार मेट्रो करण्यासाठी मे. मिलान मेट्रो, इटली यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. सल्लागारांनी काजूरमार्ग ते बदलापूर मेट्रो मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल डिसेंबर २०२१ मध्ये प्राधिकरणास सादर केला. सदर मेट्रो मार्गाची एकूण लांबी ३७.९ कि.मी असून त्यामध्ये एकूण १५ मेट्रो स्थानके प्रस्तावित आहेत. तसेच सदर मेट्रो प्रकल्पाची किंमत सुमारे १५ हजार कोटी इतकी आहे.<br>सदर मार्गिकेचा सविस्तर मसुदा प्रकल्प अहवाल तयार करुन प्राधिकरणांस माहे डिसेंबर, २०२१ ला प्राधिकरणास सादर केला असून सदर मसुदा प्रकल्प अहवाल सुक्ष्म पुनरावलोकन (Peer review) करण्यास भारतीय प्रौद्योगिक संस्थान IIT, Bombay मुंबई हयांची नियुक्ती करण्यास आली असून हयांना अहवाल प्राधिकरणास सादर केला आहे. त्यास अनुसरून सल्लागारांमार्फत अंतिम अहवाल लवकरच सादर करणे अपेक्षित आहे. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | | (अ) मुंबई मेट्रो बृहत आराखडयातील मेट्रो मार्गांचे पुर्नविलोकन व अद्यावतीकरण (११८ कि.मी ) (सविस्तर प्रकल्प अहवाल बनविणे) - मे, २०१५<br>(अ) ऑगस्ट २०१८<br>(ब) सप्टेंबर २०१६<br>(क) जानेवारी २०१८<br>(ड) जानेवारी २०२० |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | (अ) जानेवारी २०२५<br>(ब) मे, २०१९<br>(क) मार्च, २०२५<br>(ड) मार्च,२०२५ |
| ६ (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंत अपेक्षित कामगिरी/ | | (अ) सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.<br>(ब) सल्लागारामार्फत सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्राधिकरणाची मान्यता प्राप्त करणे.<br>(क) सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम चालू आहे. योग्य त्या सार्वजनिक वाहतूक (Transit) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्रणालीसाठी तांत्रिक व आर्थिक (Techno-Economic) सुसाध्यता आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असून सल्लागार नियुक्त करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सल्लागार नियुक्त झाल्यानंतर सदर काम चालू केले जाईल.<br>(ड) कांजुरमार्ग ते बदलापूर मेट्रो रेल्वे ने जोडण्यासाठी प्राधिकरणाने मे. MM SPA या इटालियन संस्थेस सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास माहे मे २०१९ मध्ये नियुक्त केले आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून मसुदा अहवाल माहे मार्च, २०२१ मध्ये प्राप्त झाला आहे. सद्यस्थितीत आ.इ.टी., मुंबई द्वारे मेट्रो लाईन ४ चे पीअर रिव्हीयचे करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर मेट्रो मार्गाची एकुण लांबी ३७.९ कि.मी असुन त्यामध्ये एकुण १५ मेट्रो स्थानके प्रस्तावित आहेत. तसेच सदर मेट्रो प्रकल्पाची किंमत सुमारे १५ हजार कोटी इतकी आहे |
| ६ (ब) | २०२५-२६ प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | (अ) सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.<br>(ब) सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. योग्य त्या सार्वजनिक वाहतूक (Transit) प्रणालीसाठी तांत्रिक व आर्थिक (Techno-Economic) सुसाध्यता आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असून सल्लागार नियुक्त करण्याचे काम प्रगती पथावर आहे. सल्लागार नियुक्त झाल्यानंतर सदर काम चालू केले जाईल.<br>(क) सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.<br>(ड)सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. |

७. **अंदाजित खर्च-२०२५-२६** **(रुपये कोटीत)**

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **४.४५** | **३.३६** | **३.१५** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| परिवहन व दळणवळण विभाग -५ (प्रकल्प) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **मुंबई मेट्रो रेल प्रकल्प मार्ग – १: वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्ग** |
| २. | चालू योजना/नवीन योजना | | **चालू योजना** |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | | ➢ **अ)** शासन निर्णय दिनांक १९ ऑगस्ट, २००४ नुसार महाराष्ट्र शासनाने वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्ग - १ प्रकल्पास मान्यता दिली आहे. सदर मार्गाचे काम खाजगी – सार्वजनिक समभागाचे व बांधा-वापरा-स्वामित्व घ्या व हस्तांतरीत करा या तत्वावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेचा विकास करण्याचे प्रस्तावित केले.<br>**ब)** निविदा शासनाच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये जून, २००६ च्या शासन निर्णयान्वये या प्रकल्पास मंजूरी दिली आहे. निविदाकारांनी संपूर्ण प्रकल्प खर्च रु.२३५६ कोटी ७०:३० या डेब्ट इक्वीटी प्रमाणात सादर केला आहे. यापैकी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने २६% समभागाची (Equity) भागीदारी आणि उर्वरित व्यवहार्यता तफावत निधी (Viability Gap Funding) रु.६५० कोटी इतका आहे.<br>➢ **मेट्रो रेल्वे लाईन - १ करीता सुरक्षाबल व श्वानपथक आणि स्वतंत्र अभियंता यांची उद्दिष्टे :-**<br>• मध्य व पश्चिम उपनगरांना पूर्व-पश्चिम रेल्वेने जोडणे.<br>• वर्सोवा आणि घाटकोपर मधील प्रवास वेळ कमी करुन ९१ मिनिटांवरुन २१ मिनिटांवर आणणे.<br>• महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिप्झ आणि इतर तयार होणाऱ्या व्यापारी विभागांना रेल्वेने जोडणे.<br>• अंधेरी आणि घाटकोपर उपनगर स्थानकांमधून मेट्रो स्थानकांपर्यत मार्ग बदल करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे.<br>• I.B. यांच्या सल्यानुसार मेट्रो लाईनसाठी अधिक सुरक्षिततेची आवश्यकता आहे. त्यांच्या सल्यानुसार मेट्रोरेल्वे संवेदनशील आहे. त्यामुळे मेट्रो स्थानकांमधील Entry, Exit, AFC Compound इत्यादीसाठी व डब्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षिततेची आवश्यकता आहे. त्यासाठी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येत असते. शासन निर्णय दिनांक १९ ऑगस्ट, २००४ नुसार महाराष्ट्र शासनाने वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्ग - १ प्रकल्पास मान्यता दिली आहे. सदर मार्गाचे काम खाजगी – सार्वजनिक समभागाचे व बांधा- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वापरा-स्वमित्व घ्या व हस्तांतरीत करा या तत्वावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेचा विकास करण्याचे प्रस्तावित केले. मेट्रो लाईन-१ ची कार्ये, देखभाल व दुरुस्तीकरीता स्वतंत्र अभियंता यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | २००६ – २००७ |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | दिनांक ८ जून, २०१४ पासून प्रवासी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. |
| ६. (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंत अपेक्षित कामगिरी/ | : | सदर प्रकल्प दिनांक ८ जून, २०१४ पासून प्रवासी वहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. |
| ६. (ब) | २०२५-२६ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | - |

७. **अंदाजित खर्च-२०२५-२६** **(रुपये कोटीत)**

| **एकूण अंदाजित खर्च** | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **मागील वर्ष २०२४-२५ अंदाज** | **२०२४-२५ सुधारीत अंदाज** | **२०२५-२६ अंदाज** |
| प्रकल्प खर्च | | १७.०० | १७.०० | १८.०० |
| हस्तांतरण व संपादन | | ४७००.०० | १००.०० | २४.४० |
| होमगार्ड इमारत बांधकाम | | १५.०० | १५.०० | २२.०० |
| देखभाल व संचालन खर्च | | ७७.०० | २०.०० | २२.०० |
| **एकुण** | | **४८०९.००** | **१५२.००** | **८६.४०** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | विशेष हेतू वाहन (SPV) / मुंबई मेट्रो वन प्रा. लि. कंपनी./मुं.म.प्र.वि.प्रा. |

* MMOPL has file petition for execution of the metro-१ arbitral award amounting toRs. ९९५ Cr. MMRDA has in turn filed petition under section ३४ for stay of the award& The petition is being heard, MMRDA may be required to deposit and amount of Rs. १००० Cr. If ordered by the High Court.

| परिवहन व दळणवळण विभाग -६ (प्रकल्प) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **पुर्व/पश्चिम द्रुतगती महामार्गावर सायन ते ठाणे (माजीवाडा जन्शन) माहिम ते दहिसर/वांद्रे कर्ला संकूल/वडाला ट्रक ट्रमिनल व ओशिवरा व्यापारी केंद्रामधील व सभोवताली रेट्रोरिपलेक्टीव अनिवार्य, सुचनात्मक आणि सावधगीरीचे बोर्ड बसविणे.** |
| २. | चालू /नवीन योजना | : | **चालू योजना** |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामार्फत पश्चिम द्रुतगती महामार्गावर वाहतुक दिशा दर्शक आणि लेन मार्किंगची अंमलबजावणी करण्याचेनियोजित असून सदर दिशा दर्शक चिन्हांमुळे पश्चिम द्रुतगतीमार्गावरील होणाऱ्या अपघात कमी होऊन प्रवाशांना वाहतूक संबंधीत नियमांचा बोध होऊन महामार्गावरील वाहतूक सुरळीत पार पडण्यास मदत होईल. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | रोड मार्किंग :- मे, २०२०<br>दिशा दर्शक फलक :- नोव्हेंबर, २०२० |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | रोड मार्किंग :- फेब्रुवारी, २०२१.<br>दिशा दर्शक फलक:- एप्रिल, २०२२.<br>देखभाल :- एप्रिल, २०२६ |
| ६. (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी/ | : | पश्चिम द्रुतगती महामार्गवर वाहतूक दिशा दर्शक चिन्हे आणि लेन मार्किंग ची अंमलबजावणी करण्यासाठी निविदा दस्ताऐवज प्रक्रियाकरून कंत्राटदाराची नियुक्ती करणे. |
| ६ (ब) | २०२५-२६ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | १) सदर प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. |

| ७. | **दाजित खर्च -२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **१०.५०** | **१०.५०** | **८.५०** |

| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **परिवहन व दळणवळण विभाग -७ (प्रकल्प)** | | | |
| १. | योजनेचे नाव | : | **एकीकृत मुंबई महानगर परिवहन प्राधिकरणाचे (UMMTA)अंतर्गत करावयाची कामे.** |
| २. | चालू योजना/नवीन योजना | : | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | - |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | अ. जुलै,२०१७<br>ब. मार्च, २०१७ |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | अव्याहत योजना |
| ६ (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२५ पर्यंत अपेक्षित कामगिरी/ | : | - |
| ६ (ब) | २०२५-२०२६ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | : | अ) (१) निविदा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.<br>(२) एकात्मिक तिकीट प्रकल्पाच्या अंमलबजावणीस सुरुवात.<br>ब) कुशल परिवहन प्रणालीची अंमलबजावणी करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **०.५०** | **०.५०** | **१.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

| परिवहन व दळणवळण विभाग -८ (प्रकल्प) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **मेट्रो मार्ग ७ च्या स्थानकांसाठी उन्नत पादचारी मार्गांचे बांधकाम करण्यासाठी सविस्तर अभियांत्रिकी संरचना तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती व प्रकल्प अंमलबजावणी करणे.** |
| २. | चालू /नवीन योजना | : | **चालू योजना** |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदि‌दष्टे. | : | मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामार्फत सदर प्रकल्पाची अंमलबजावणी (EPC) तत्त्वावर करण्याचे प्रस्तावित आहे. त्याप्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी टप्प्या-टप्प्याने सुरू करण्यात आली आहे. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | डिसेंबर, २०२१ |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | मार्च, २०२६ |
| ६. (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामार्फत सदर प्रकल्पासाठी सविस्तरअभियांत्रिकीसंरचनातसेचप्रकल्पव्यवस्थापनसल्लागार नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच इ-निविदा मागाऊन अंमलबजावणीकरिता टप्पा १ व २ साठी नियुक्ती करण्यात आलेली आहे. ८०% काम पूर्ण झाले आहे. |
| ६ (ब) | २०२५-२६ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | टप्पा १ व २ आणि ३ ची अंमलबजावणी सुरु आहे व टप्पा ३ च्या उर्वरित कामासाठी कंत्राटदाराची नियुक्ती केलेली असून अंमलबजावणीस सुरूवात झालेली आहे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **७२.१०** | **७२.१०** | **११७.६०** |

| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
|---|---|---|---|

| परिवहन व दळणवळण विभाग -९ (प्रकल्प) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **कांजूरमार्ग ते बदलापूर या मार्गाकरीता योग्य जलद परिवहन सेवेची अंमलबजावणी करण्याबाबत.** |
| २. | चालू योजना/नवीन योजना | : | **चालू योजना** |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामार्फत सदर प्रकल्पाची अंमलबजावणी (PPP) तत्त्वावर ई-निविदा प्रस्ताव मागविण्यात येईलआणि Concessioner ची नियुक्ती करण्यात येईल. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | फेब्रुवारी, २०२० |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | मार्च, २०२६ |
| ६. (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२३ पर्यंतची अपेक्षित कामगिरी/ | : | सदर मार्गाचा प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम चालू असून सदर मार्गाच्या अंमलबजावणीसाठी जून, २०२४ निविदा प्रस्ताव मागविण्याचे अपेक्षित आहे. |
| ६ (ब) | २०२३-२४ ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | सदर मार्गाच्या अंमलवजवणी साठी Concessioner ची नियुक्तीकरणे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीची सुरवात करणे. कांजुरमार्ग ते बदलापूर मेट्रो रेल्वे ने जोडण्यासाठी प्राधिकरणाने मे. MM SPA या इटालियन संस्थेस सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास माहे मे २०१९ मध्ये नियुक्त केले आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून मसुदा अहवाल माहे मार्च, २०२१ मध्ये प्राप्त झाला आहे. सद्यस्थितीत आ.इ.टी., मूंबई द्वारे मेट्रो लाईन ४ चे पीअर रिव्हीवचे करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **३.३०** | **३.३०** | **१.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| परिवहन व दळणवळण विभाग - १० (प्रकल्प) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **मुंबई मेट्रो स्थानकांसाठी नियोजन आणि बहु-वाहतूक एकत्रीकरण डिझाईन (आराखडा) (भू-संपादनासह) (Planning and Design of Multimodal Integration at stations of Metro Lines.)** |
| २. | चालू योजना/नवीन योजना | : | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त व र्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | अ) मेट्रो मार्ग २ अ : दहिसर-डि.एन.नगर आणि ७ : अंधेरी-दहिसर<br>ब) मेट्रो मार्ग २ ब : डी.एन.नगर ते मंडाळे<br>क) मेट्रो मार्ग ४ : वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासार वडवली<br>ड) मेट्रो मार्ग ६: स्वामी समर्थ नगर-विक्रोळी<br>इ)मेट्रो मार्ग ७A&९ : दहिसर-मिराभाईंदर; अंधेरी ते छ.शि.म.आं.विमानतळ<br>फ) मेट्रो मार्ग ५ :ठाणे भिवंडी कल्याणउद्दीष्टे -<br>१. मेट्रो स्थानक प्रभावित क्षेत्रामधील पादचारी व वाहतूक रहदारीचे नियोजन.<br>२. पायाभूत सुविधा सुधारणा.<br>३. मेट्रो स्थानक क्षेत्राचे सुशोभिकरण.<br>४. मेट्रोतील प्रवाशांना आपल्या निश्चित जागी पोहचण्यासाठी सार्वजनिक वाहतूक मार्गाचे नियोजन.<br>या कामाच्या अंमलबजावणीसाठी सामग्री प्रमाण अंदाज व निविदा दस्ताऐवज बनवणे. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | अ) ५ नोव्हेंबर , २०२०<br>ब) जानेवारी,२०२४ (अभ्यास : जाने-२०२२)<br>क) एप्रिल, २०२१ (अभ्यास)<br>ड) फेब्रुवारी, २०२०<br>इ) डिसेंबर, २०२१ (अभ्यास)<br>फ) जानेवारी २०२३ |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | अ) २५ नोव्हेंबर , २०२२ मेट्रो मार्ग - २अ<br>ब) एप्रिल, २०२५- मेट्रो मार्ग - २ब<br>क) मार्च, २०२६- मेट्रो मार्ग - ४<br>ड) डिसेंबर, २०२० - मेट्रो मार्ग - ६<br>इ) मार्च, २०२६ - मेट्रो मार्ग - ७अ<br>फ) डिसेंबर २०२५ - मेट्रो मार्ग — ५ |
| ६.(अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२३पर्यंत अपेक्षित कामगिरी/ | | अ) सदर काम मेट्रो मार्ग २अव ७ वर सुरू झाले असून ९०% काम पूर्ण झाले आहे.<br>ब) अंतिम अहवाल सादर करण्यात आला असून कामाची अमंलबजावणी करण्याकरिता कंत्राटदार नियुक्ती करण्यात |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आले आहे.<br>क) कंत्राटदार नियुक्तीचे काम प्रगतीपथावर आहे.<br>ड) सल्लागार नियुक्तीचे काम सुरु आहे<br>इ) स्थापत्य काम प्रगती पथावर आहे.<br>फ) सल्लागाराचे काम सुरु आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ (ब) | २०२४-२५ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | अ) कंत्राटदार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराद्वारे स्थापत्य कामे करणे व मेट्रो मार्ग २अ ७ च्या कामाबरोबर पूर्ण करणे.<br>ब) कंत्राटदाराची नियुक्ती करण्याकरीता निविदा मागविण्यात आल्या असुन कंत्राटदार नियुक्त करण्यात आली आहे (४ पॅकेजमध्ये).<br>क) आराखडाअंतिमकरूनकंत्राटदाराचीनियुक्तीकरणे.<br>ड) सल्लागार नियुक्ती करून निविदा दस्ताऐवज तयार करणे<br>इ) स्थापत्य कामे प्रगतीपथावर आहेत.<br>फ) संकल्प चित्र/ आराखडा बणविण्यासाठी सल्लागार नियुक्तीचे काम चालू आहे. |
| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| **७८०.००** | **७८०.००** | **९०३.३०** |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

| परिवहन व दळणवळण विभाग -११ (प्रकल्प) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **पश्चिम द्रुतगती महामार्गावर प्रवेश नियंत्रण शहरी संरेखन, वाहतूक प्रणाली संरेखन तसेच मुंबईत वाढील वाहतुकीसाठी सिग्नलफ्री जंक्शनसुधारणा (Access Control System On WEH)आणि अंमलजावणी करणे.** |
| २. | चालू /नवीन योजना | : | **चालू योजना** |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | पश्चिम द्रुतगती महामार्ग हा मुंबई शहरातील महत्त्वपूर्ण मार्ग असून या मार्गाचा प्रारंभ दक्षिणेस स्वामी विवेकानंद मार्गावरील (S.V.Road) माहिम जंक्शन पासून होऊन उत्तरेस दहिसर टोलनाक्यास संपतो. सदर मार्गाची एकूण लांबी २५.३३ कि.मी. असून रुंदी ६१ मी. ते ७२ मी. एवढी आहे. पश्चिम द्रुतगती महामार्गावर सुमारे ३ लाख वाहने दररोज ये-जा करत असून वाहनधारकांना वाहतूक कोंडी, वेळेचा अपव्यय, प्रदुषण व इंधनाचा अपव्यय इ. समस्यांना सामोरे जावे लागत आहे.<br><br>सद्यस्थितीत, पश्चिम द्रुतगती मार्गावर स्थानिक व लांब पल्ल्याची वाहतूक एकमेकास दुभंगत होत असल्यामुळे वाहतूकीची कोंडी निर्माण होते त्यासाठी स्थानिक रहदारी व लांब पल्ल्यांच्या वाहतुकीला नियंत्रित व वेगळे करणे अत्यंत गरजेचे आहे. या समस्येवर मात करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे. त्यासअनुसरुन प्राधिकरणाने प्रस्तावित काम आरेखित केले असून भविष्यात वाहतूक कोंडीची समस्या नियंत्रित करण्याचा प्रस्ताव आहे. वरील हेतू साध्य करण्यासाठी व परिवहन सेवेमधील सुनिच्छित उपाय योजना तयार करुन पश्चिम द्रुतगती मार्ग हा पूर्णत: नियंत्रित प्रवेश मार्ग (Access Control) करण्याच्या उद्देशाने प्राधिकरणाने माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये मे. लुईस बर्जर कन्सलटंसी प्रा. लि. या जागतिक सल्लागाराला दीर्घकालीन उपाययोजना तयार करण्यासाठी तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अभ्यास आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता नियुक्त करण्यात आले आहे. या अभ्यासांतर्गत खालील वाहतूक उपयांची अंमलबजावणी करण्यात आली आहे.<br>१) कलानगर जंक्शन येथील वाहतूक बेटांचे सुशोभिकरण.<br>२) कलानगर ते वाकोला दरम्यान दुतर्फा सायकल ट्रक, पदपथाची अंमलबजावणी करणे. |
| ४ | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | | पश्चिम द्रुतगती महामार्गावरील कलानगर जंक्शनचे सुशोभिकरण आणि विकास योजनेच्या प्रारंभाची तारीख डिसेंबर २०२१ काम पूर्ण होण्याची तारिख सप्टेंबर, २०२२. या कामांची निवीदा प्रक्रियेचे काम पूर्ण झाले असून कंत्राटदार निवडण्यात आला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे | | पश्चिम द्रुतगती महामार्गावरील **सायकल ट्रॅक पदपथ सुशोभीकरण आणि पादचारी सुविधांचासमावेश** करण्यासाठी मुख्य रस्ता सेवा रस्त्यामधील विभाजकाची पुर्ररचना आणि नूतनीकरण करणे टप्पा -१ कलानगर ते वाकोला योजनेच्या प्रारंभाची तारीख जानेवारी २०२२ काम पूर्ण होण्याची तारिख सप्टेंबर, २०२२. या कामांची निवीदा प्रक्रियेचे काम पूर्ण झाले असून कंत्राटदाराची निवड केली असून काम पूर्ण झाले आहे. |
| ६ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | ऑगस्ट, २०१९ |
| ७ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | मार्च, २०२४ |
| ८. (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी/ | : | सदर अभ्यासाचा तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अभ्यास अहवाल आणि सविस्तर प्रकल्प अहवाल प्राधिकरणाला सन २०२० मध्ये सादर करण्यात आला आहे.<br>१) कलानगर जंक्शनचे १००% काम पूर्ण झाले आहे.<br>२) कलानगर ते वाकोला सायकल ट्रॅकचे १००% काम पूर्ण झाले आहे. |
| ८ (ब) | २०२५-२६ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | १) सदर प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. |

| ९. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **०.००** | **०.००** | **०.५०** |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| परिवहन व दळणवळण विभाग -१२ (प्रकल्प) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | नरिमन पॉईंट ते कुलाबा/कफ परेडला जोडणा-या पुलाची अंमलबजावणी करणे. |
| २. | चालू /नवीन योजना | : | **चालू योजना** |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | नरिमन पॉईंट येथून कुलाब्याला जाण्याकरिता कॅप्टन प्रकाश पेठे हा एकमेव मार्ग अस्तित्वात आहे. सदर मार्गिकेमध्ये प्रचंड वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना वारंवार होणा-या वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. सदर मार्गिकेवरील वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा प्रचंड वेळ वाया जात आहे.<br>दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करुन प्रवाशांच्या सुखद आणि जलद प्रवासासाठी प्राधिकरणाने नरिमन पॉईंट ते कुलाबा हा नविन पूल उभारणी प्रकल्प हाती घेतला आहे. त्यास अनुसरुन सल्लागारानी सदर प्रस्तावित प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अभ्यासाचा अंतिम अहवाल प्राधिकरणास माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये सादर केला.<br>नरिमन पॉईंट ते कुलाबा पुलाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्राधिकरणाने हाती घेतले असून यामध्ये (समुद्रातील) पर्यावरण, जैव विविधता, सामाजिक परिणाम मुल्यांकन (SIA) इ. बाबतचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. नरिमन पॉईंट ते कुलाबा नवीन पुल प्रकल्पामुळे मच्छीमार बांधवाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नसून त्यांच्या बोटी ये-जा करण्याकरिता कोणताही अडथळा निर्माण होणार नाही यांची काळजी घेऊनच सदर पूलाची संरचना करण्यात येणार आहे. तसेच समुद्रातील जैविकतेचा अभ्यास देखील सदर अभ्यासात करण्यात आला आहे. नरिमन पॉईंट ते कुलाबा नवीन पुलामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवासाच्या वेळेत बचत होणार आहे.<br>नरिमन पॉईंट ते कुलाबा/ कफ परेड ला जोडणा-या पुलाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असणा-या अंदाजीत खर्च रु. ३५३ कोटीस प्राधीकरणाच्या १५१ व्या बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | एप्रिल २०२४ |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित | | एप्रिल २०२८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | तारीख. | | |
| ६. (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी/ | : | नरीमन पॉईंट ते कुलाबा दरम्यान पुलाची अंमलबजावणी करण्यासाठी मे. स्पेक्ट्रम टेक्नो कन्सल्टंटस या सल्लागारामार्फत तांत्रिक आर्थिक सुसाध्यता अभ्यास पुर्ण झाला आहे. व सविस्तर प्रकल्प अहवाल सुध्दा सादर करण्यात आला आहे. |
| ६ (ब) | २०२५-२६ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | नरिमन पॉईंट ते कुलाबा/कफ परेडला जोडणा-या पुलाची अंमलबजावणी करणे. |

| | | |
|---|---|---|
| ७. **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१००.५४** | **१००.००** | **५१.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| परिवहन व दळणवळण विभाग -१३ (प्रकल्प) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **माहुल येथे ट्रकटर्मिनल चे बांधकाम करणे** |
| २. | चालू /नवीन योजना | : | **चालू योजना** |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | माहुल येथे ट्रकटर्मिनल चे बांधकाम करणे |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | ०१/०२/२०२३ |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | अपेक्षित: ३१/१२/२०२५ |
| ६. (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | सल्लागारामार्फत मसुदा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला आहे. |
| ६ (ब) | २०२५-२६ ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | सल्लागारामार्फत मसुदा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला आहे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१.००** | **१.००** | **५२.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| परिवहन व दळणवळण विभाग -१४ (प्रकल्प) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | मुंबई पारबंदर प्रकल्प (MTHL) कार्यान्वित झाल्यानंतर मुंबई शहरातील रस्त्यांवर व जंक्शनवर वाहतुकीचा प्रभाव आणि वाहतुक विकिरणचा (Dispersal) अभ्यास करणे वअंमलबजावणीकरणे. |
| २. | चालू /नवीन योजना | : | **चालू योजना** |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | मुंबई पारबंदर प्रकल्प (MTHL) कार्यान्वित झाल्यानंतर मुंबई शहरातील रस्त्यांवर व जंक्शनवर वाहतुकीचा प्रभाव आणि वाहतुक विकिरणचा (Dispersal) अभ्यास करणे वअंमलबजावणीकरणे. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | प्रत्यक्ष: २७/०९/२०२२ |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | अपेक्षित: ३१/०३/२०२५ |
| ६. (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | अल्पकालीन प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केला असून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर सदर प्रस्ताव अंमलबजावणीसाठी निविदा मागविण्यात येतील.<br>दीर्घकालीन प्रस्तावास मान्यता मिळाल्यास सविस्तर प्रकल्प अहवाल नियुक्त केलेल्या सल्लागारामार्फत तयार करण्याचे प्रस्तावित आहे. |
| ६ (ब) | २०२३-२४ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | सदर अभ्यासाच्या अनुषंगाने अल्पकालीन प्रस्ताव आणि दीर्घकालीन प्रस्ताव प्रस्तावित करणे आहे. |

| ७. **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१.००** | **१.००** | **१.२५** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| परिवहन व दळणवळण विभाग -१५ (प्रकल्प) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | महानगर प्रदेशातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील क्षेत्रांमध्ये प्रस्तावित विविध परिवहन आणि वाहतूक योजनांची अंबलबजावणी |
| २. | चालू /नवीन योजना | : | **चालू योजना** |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | सदर क्षेत्रातील पारिवहन वाहतूक सेवेचा दर्जा सुधारणा आणि या क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या लोकांचा राहणीमानाचा दर्जा वाढविणे. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | डिसेंबर २०२१ |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | ३१ मार्च २०२७ |
| ६. (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी/ | : | - |
| ६ (ब) | २०२५-२६ची प्रत्यक्षकामगिरी / उद्दीष्टे | | सदर क्षेत्रातील पारिवहन वाहतूक सेवेचा दर्जा सुधारणा आणि या क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या लोकांचा राहणीमानाचा दर्जा वाढविणे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१.००** | **१.००** | **३.००** |

| परिवहन व दळणवळण विभाग -१६ (प्रकल्प) | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | कुळगाव बदलापूर रेल्वे स्थानका लगत (SATIS) प्रकल्प. |
| २. | चालू योजना/नवीन योजना | : | **नवीन योजना** |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे. | : | बदलापूर शहरहे ठाणे जिल्ह्यांमधील वेगाने विकसित होणारे शहर असून, बदलापूर शहरातील लोक संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. ह्याचाच परिणाम म्हणजे शहरात उपलब्ध असणाऱ्या एकमेव सार्वजनिक परिवहन सेवा म्हणजेच बदलापूर उपनगरीय रेल्वे स्थानकांवर प्रवाशांसाची संख्याप्रचंड प्रमाणात वाढली आहे. या वाढत्या प्रवाशांना जलदगतीने पोच मार्ग व अंतिमगंतव्य स्थानकां पर्यंत पोहचण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मुंबई महानगर प्रदेशविकास प्राधिकरणाने बदलापूर उपनगरिय रेल्वे स्थानक परिसरात स्थानक परिसरवाहतूक सुधार योजनेंतर्गत नियोजन रचना आणि उपाय योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता काम हाती घेतले असून, सद्यस्थितीत प्राधिकरणामार्फत मेसर्स आकार अभिनव यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून सदर प्रकल्पाचे प्राथमिक सर्वेक्षण करण्याचे काम प्रगतीपथावर असून सदर अभ्यासाचा कालावधी हा ४ महिन्याचा आहे. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | १ जानेवारी, २०२४ |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | | ३१ डिसेंबर, २०२४ |
| ६ (अ) | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२३ पर्यंतची अपेक्षित कामगिरी/ | : | निरंक |
| ६ (ब) | २०२३-२४ ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | | परिसंरचण / प्रवेश योजनेत सुधारणा, मोड निहाय प्रवेश योग्यता प्रदान होईल, पिकअप पॉईंटकरीता योग्य व्यवस्था, फुटपाथ पुरेशा रुंदीसह उपलब्ध असतील, सुरळीत वाहतूक व्यवस्था, रोड मार्किंग / कर्बस्टोन पेंटिंग इ. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **४०.००** | **४०.००** | **२०.००** |

| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
|---|---|---|---|

## मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा - १ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजेनेचे नांव | : | मेट्रो मार्गिका – २अ (दहिसर (पु) ते अंधेरी (प.) |
| २. | चालू योजना/नविन योजना | : | चालू योजना |
| ३. | योजेनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | : | १) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीत तसेच दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५ रोजी मंत्रीमंडळाच्या झालेल्या बैठकीत ११८ कि. मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गाची त्वरीत अंमलबजावणी करण्याकरीता ₹३५,४०० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.<br>मेट्रो मार्ग-२अ योजना/प्रकल्प मंजूरी दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५, मा.पंतप्रधान भारत सरकार यांच्या शुभहस्ते भूमीपूजन दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी संपन्न.<br>२) प्रकल्पाची एकूण लांबी १८.६० कि.मी. (उन्नत) लांबीचा मेट्रो मार्गिका-२अ (दहिसर (पु) ते अंधेरी (प.) असा आहे. सदर मार्गिका हि पश्चिम रेल्वे, मार्गिका-१ व २ब (डि एन.नगर – मंडाळे), मेट्रो मार्ग-६ व मेट्रो मार्ग-७ यांना जोडले जाणार आहे. प्रकल्प पूर्ण होण्याची अपेक्षित किंमत ६,४१० कोटी (सर्व करांसहित व आयडीसी) इतकी आहे.<br>दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर प्रकल्पास राज्यशासनाची मान्यता मिळालेली आहे. तसेच, सदर प्रकल्पास ADB+NDB मार्फत वित्तीय कर्ज घेवून अंमलबजावणी केली जात आहे.<br><br>**उद्दिष्टे :**<br>१. मेट्रो मार्ग-२अ (दहिसर (पु) ते अंधेरी (प.) कार्यान्वित झाल्यानंतर सुमारे ४.०७ लाख प्रवाशांना वातानुकुलीत, सुरक्षीत, आरामदायक प्रवासाचे फायदे उपलब्ध होतील.<br>२. इंधन वापर, वाहन खर्च, प्रवासास लागणा-या वेळेमध्ये बचत होऊन रस्त्यावरील दुर्घटना, ध्वनी व वातावरणातील प्रदूषण कमी होईल.<br>३. टप्पा-१ (दहिसर (पूर्व) ते डहाणूकरवाडी) ९.०० कि.मी पूर्ण झाले असून दिनांक ०२ एप्रिल, २०२२ पासून प्रवासी वाहतूक सुरू आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ४. टप्पा-२ (डहाणूकरवाडी ते अंधेरी (प.) ९.६० कि.मी.पूर्ण झाले असून दिनांक १९ जानेवारी, २०२३ पासून सुरु करण्यात आले. |
| ४. | योजनेच्या प्रारंभाची अंदाजित/ प्रत्यक्ष तारीख | : | ₹६,४१० कोटी, दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली. |
| ५ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | : | काम पूर्ण |
| ६. | (अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२४ पर्यंत अपेक्षित कामगिरी | : | हे काम Deposit Work तत्वावर DMRC मार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे. स्थापत्य व प्रणालीचे काम १००% पूर्ण झाले आहेत.<br>१. टप्पा-१ (दहिसर (पूर्व) ते डहाणूकरवाडी) ९.०० कि.मी. पूर्ण झाले असून दिनांक ०२ एप्रिल, २०२२ पासून प्रवासी वाहतूक सुरू आहे.<br>२. टप्पा-२ (डहाणूकरवाडी ते अंधेरी (प.) ९.६० कि. मी. दिनांक १९ जानेवारी, २०२३ पासून सुरू करण्यात आले आहे. |
| | (ब) २०२५-२०२६ ची कामगिरी/उद्दिष्टे | : | निरंक |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **२००.००** | **४५७.७५** | **११७.००** |

८. योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था : मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा, मुंबई महानगर प्रदेशविकास प्राधिकरण.

# मेट्रो प्रकल्प
# अंमलबजावणी शाखा

**(ब)**

## अनुसूची

### मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा

(रुपये कोटीत)

| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | :: | महामंडळासाठी वेब ॲप्लिकेशन आणि मोबाईल ॲप्लिकेशन विकसित केले जाईल ज्यामध्ये सर्व विभागीय केंद्रीकृत डेटाबेस असतील. |

| **७.** | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | | | |
| | **IT Cell** | **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| | **Integrated Digital Delivery** | **२०.००** | **१६.४०** | **६०.००** |

**८.** योजना अंमलबजावणी करणारी संस्था : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

## मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा - १८ (प्रकल्प) IT Cell -१

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | :: | प्रादेशिक माहिती सिस्टिम (RIS) |
| २. | चालू /नवीन योजना | :: | चालू योजना. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | :: | २१ मार्च, २०११ आदेशान्वये प्राधिकरणामध्ये माहिती व तंत्रज्ञान कक्षाची स्थापना करण्यात आली. त्याच बरोबर महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये ई-गव्हर्नन्स प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली. मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने ई-गव्हर्नन्सच्या अंतर्गत हार्डवेअर व सॉफ्टवेअरची खरेदी व देखभाल, दस्ताऐवजांचे स्कॅनिंग व डिजीटायझेशन, पीएमएमएस,वेबजीआयएस, इमारतीचा आराखडा मंजूरीची योजना (Building Plan Approval System), स्मार्ट सिटी उपक्रमांचा अंतर्भाव केला असून एक्स्झीबीशन लॅन्ड बुकींग व आर.अॅन्ड आर मॉड्यूल विकसित करण्यात येतआहे. |
| ४. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | :: | २१, मार्च, २०११ |
| ५. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | :: | काम चालू |
| ६. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | :: | ई-गव्हर्नन्स अंतर्गत नवीन हार्डवेअर व सॉफ्टवेअर खरेदी केले जातात. तसेच ई-गव्हर्नन्स, ई-टेन्डरिंग, संकेतस्थळ, लोकल एरीया नेटवर्क (LAN), इंटरनेट लिझलाईन व ई-गव्हर्नन्स प्रकल्प टप्पा-२ साठी सल्लागाराची नेमणूक करण्यात येणार आहे. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | :: | अ) ई-गव्हर्नन्स : ई-गव्हर्नन्स प्रकल्पाचा टप्पा-१ प्रलंबित कामे पूर्ण करण्यात येईल.<br>ब) ईऑफिस, स्कॅनिंग व दस्ताऐवजांचे डिजीटायझेशन, इमारतीचा आराखडा मंजूरीची योजना (Building Plan Approval System), PMMS, data Centre updation Redesign websiteइ.कामे राबविण्यात येणार आहेत. |
| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **२०.००** | **१६.४०** | **१२.५०** |

८. योजना अंमलबजावणी करणारी संस्था : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

## मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा - १९ (प्रकल्प) IT Cell -३

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | :: | पायाभूत सुविधा प्रकल्प व्यवस्थापन मंच, (इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्लॅटफॉर्म) (IPMP) |
| २. | चालू /नवीन योजना | :: | नवीन योजना. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | :: | १. प्राधिकरणाच्या अखत्यारीतील मुंबईतील पायाभूत सुविधांचा विकास हा गेल्या काही वर्षा पासून एक महत्त्वाचा उपक्रमआहे. प्राधिकरणाच्या मेट्रो (प्रणाली, प्रकल्प अंमलबजावणी युनिट, कामे), अभियांत्रिकी विभाग, परिवहन आणि दळणवळण विभाग इत्यादी विभागांद्वारे काही महत्त्वपूर्ण प्रकल्प आणि उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.<br>२. याकरिता, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि डेटा-चलित उपायांचा उपयोग करून पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या व्यवस्थापनात क्रांती घडवून आणण्याची योजना आहे. सर्व प्रकल्पांसाठी मुं. म. प्र. वि. प्राधिकरणामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्लॅटफॉर्म (IPMP) लागू करून आणि विकसित करून हे साध्य केले जाऊ शकते. ज्यायोगे एककेंद्रीकृत प्लॅटफॉर्म तयार करण्यात येऊन कार्यक्षम सहयोग सक्षम होऊन प्रकल्प प्रक्रिया सुव्यवस्थित होईल. प्रभावी निर्णय घेण्यासाठी रीअल-टाइम अंतर्दृष्टी प्रदान करून एक समान प्लॅटफॉर्म कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यास मदत करेल. वापरकर्त्या स मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाच्या सिंगल डॅशबोर्डवर सर्व प्रकल्पांचे पुनरावलोकन करणे अनुकूल असेल. |
| ४. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | :: | नोव्हेंबर २०२४ |
| ५. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | :: | नोव्हेंबर २०२९ |
| ६. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | :: | N/A |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | :: | अ) प्रारंभ अहवाल तयार करणे<br>आ) आवश्यक माहिती गोळाकरणे, अभ्यासकरणे, सॉफ्टवेअर आवश्यकता तपशीलवार आणि डिझाइन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | दस्तऐवज तयार करणे आणि तपशीलवार प्रकल्पयोजना / अहवाल तयार करणे<br>इ) ऍप्लिकेशन डेव्हलपमेंट/ कस्टमायझेशन आणि प्रोडक्शन सर्व्हरवर चाचणी पहिल्या व दुसऱ्या टप्प्यासाठी पूर्ण करणे.<br>ई) पहिल्या टप्प्याच्या अंमलबजावणीसाठी डेटा डिजिटायझेशन / माइग्रेशन.<br>उ) पहिल्या टप्प्याच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.<br>ऊ) गो-लाइव्हपूर्वी ऑडिट आणि प्रमाणन करून घेणे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **१०.००** | **८.२०** | **७.५०** |

**८.** योजना अंमलबजावणी करणारी संस्था : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

# मोनोरेल प्रकल्प
# अंमलबजावणी शाखा

**(क)**

**अनुसूची**

**मोनो प्रकल्प अंमलबजावणी शाखा**

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | मोनो रेल प्रकल्प | ३४०.८५ | ६१ |
| | **एकूण** | **३४०.८५** | |

## मोनोरेल प्रकल्प अंमलजावणी शाखा – १ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | : | मोनो रेल प्रकल्प ( भू - संपादनासह) |
| २ | चालू योजना /नवीन योजना | : | चालू योजना |
| ३ | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उदिदष्टे, | : | जलद सार्वजनिक परिवहन व्यवस्थेला पूरक म्हणून अति गर्दीच्या आणि चिंचोळया भागात मोनोरेल प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २००८ रोजीच्या ११९ व्या मुंबईमहानगर प्रदेश विकास प्राधिकरण बैठकीत घेण्यात आला. अति गर्दीच्या व चिंचोळया भागात पूरकवाहतूक व्यवस्था म्हणून सध्या उपलब्ध असलेल्या बस सेवेचा सरासरी वेग हा अत्यंत कमी असल्यानेप्रवाशांना त्याचा लाभ मिळू शकत नाही. शिवाय त्यामुळे रस्त्यावरील वाहतूक कोंडीत वाढ होते. अशा भागात उन्नत मार्गावरुन धावणारी मोनोरेल ताशी सरासरी ३० कि. मी. व जास्तीत जास्त ८० कि.मी. वेगगाठू शकते. शिवाय तीव्र वळणे व चढ-उतार सहज पार करु शकते. त्यामुळेच संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर या २० कि.मी. लांबीच्या मार्गावर मुंबई नव्हे तर भारतातील पहिला मोनोरेल प्रकल्पकार्यान्वित करण्यात आला आहे.सदर प्रकल्पाची अंमलबजावणी टप्पा -१ वडाळा ते चेंबूर (८.८० कि.मी.) आणि टप्पा -२ वडाळाते संत गाडगे महाराज चौक (११.२० कि.मी.) या दोन टप्प्यात करण्यात आली. |
| ४ | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित व प्रत्यक्ष. | : | ४ नोव्हेंबर,२००८ |
| ५ | योजना पूर्ण करायचा अपेक्षित दिनांक | : | टप्पा १ - फेब्रुवारी, २०१४ प्रकल्प पुर्ण करण्यात आला आहे.<br>टप्पा २ - डिसेंबर, २०१५ प्रकल्प पुर्ण करण्यात आला आहे. |
| ६ | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५पर्यंत अपेक्षित कामगिरी/२०२५-२६ साठी वास्तव कामगिरी/उद्धीष्टे | : | मुंबई मोनोरेल प्रकल्पाचा टप्पा-१ वडाळा ते चेंबूर दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रवासीवाहतूकीकरीता खूला करण्यात आला आहे.दरम्यान, मे. लार्सन अँड टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनीरिंग, मलेशिया या समूहाकडून गैर-कामगिरी आणि कराराचे उल्लंघन झाल्याच्या कारणाने सदर कंत्राट दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी रद्दकरून मोनोरेल प्रकल्पाचे संचलन व देखभालीचे काम प्राधिकरणाने स्वतः हाती घेतले |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आहे.दरम्यान वडाळा ते संत गाडगे महाराज चौक दरम्यानचा ११.२० कि. मी लांबीचादूसरा टप्पा ४ मार्च, २०१९ पासून प्रवासी वाहतूकीकरीता खुला करण्यात आला आहे.प्राधिकरणास कंत्राटदाराकडून प्रकल्प हाती घेताना फक्त ३ गाड्या संचालनास योग्य (गाडी क्र. ४,६ व ९) आणि इतर ४ गाड्या (गाडी क्र. ५, ७, १० व ११) नादुरुस्त स्थितीत प्राप्त झाल्या आहेत.प्राधिकरणाने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये प्रकल्प हाती घेतल्यानंतर अत्यावश्यक अतिरिक्त सुटे भाग वनियमित उपयोगी येणारे साहित्य निविदे मार्फत खरेदी करून उर्वरित मोनोरेल गाड्यांची पुर्नबांधणी सुरूकेली आहे. त्याअनुषंगाने माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये ४ थी गाडी (गाडी क्र. १०) व माहे मे, २०१९ रोजी ५वी गाडी (गाडी क्र. ११) संचालनासाठी तयार करून प्राधिकरणाने २ गाड्या वापरात आणल्या आहेत. आतांपर्यत एकूण ८ गाडया संचालनासांठी चालू आहेत. तसेच मोनोरेल प्रकल्पाच्या गाड्यांची संख्या वाढविण्या करिता प्राधिकरणामार्फत १० मोनो गाड्याच्या (Rolling Stock) खरेदीकरिता प्रक्रिया चालू आहे. |
| ७ | **अंदाजित खर्च २०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| तपशिल | २०२४-२०२५ मूळ अंदाज | २०२४-२०२५ (सुधारीत) | २०२५-२०२६ अपेक्षित अंदाज |
|---|---|---|---|
| **मोनोरेल प्रकल्प खर्च** | **३६०.६४** | **६७५.३०** | **३४०.८५** |
| **लवाद खर्च** | **०.००** | **३६०.००** | **०.००** |
| **देखभाल व संचालन खर्च** | **१३२.९२** | **६०.००** | **१००.००** |
| **एकूण** | **४९३.५६** | **१०९५.३०** | **४४०.८५** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | : | मुं. म.प्र. वि. प्राधिकरण |

# अभियांत्रिकी विभाग

(फ)

# अनुसूची

## अभियांत्रिकी विभाग

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | योजना | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | वांद्रे - कुर्ला संकुलात सुधारणा व नागरी सुविधा (कलानगर उड्डाणपूलासह) | ७३.३० | ६३ |
| २ | ओशिवरा जिल्हा केंद्राची पायाभूत सुविधा कामे (भू - संपादनासह) | ३०.०० | ६७ |
| ३ | विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प राबविणे | ५२१.४७ | ६९ |
| ४ | वांद्रे-कुर्ला संकुल परिसरातील मिठी नदी मधील तरंगता मलबा ट्रॅश स्किमरच्या सहाय्याने भरती असताना काढणे व नदी पात्राच्याकडेला जमा झालेला मलबा ओहोटी असताना काढणे. | १.०० | ८० |
| ५ | वडाळा ट्रक टर्मिनल बांधकाम | ४६.०० | ८२ |
| ६ | अटल बिहारी वाजपेयी - शिवडी न्हावा शेवा अटल सेतू | ४४.०० | ८५ |
| ७ | स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारक टप्पा - १ | ५.०० | ८८ |
| ८ | पुनर्वसन व पुनर्वसाहत (R & R) देखभाल व वीज बीले | २६५.८० | ९० |
| ९ | वरळी ते शिवडी (पूर्व-पश्चिम) उन्नतमार्ग (भू - संपादनासाह) | ५७८.५० | ९३ |
| १० | मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहय क्षेत्रातील रस्ते सुधारणा | ३५.०० | ९५ |
| ११ | सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता भाग - १ व २ | ७५.०० | ९९ |
| १२ | मुंबई महानगर प्रदेशातील संवृध्दीविकास केंद्रामध्ये (ग्रोथ सेंटर) पायाभूत सुविधा निर्माण करणे (भू - संपादनासाह) | ७००.०० | १०१ |
| १३ | पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शंन, घाटकोपर (पुर्व) येथील वाहतूक सुधारणा प्रकल्प | १.०० | १०२ |
| १४ | पुर्व द्रुतगती मार्गाची देखभाल व दुरुस्ती | ८.०० | १०४ |
| १५ | पश्चिम द्रुतगती मार्गाची देखभाल व दुरुस्ती | ०.०० | १०६ |
| १६ | वडाळा भारवाहक तळ येथील नियोजित इमारतीचे बांधकाम | २.०० | १०७ |
| १७ | सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता व वांद्रा कुर्ला संकुल यांना जोडणारा ३० मी. रुंद डी.पी. रस्ता | ६.०० | १०९ |
| १८ | अंधेरी-घाटकोपर जोडरस्स्त्यावरील नरसी मेहता रस्त्यावर जागृती नगर मेट्रो स्थानकाखाली पुलाचे बांधकाम | ०.१५ | ११० |
| १९ | कलिना विद्यापीठात पायाभूत सुविधा पुरविणे | १०.०० | १११ |
| २० | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक | ४००.०० | ११४ |
| २१ | ठाणे ते बोरीवली (संजय गांधी राष्ट्रीय उद्यान) ४ पदरी भुयारी मार्ग | २६८४.०० | ११९ |
| २२ | छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (T१) आंतरराज्यीय टर्मिनल उड्डाणपुलाचे रुंदीकरणाचे बांधकाम (भू - संपादनासह) | ३.६८ | १२३ |
| २३ | छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (T२) भूयारी मार्गाचे बांधकाम व सुधारीकरण | ०.०० | १२४ |
| २४ | आत्माराम पाटील चौक (खारेगाव टोल नाका ते कळवा नाका रस्त्याचे बांधकाम) | ५०.०० | १२६ |
| २५ | मुंबई पारबंदर ते मुंबई पुणे द्रुतगती महामार्गाचे बांधकाम | ५१०.०० | १२७ |
| २६ | रायलादेवी तलावाचे संवर्धन, पुनरुज्जीवन व तलाव परिसरात सार्वजनिक उपयोगाची सुविधेची कामे करणे. | ०.५० | १२८ |
| २७ | बोरीवली – गोराई रस्त्यावर, गोराई खाडीवर पूल बांधणे (भू-संपादनासह) | ०.०० | १२९ |

| अ. क्र. | योजना | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| २८ | मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह येथून सागरी किनारा मागापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम | १८१३.४० | १३१ |
| २९ | मुंबई ठाणे व नवी मुंबई शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याबरोबरच विकास कामाच्या दृष्टीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आलेले प्रकल्प | ९९१.०० | १३३ |
| ३० | उत्तन-विरार सागरी सेतू प्रकल्प | २०००.०० | १३७ |
| ३१ | ठाणे येथील तीन हात नाका जंकशन ची सुधारणा करणे | १००.०० | १४० |
| ३२ | ठाणे येऊर डोंगररांगांच्या पायथ्याशी रास्ता | १००.०० | १४१ |
| ३३ | ता. पाटण जि सातारा येथील अतिवृष्टीहीमूळे भुसकलां बाधित झालेल्या गावांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करण्याबाबत | ९१.०० | १४२ |
| ३४ | भिवंडी - वाडा रोड राज्यमार्ग विश्वभारती नाका ते भिणार ते वडपे या रस्त्याचे बांधकाम करणे | ३५.०० | १४३ |
| ३५ | प्रादेशिक स्तरावर जलस्त्रोताचा विकास करणे (सुर्या प्रकल्प, काळु प्रकल्प,देहरजी प्रकल्प) | १६४५.०० | १४४ |
| ३६ | घनकचरा व्यवस्थापन (अंबरनाथ -बदलापूर) | ५०.०० | १५५ |
| ३७ | ठाणे घोडबंदर रस्त्यावरील गायमुख ते फाउंटन हॉटेल जंक्शन पर्यंताच्या भुयारी मार्ग बांधणे | १२००.०० | १५७ |
| ३८ | फाउंटन हॉटेल जंक्शन ते भाईंदर पर्यंत उन्नत मार्ग बांधणे | १०००.०० | १५९ |
| ३९ | रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टी पुनर्विकास | २५०.०० | १६१ |
| | **वित्तीय संस्था पी.एफ.सी. कडून कर्ज** | | |
| ४० | पूर्व द्रुतगती महामार्गावरील ठाणे शहरातील आनंद नगर ते साकेत पर्यंतच्या ६.३० कि.मी. लांबीच्या उन्नत मार्गाचे बांधकाम करणे | ५००.०० | १६३ |
| ४१ | बाळकुम ते गायमुख ठाणे खाडी किनारा मार्गाचे (ठाणे कोस्टल रोड) बांधकाम करणे. | ६००.०० | १६४ |
| ४२ | छेडानगर- घाटकोपर ते ठाणे पर्यंत पूर्व मुक्त मार्गाचे विस्तारीकरण | ८००.०० | १६५ |
| ४३ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मुरबाड रोड, बदलापुर रोड व पुना लिंक रोड यांना जोडणारा वालधुनी नदीस समांतर असलेला विकास आराखड्यातील २४ मी. रूंद रस्ता व त्यावरील दोन रेल्वे उड्डाणपुल (आर.ओ. बी.) विकसित करणे. | २००.०० | १६६ |
| ४४ | गायमुख ठाणे ते पायेगांव | ५९०.०० | १६७ |
| ४५ | कासारवडवली ठाणे ते खारबाब भिवंडी | ४००.०० | १६९ |
| ४६ | कोलशेत ठाणे ते काल्हेर भिवंडी | १८४.०० | १७१ |
| ४७ | ऐरोली बोगदा ते कटाई नाका रोड | ४५०.०० | १७३ |
| | **एकूण** | **१९०४९.८०** | |

## अभियांत्रिकी विभाग — १ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | **वांद्रे-कुर्ला संकुलातील सुधारणा व नागरी सुविधा (कलानगर उड्डाणपुलासह)** |
| २. | **चालू योजना/ नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | 'इ', 'जी' 'जीएन' आणि 'जी-टेक्स्ट'<br>अ) दक्षिण मुंबईच्या वाणिज्य क्षेत्रावरील ताण, अंशत: कमी करण्याच्या उद्देशाने ३७० हेक्टर क्षेत्र अतिरीक्त वाणिज्य केंद्र म्हणून विकसित करण्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा प्रस्ताव होता. या प्रकल्पात पुढील घटकांचा समावेश आहे.<br>१) रस्ते, मलनिसा:रण व्यवस्था, भूमिगत पावसाळी जलवाहू गटारे, जलवाहिन्या, रस्त्यावरील दिवाबत्ती इ. सुविधांची देखभाल/दुरुस्ती व नवीन कामे करणे.<br>२) फुड प्लाझा, रस्त्याच्या बाजुला पदपथ बांधकाम व दुरुस्ती, वाहनतळ उभारणे, संकुल सुशोभित व आधुनिक करण्याच्या दृष्टीने कामे हाती घेणे.<br>ब) 'इ' ब्लॉकमध्ये नागरी सुविधा.<br>१) रस्त्याच्या बाजूला पदपथ बांधकाम व दुरुस्ती, वाहनतळ उभारणे, पादचारी संकुल, फेरीवाला क्षेत्र, रस्त्यावरील दिवे, मोकळया भागाचा विकास करणे, रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे इ. कामे.<br>२) सिटी पार्क<br>क) वांद्रे-कुर्ला संकुल देखभाल व दुरुस्ती<br>१) वांद्रे-कुर्ला संकुलामधील अंतर्गत रस्त्यांची पदपथ, सायकल ट्रॅक व इतर पायाभूत सुविधांची देखभाल, दुरुस्तीची व नुतनीकरण कामे, रंगकाम इ.<br>२) भुमीगत पावसाळी गटारे, सेवा वाहिन्या सुस्थितीत ठेवण्यासाठी देखभाल व दुरुस्ती करणे तसेच सुटलेल्या लांबीतील कामे.<br>३) वांद्रे-कुर्ला संकुलाच्या हद्दीवर गरजेनुसार कुंपण घालणे.<br>४) नवीन वाहनतळांसाठी काही मोकळया जागा विकसित करणे.<br>५) सिटी पार्क दुरुस्ती व नुतनीकरण कामे.<br>६) वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-टेक्स्ट गटामध्ये आर.सी.सी. बॉक्स ड्रेनचे बांधकाम करणे.<br>७) वांद्रे-कुर्ला संकुलातील रस्त्यांची साफसफाईबाबत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मुंबई महापालिकेस खर्चाचा परतावा देणे.<br>८) वांद्रे-कुर्ला संकुलातील पथ दिव्यांची विदयुत देयके अदा करणे.<br>ड) कलानगर जंक्शन येथे उड्डाणपुलांचे तसेच वळण रस्त्याचे बांधकाम करणे.<br>१) कलानगर उड्डाणपुलाखालील भागात बीकेसी आर्ट प्लॉझाचे बांधकाम करणे.<br>२) कलानगर उड्डाणपुलाखालील भागातील बीकेसी Entrance प्लॉझाची वार्षिक देखभाल करणे.<br>इ) वांद्रे-कुर्ला संकुलातील वाहतुक व परिवहन सुधारणा करण्याकरीता विविध उपाययोजना करणे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | सोबत तक्ता जोडला आहे. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | | १९८२-८३ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | | मूळ योजनेतील भांडवली कामे मार्च, २०२३ अखेर पूर्ण झालेली असून देखभाल दुरुस्तीची व किरकोळ विकास कामे अव्याहत सुरु राहतील. |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | | अ) 'जी', जीएन आणि 'जी-टेक्स्ट'<br>१) मूळ योजनेतील भांडवली कामे जसे, रस्ते, भूमिगत पावसाळी जलवाहू गटारे, रस्त्यावरील दिवाबत्ती इ. सुविधांची कामे प्रगतीपथावर.<br>२) फुड प्लाझा, रस्त्याच्या बाजुला पदपथ बांधणे, वाहनतळ उभारणे इ. कामे पूर्ण, संकुल सुशोभित व आधुनिक करण्याच्या दृष्टीने कामे प्रगतीपथावर.<br>ब) 'इ' ब्लॉकमध्ये नागरी सुविधा.<br>रस्त्याच्या बाजुला पदपथ बांधणे, वाहनतळ उभारणे, पादचारी संकुल, फेरीवाला क्षेत्र, रस्त्यावरील दिवे, मोकळया भागाचे विकसन करणे, रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे इ. कामे पूर्ण.<br>क) वांद्रे-कुर्ला संकुल देखभाल व दुरुस्ती<br>१) वांद्रे-कुर्ला संकुलातील रस्त्यालगतच्या नादुरुस्त पदपथांची दुरुस्ती व नुतनीकरण. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | २) वांद्रे-कुर्ला संकुलामधील अंतर्गत रस्त्यांची व इतर पायाभूत सुविधांची देखभाल व दुरुस्तीची कामे.<br>३) पावसाळयामध्ये वाढलेली जंगली झाडे झुडपी काढणे.<br>४) भुमीगत पावसाळी गटारे, सेवा वाहिन्या सुस्थितीत ठेवण्यासाठी देखभाल व दुरुस्ती करणे तसेच सुटलेल्या लांबीतील कामे.<br>५) वांद्रे-कुर्ला संकुलातील कॉंक्रीट रस्त्याचे तसेच पुलांचे संरचनात्मक लेखापरिक्षण (दृष्य सर्वेक्षण, डीस्ट्रेस मॅपिंग इ.) आणि सविस्तर अहवाल सादर करणे करिता सल्लागार नेमणे व दुरुस्तीची कामे हाती घेणे.<br>ड) कलानगर जंक्शन येथील उड्डाणपुलाच्या बांधकामापैकी २ आर्म (B व C) चे बांधकाम पूर्ण करुन वाहतूकीस खुले करण्यात आले आहेत. तसेच आर्म D चे उर्वरित बांधकाम पुर्णत्वास आले असून लवकरच वाहतुकीसाठी खुले करण्याचे नियोजित आहे.<br>१) कलानगर उड्डाणपूलाखालील भागात बीकेसी आर्ट प्लॉझाचे काम प्रगतीपथावर आहे.<br>इ) इतर कामे<br>१) वांद्रे कुर्ला संकुलातील जी-ब्लॉकमधील रस्त्यांच्या दोन्ही बाजुच्या पदपथांचे नुतनीकरण करणे काम पुर्ण (Providing Cycle Track).<br>२) वांद्रे कुर्ला संकुलातील मैदानांची साफसफाई करणे.<br>३) वांद्रे कुर्ला संकुलातील रस्ते साफसफाईबाबत २०१९ ते २०२४ (मुंबई महापालिकेमार्फत)<br>४) वांद्रे कुर्ला संकुलातील जी-ब्लॉकमधील रस्त्यांच्या एका बाजुच्या पदपथांचे नुतनीकरण करणे. (टप्पा-३).<br>वांद्रे-कुर्ला संकुलातील वाहतुक व परिवहन सुधारणा करण्याकरीता विविध उपाययोजना करण्याकरीता. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | | १) वांद्रे-कुर्ला संकुल देखभाल व दुरुस्ती व इतर कामे.<br>२) वांद्रे-कुर्ला संकुलातील 'ई', 'जी', 'जीएन' व 'जी-टेक्स्ट' गटातील रस्ते, पदपथ, पावसाळी, भूमीगत गटारे व सेवा वाहिन्यांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती.<br>३) वांद्रे-कुर्ला संकुलातील रस्त्यांची साफसफाईबाबत मुंबई महापालिकेस खर्चाचा परतावा देणे.<br>४) वांद्रे-कुर्ला संकुलातील पथ दिव्यांची विदयुत देयके अदा करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ५) वांद्रे-कुर्ला संकुलाच्या हद्दीवर गरजेनुसार कुंपण घालणे.<br>६) वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-टेक्स्ट गटामध्ये आर.सी.सी. बॉक्स ड्रेनचे बांधकाम करणे.<br>७) वांद्रे-कुर्ला संकुलातील कॉंक्रीट रस्त्याचे तसेच पुलांचे संरचनात्मक लेखापरिक्षण (दृष्य सर्वेक्षण, डीस्ट्रेस मॅपिंग इ.) आणि सविस्तर अहवाल सादर करणे करिता सल्लागार नेमणे व दुरुस्तीची कामे हाती घेणे.<br>ड) इतर कामे<br>१) वांद्रे कुर्ला संकुलातील जी-ब्लॉकमधील रस्त्यांच्या दोन्ही बाजुच्या पदपथांचे नुतनीकरण करणे काम पुर्ण (Providing Cycle Track).<br>२) वांद्रे कुर्ला संकुलातील मैदानांची साफसफाई करणे.<br>३) वांद्रे कुर्ला संकुलातील रस्ते साफसफाईबाबत २०१९ ते २०२४ (मुंबई महापालिकेमार्फत).<br>४) वांद्रे कुर्ला संकुलातील जी-ब्लॉकमधील रस्त्यांच्या एका बाजुच्या पदपथांचे नुतनीकरण करणे (टप्पा-३).<br>५) वांद्रे-कुर्ला संकुलातील वाहतुक व परिवहन सुधारणा करण्याकरीता विविध उपाययोजना करणे.<br>६) वांद्रे कुर्ला संकुलातील बीकेसी कनेक्टर ब्रिज खालील प्लॉट सी-८० व सी-७९ ला जोडणारा रस्ता (Missing Link) चे बांधकाम करणे |

७. **अंदाजित खर्च-२०२५-२६** **(रुपये कोटीत)**

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१००.००** | **७८.००** | **७३.३०** |

८. **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

*****

## अभियांत्रिकी विभाग – २ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | **ओशिवरा जिल्हा केंद्राची पायाभूत सुविधा कामे (भू-संपादनासह)** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | ओशिवरा येथे मुलभूत सोयी - सुविधांचे विकसन |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | a. क्र./मु.म.प्र.वि.प्रा./अवि/ओडीसी/ब्रिज/२०२३ दि.२३/०५/२०२३.<br>कामाची किंमत रु. ३५.३२ कोटी<br>कंत्राटदाराचे नाव: मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. वालभट नाला-मजास नाला पुल बांधणे .<br>b. क्र./मु.म.प्र.वि.प्रा./अवि/ओडीसी/एम.एच,रोड/२०२३<br>कामाची किंमत रु. ९.२० कोटी<br>कंत्राटदाराचे नाव: २५.०मी डीपी रस्त्याचे काम मे. आर.ई. इन्फ्रा प्रा.लि. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | १८/१२/२०२३ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | | डिसेंबर २०२५ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बांधलेल्या रस्त्यांची दुरूस्ती देखभाल व पुर्नपृष्ठांकन करणे तसेच नगर व क्षेत्र नियोजन विभागाने तयार केलेल्या आराखडयाप्रमाणे या विभागातील रस्ते विकसित करणे, महानगरपालिकेच्या निर्देशानुसार जलवाहिन्या व मल:निस्सारण वाहिन्या पुरविणे इ. कामे टप्प्या टप्प्याने सुरू करून पूर्णत्वास नेणे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नगर व क्षेत्र नियोजन विभागाने तयार केलेल्या आराखड्याप्रमाणे या विभागातील रस्ते विकसित करणे, महानगरपालिकेच्या निर्देशानुसार जलवाहिन्या व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मल:निस्सारण वाहिन्या पुरविणे इ. कामे टप्प्या टप्प्याने सुरू करून पूर्णत्वास नेणे. तसेच प्राधिकरणाने बांधलेल्या रस्त्यांची दुरूस्ती व देखभाल करणे. प्रस्तावित उर्वरित रस्ते व पायाभूत सुविधा विकास कामांकरीता, अतिक्रमणे व जमिन अधिग्रहण प्रक्रीया इ. बाबींची पुर्तता करून कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. |
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | (रुपये कोटीत) |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **३०.००** | **२९.५०** | **३०.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## अभियांत्रिकी विभाग – ३ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | **विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प राबविणे (भू-संपादनासह)** |
| २. | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना. |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प, बृहन्मंबई महानगरपालिका क्षेत्रात राबविला जात आहे, तद्वतच बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रालगतच्या इतर महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्रातही असा प्रकल्प राबवावा अशी त्या भागातील लोकप्रतिनिधींची मागणी होती. तसेच मुंबई महानगरात मुंबई प्राधिकरण क्षेत्रातून रोज लाखो नागरीक कामानिमित्त येत असतात. त्यांना मुंबईतील नागरी सुविधांचा योग्य लाभ घेता यावा या दृष्टीने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा विस्तार मुंबई महापालिका क्षेत्राबाहेरील प्राधिकरण क्षेत्रात करणे गरजेचे होते. ज्यायोगे वाहतुकीची कोंडी दूर होण्यास मदत होणार होती. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा विस्तार मुंबई महानगर प्रदेशांतर्गत येणा-या, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, वसई-विरार, मिरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, कर्जत-खोपोली, कल्याण-डोंबिवली व पालघर या क्षेत्रातील विविध विकास कामे हाती घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. यामधील काही कामे ठाणे महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत कार्यान्वीत करण्यात येत आहेत. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | सोबत तक्ता जोडला आहे. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | अ) ऑगस्ट, २००९<br>ब) जानेवारी, २०११<br>क) मार्च, २०१५<br>ड) एप्रिल, २०२३ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | अ) डिसेंबर, २०२५<br>ब) डिसेंबर, २०२५<br>क) डिसेंबर, २०२५<br>ड) डिसेंबर, २०२६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | a. **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** : | | |
| | **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **कार्यवाही** |
| | अ) **मुं.म.प्र.वि.प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी** | | |
| | | **वसई विरार क्षेत्रातील रस्ते, खाडीवरील पुल व रेल्वे उड्डाणपुलांची कामे.** | |
| | १) | नायगांव भाईदर दरम्यान वसई खाडीवर तीनपदरी उड्डाणपुलाचे बांधकाम करणे. (५कि.मी. लांबीचा पुल बांधणे) | महाराष्ट्र सागरी किनारा नियंत्रण प्राधिकरण (MCZMA), राज्य पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA), महाराष्ट्र सागरी मंडळ (MMB), भारतीय अंतर्देशिय जलमार्ग प्राधिकरण (IWAI) यांच्या परवानग्या २०१७ रोजी प्राप्त झाल्या असून वन विभाग (Forest Dept).व मिठागरे (Salt Pan Land) परवानग्या प्रगतीपथावर आहेत |
| | **ब) मुं.म.प्र.वि.प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी** | | |
| | १. | कल्याण फाटा शिळफाटा येथे उड्डाणपूल बांधणे. | काम प्रगतीपथावर आहे. |
| | **क) प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीमध्ये मंजूर झालेली कामे** | | |
| | १. | अ) माणकोली मोटागांव रस्त्यावरील मोटागांव येथे उल्हासखाडीवर सहापदरी पुल व रस्त्याचे बांधकाम करणे. | काम पूर्ण झाले आहे. हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. |
| | | ब) माणकोली मोटागांव जोडरस्ता (कार्यकारी समितीच्या २६३व्या बैठकीत मंजूर) | काम पूर्ण झाले आहे. हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. |
| | २. | जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील नावडेफाटा येथे उड्डाणपुल बांधणे. | काम पूर्ण झाले असून हस्तांतरणाची प्रक्रीया पूर्ण करण्यात येईल. |
| | ३. | **कल्याण बाह्य वळण रस्ता बांधणे.**<br>१) भाग-५,६ व ७<br><br><br><br><br><br>२) भाग-१ ते ३ आणि ८ | एकूण लांबीपैकी उपलब्ध लांबीत काम पूर्ण करुन कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेस माहे एप्रिल, २०२२ मध्ये हस्तांतरीत. उर्वरीत २०% लांबीत कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेमार्फत जागा उपलब्धतेनुसार निविदा प्रक्रिया करुन काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.<br><br>भाग-१ ते ३ पैकी भाग ३ आणि ८ चे काम हाती घेण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार आणि कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कार्यारंभ आदेश दिला आहे. |
| | ४. | दस्तुरी माथेरान या पथमार्गाचे सुशेभिकरण करणे व दस्तुरी येथील वाहन स्थळ, विद्युत कामे | ९०% काम पूर्ण. उर्वरीत काम मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे स्थगित ठेवण्यात आले आहे. |
| | ५. | ऐरोली-कटाई नाका महामार्ग प्रकल्प विद्युत कामासह | काम प्रगतीपथावर आहे. |
| | ६. | कल्याण भिवंडी राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वर उल्हास खाडीवर सहापदरी पुल व रस्त्याचे बांधकाम करणे. (दुर्गाडी पुल) | १००% काम पूर्ण, हस्तातरीत प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. |
| | **ड) मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष प्राधिकरण यांनी मंजूर केलेली कामे** | | |
| | | सन-२०१६ मधील कामे | |
| | १. | **मुंबई उपनगर जिल्हा- पश्चिम द्रुतगती मार्ग :** | |
| | | आकुर्ली (कांदिवली पूर्व) येथील भुयारी मार्गाचे रुंदीकरण व बांधकाम | ९५% काम पूर्ण झाले आहे. माहे, डिसेंबर, २०२४ अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. |
| | २. | **मिरा-भाईंदर महानगरपालिका अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०२४-२०२५ मधील कामे | |
| | | १) ओवळा माजिवडा हद्दीतील १० रस्त्यांची कामे | मार्च, २०२५ पर्यंत काम पूर्ण करण्यात येईल. |
| | | २) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांचे सुधारीकरण व कॉंक्रीटीकरण करणे. (प्रभाग क्र.२ते ५) एकूण ४७ रस्ते (भाग १ ते ४) | मार्च, २०२५ पर्यंत ७०% काम पूर्ण करण्यात येईल. |
| | | ३) सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन पर्यंत रस्ता तयार करणे. | निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून मार्च, २०२५ पर्यंत कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येईल. |
| | | ४) घोडबंदर-जैसलपार्क ६० मीटर / ३० मीटर (घोडबंदर किल्ल्यापर्यंत) रुंदीचा रस्ता तयार करणे. | सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतिपथावर असून मार्च, २०२५ पर्यंत कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येईल. |
| | | ५) राष्ट्रीय महामार्ग समांतर घोडबंदर साई पॅलेस ते ठाकुर मॉल पर्यंत ३० मीटर रुंदीचा रस्ता तयार करणे. | सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतिपथावर असून मार्च, २०२५ पर्यंत कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येईल. |
| | | ६) मिरारोड पुर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वेवरील उड्डाणपुल व रस्ता बांधणे. | सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतिपथावर असून मार्च, २०२५ पर्यंत कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३. | **भिवंडी-निजामपूर महानगरपालिका अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०२४-२०२५ मधील कामे | |
| | | १) भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील ४ कामे (धामणकर नाका) | ४०% काम पूर्ण झाले आहे. काम पूर्ण करण्याची मुदतवाढ घेणे अपेक्षित आहे. |
| | | २) भिवंडी - निजामपूर महानगरपालिका हद्दीतील शांतीनगर ते आग्रा रोड रस्त्यांची सुधारणा करणे. | कामे पूर्ण झाली असून भिवंडी – निजामपूर शहर महानगरपालिकेकडे हस्तातरीत करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| | | ३) भिवंडी - निजामपूर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांची सुधारणा करणे (५ रस्त्यांच्या कामांच्या कँक्रिटीकरणाची कामे) | कामे प्रगतीपथावर आहेत. |
| | ४. | **अंबरनाथ नगरपरिषद अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०१६ मधील कामे | |
| | | अंबरनाथ नगरपरिषदेतील कामे ५ कि.मी. रस्त्याचे कँक्रिटीकरण करणे- साईबाबा मंदिर ते फॉरेस्ट नाका विद्युत कामासह | काम पूर्ण, हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु आहे. |
| | | सन २०२३-२०२४ मधील कामे | |
| | | अंबरनाथ नगर परिषद हद्दीतील SATIS work आणि ३ रस्त्यांची कामे | SATIS Work - निविदा प्रक्रिया माहे जानेवारी, २०२५ मध्ये सुरु करण्यात येईल.<br>३ रस्त्यांची कामे – ३ पैकी २ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. |
| | | अंबरनाथ येथील एचटी/एलटी लाईनचे स्थलांतर | कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली असून कामास सुरुवात करण्यात आली आहे. माहे मार्च, २०२५ अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. |
| | ५. | **कल्याण- डोंबिवली महानगरपालिका अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०१८-२०१९ मधील कामे | |
| | | कल्याण डोंबिवली महानगरपालिका हददीतील काँक्रिट १२ रस्त्यांची कामे (भाग १ ते ४) जूनी कामे | सदर कामे पूर्ण झाली असून अंतिम देयक बाकी आहे. |
| | | सन २०२३-२०२४ मधील कामे | |
| | | १) तळोजा एमआयडीसी रस्ता (टप्पा-१ व टप्पा-२) | टप्पा-२ काम प्रगतीपथावर राहील. |
| | | २) डोंबिवली औद्योगिक रहिवाशी क्षेत्रातील रस्त्यांचे मजबुतीकरण व रुंदीकरण करणे. (₹५७.३७ कोटी) | काम पूर्ण झाले आहे. अंतिम देयक बाकी आहे. |
| | | तळोजा एमआयडीसी ते जुना रा.म.४ रस्त्याचे बांधकाम (भाग १ व २) | भाग-१ काम प्रगतीपथावर आहे.भाग-२ निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील एकूण २५ रस्त्यांची कामे (जूनी कामे) | कामे प्रगतीपथावर आहेत. |
| | | सन २०२४-२०२५ मधील कामे | |
| | | १) कल्याण- डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्त्यांचे रुंदीकरण व बांधकाम करणे. (डोंबिवली विभाग). भाग - १ ते ५) | कामे प्रगतीपथावर आहेत. |
| | | २) मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत माणकोली मोटागांव जोडरस्त्याचे काम, भूसंपादन, राष्ट्रीय महामार्गापासून माणकोली मोटागांव जोडरस्त्याला येण्यासाठी व जाण्यासाठी रस्त्याचे बांधकाम करणे, (इंटरचेंज भुयारी मार्ग) व सेवा रस्ता | सेवा रस्त्याचे भू-संपादनाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच भूयारी मार्गासाठी ₹५७ कोटी देणे बाकी. |
| | | ३) कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील ३ रस्त्यांची कामे | कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आले असून कामे प्रगतीपथावर आहेत. |
| | ६. | **ठाणे महानगरपालिका अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०२३-२०२४ मधील कामे | |
| | | ठाणे महानगरपालिका क्षेत्र २२ नं सर्कल ते दालमेल नाकाअंतर्गत रस्त्यांची काम | कामे पूर्ण करुन ठाणे महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आली आहेत. |
| | | सन २०२४-२०२५ मधील कामे | |
| | | १) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आनंद नगर ते कावेसर या रस्त्याचे बांधकाम करणे | काम पूर्ण. |
| | | २) ठाणे घोडबंदर रस्त्याचे मुख्य रस्ता व सेवा रस्त्यांचे विलिनीकरण करुन काँक्रीटीकरण करणे | आतापर्यंत ५% काम पूर्ण झाले असून मार्च २०२५ पर्यंत २५% काम पूर्ण करण्यात येईल. |
| | | ३) ठाणे येथील मासुंदा तलावाचे सुशोभिकरण करणे | सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून कंत्राटदाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा मागवून नेमणूक करणे. |
| | ७. | **उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०२३-२०२४ मधील कामे | |
| | | उल्हासनगर मधील ७ रस्त्यांची कामे | कामे प्रगतीपथावर आहेत. |
| | ८. | **कुळगांव बदलापूर नगरपरिषद अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०१९ मधील कामे | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कात्रप बदलापूर बाह्य वळण रस्त्याचे कॉंक्रिटीकरण | काम पूर्ण. |
| | | सन २०२४-२०२५ मधील कामे | |
| | | १) कुळगांव बदलापूर KBMC क्षेत्रामध्ये कात्रप ते बेलावली बदलापूर दरम्यान ROB बांधणे | निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदारामार्फत ROBचे डिझाइन तयार करणे. विविध संस्थामार्फत या कामाकरीता आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करणे. |
| | | २) कात्रप पेट्रोल पंप ते खरवई जुवेली (बदलापूर बायपास - भाग-II) पर्यंत सीसी रस्त्याचे बांधकाम | निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदारामार्फत प्रत्यक्ष कामास सुरुवात करणे. |
| | ९. | **रायगड जिल्हाअंतर्गत अलिबाग तालुक्यातील रस्त्यांची कामे** | |
| | | सन २०२३-२०२४ | |
| | | मौजे आवास ता. अलिबाग जि. रायगड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे | काम पूर्ण. हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु आहे. अंतिम देयक बाकी. |
| | | सन २०२४-२०२५ | |
| | | रायगड परिसरातील कर्जत चारफाटा ते चौक फाटा रस्त्याचे काम | काम प्रगतीपथावर आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | |
| | **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **कार्यवाही** |
| | अ) **मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी** | | |
| | | **वसई विरार क्षेत्रातील रस्ते, खाडीवरील पुल व रेल्वे उड्डाणपुलांची कामे.** | |
| | १) | नायगांव भाईदर दरम्यान वसई खाडीवर तीनपदरी उड्डाणपुलाचे बांधकाम करणे. (५ कि.मी. लांबीचा पुल बांधणे) | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यावर सदर प्रस्तावासहित प्राधिकरणाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. |
| | **ब) मुं.म.प्र.वि.प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी** | | |
| | २) | कल्याण फाटा शिळफाटा येथे उड्डाणपूल बांधणे. | काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. |
| | **क) प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीमध्ये मंजूर झालेली कामे** | | |
| | १. | अ) माणकोली मोटागांव रस्त्यावरील मोटागांव येथे उल्हासखाडीवर सहापदरी पुल व रस्त्याचे बांधकाम करणे. | काम पूर्ण. हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण होईल. |
| | | ब) माणकोली मोटागांव जोडरस्ता (कार्यकारी समितीच्या २६३व्या बैठकीत मंजूर) | काम पूर्ण. हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण होईल. |
| | २. | जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील नावडेफाटा येथे उड्डाणपुल बांधणे. | हस्तांतरणाची प्रक्रीया पूर्ण करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३. | कल्याण बाह्य वळण रस्ता बांधणे.<br>१) भाग-५,६ व ७<br><br><br><br>२) भाग-१ ते ३ आणि ८ | <br>उर्वरित जागा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिल्यास कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम हाती घेण्यात येईल.<br><br>भाग-१ ते ३ आणि ८ पैकी भाग ३ आणि ८ चे काम प्रगतीपथावर असेल. तसेच भाग ३चे काम ३६ महिने व भाग ८ चे १८ महिन्यात काम पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे. |
| | ४. | दस्तुरी माथेरान या पथमार्गाचे सुशेभिकरण करणे व दस्तुरी येथील वाहन स्थळ, विद्युत कामे | दस्तुरी येथील वाहनतळाचे काम पूर्ण करुन माथेरान नगरपरिषदेस हस्तांतरीत करण्यात आले आहे. दस्तुरी पथमार्गाचे काम ९०% पूर्ण झाले असून उर्वरीत काम मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे स्थगित ठेवण्यात आले आहे. |
| | ५. | ऐरोली-कटाई नाका महामार्ग प्रकल्प विद्युत कामासह - भाग-१ व भाग-२ | काम अंतिम टप्प्यात राहील. |
| | ६. | कल्याण भिवंडी राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वर उल्हास खाडीवर सहापदरी पुल व रस्त्याचे बांधकाम करणे. (दुर्गाडी पुल) | माहे मार्च, २०२६ पर्यंत हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन आहे. |
| | **ड) मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष प्राधिकरण यांनी मंजूर केलेली कामे** | | |
| | | सन २०१६ मधील कामे | |
| | १. | **मुंबई उपनगर जिल्हा- पश्चिम द्रुतगती मार्ग :** | |
| | | आकुर्ली (कांदिवली पूर्व) येथील भुयारी मार्गाचे रुंदीकरण व बांधकाम | काम पूर्ण. हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण होईल. |
| | २. | **मिरा-भाईंदर महानगरपालिका अंतर्गतची कामे :** | |
| | | सन २०२४-२०२५ मधील कामे | |
| | | १) ओवळा माजिवडा हद्दीतील १० (४+६) रस्त्यांची कामे | मार्च, २०२५ पर्यंत काम पूर्ण करण्यात येईल. |
| | | २) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांचे सुधारीकरण व काँक्रीटीकरण करणे. (प्रभाग क्र.२ते ५) एकूण ४७ रस्ते (भाग १ ते ४) | जून, २०२५ पर्यंत १००% काम पूर्ण करण्यात येईल. |
| | | ३) सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन पर्यंत रस्ता तयार करणे. | काम प्रगतिपथावर राहील. |
| | | ४) घोडबंदर-जैसलपार्क ६० मीटर / ३० मीटर (घोडबंदर किल्ल्यापर्यंत) रुंदीचा रस्ता तयार करणे. | काम प्रगतिपथावर राहील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५) राष्ट्रीय महामार्ग समांतर घोडबंदर साई पॅलेस ते ठाकुर मॉल पर्यंत ३० मीटर रुंदीचा रस्ता तयार करणे. | काम प्रगतिपथावर राहील. |
| | | ६) मिरारोड पुर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वेवरील उड्डाणपुल व रस्ता बांधणे. | काम प्रगतिपथावर राहील. |
| | ३. | **भिवंडी-निजामपूर महानगरपालिका अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०२४-२०२५ मधील कामे | |
| | | १) भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील ४ कामे (धामणकर नाका) | काम पूर्ण करण्यात येईल. |
| | | २) भिवंडी - निजामपूर महानगरपालिका हद्दीतील शांतीनगर ते आग्रा रोड रस्त्यांची सुधारणा करणे | काम पूर्ण. हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण होईल |
| | | ३) भिवंडी - निजामपूर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांची सुधारणा करणे (५ रस्त्यांच्या कामांच्या कँक्रिटीकरणाची कामे) | काम पूर्ण. हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण होईल |
| | | सन २०२५-२०२६ मधील कामे | |
| | | १) भिवंडी निजामपूर महानगरपालिका क्षेत्रातील अंतर्गत सीसी रस्त्यांचे बांधकाम - दहेलारे पेट्रोल पंप ते पाचपूर फाटा | सदर काम प्रगतीपथावर राहील |
| | | २) भिवंडी निजामपूर महानगरपालिका क्षेत्रातील अंतर्गत सीसी रस्त्यांचे बांधकाम - शिरगाव फाटा ते वासिंद सरमल फाटा | सदर काम प्रगतीपथावर राहील |
| | ४. | **अंबरनाथ नगरपरिषद अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०१६ मधील कामे | |
| | | १) अंबरनाथ नगरपरिषदेतील कामे ५ कि.मी. रस्त्याचे कँक्रिटीकरण करणे- साईबाबा मंदिर ते फॉरेस्ट नाका विद्युत कामासह | काम पूर्ण. हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण होईल |
| | | सन २०२३-२०२४ मधील कामे | |
| | | अंबरनाथ नगर परिषद हद्दीतील SATIS work आणि ३ रस्त्यांची कामे | SATIS प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येईल.<br>३ पैकी २ रस्त्यांची कामे पूर्ण करुन अंबरनाथ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | नगरपरिषदेस हस्तांतरीत करण्यात येतील. |
| | | सन २०२५-२०२६ मधील कामे | |
| | | अंबरनाथ येथील एचटी/एलटी लाईनचे स्थलांतर | काम पूर्ण होईल. |
| | ५. | **कल्याण- डोंबिवली महानगरपालिका अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०१८-२०१९ मधील कामे | |
| | | कल्याण डोंबिवली महानगरपालिका हददीतील कॉंक्रिट १२ रस्त्यांची कामे (भाग १ ते ४) जूनी कामे | रस्त्यांची कामे पूर्ण करुन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यता येतील. |
| | | सन २०२३-२०२४ मधील कामे | |
| | | १) तळोजा एमआयडीसी रस्ता (टप्पा-१) व (टप्पा-२) | टप्पा-१ चे काम पूर्ण. वगळण्यात यावे.<br>टप्पा-२ काम प्रगतीपथावर राहील. |
| | | २) डोंबिवली औद्योगिक रहिवाशी क्षेत्रातील रस्त्यांचे मजबुतीकरण व रुंदीकरण करणे. (रू. ५७.३७ कोटी) | काम पूर्ण. |
| | | ३) तळोजा एमआयडीसी ते जुना रा.म.४ रस्त्याचे बांधकाम (भाग १ व २) | भाग-१ काम पूर्ण करण्याचे प्रयोजन आहे.<br><br>भाग-२ काम प्रगतीपथावर राहील. |
| | | ४) कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील एकूण २५ रस्त्यांची कामे (जूनी कामे) | रस्त्यांची कामे पूर्ण करुन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यता येतील. |
| | | सन २०२४-२०२५ मधील कामे | |
| | | १) कल्याण- डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्त्यांचे रुंदीकरण व बांधकाम करणे. (डोंबिवली विभाग). भाग - १ ते ५) | कामे प्रगतीपथावर राहील. |
| | | २) मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत माणकोली मोटागांव जोडरस्त्याचे काम, भूसंपादन, राष्ट्रीय महामार्गापासून माणकोली मोटागांव जोडरस्त्याला येण्यासाठी व जाण्यासाठी रस्त्याचे बांधकाम करणे, (इंटरचेंज भुयारी मार्ग) व सेवा रस्ता | काम प्रगतीपथावर राहील |
| | | ३) कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील ३ रस्त्यांची कामे | कामे प्रगतीपथावर राहतील |
| | ६. | **ठाणे महानगरपालिका अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०२३-२०२४ मधील कामे | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ठाणे महानगरपालिका क्षेत्र २२ नं सर्कल ते दालमेल नाकाअंतर्गत रस्त्यांची काम | काम पूर्ण. हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण होईल |
| | | सन २०२४-२०२५ मधील कामे | |
| | | १) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आनंद नगर ते कावेसर या रस्त्याचे बांधकाम करणे | काम पूर्ण झाल्यामुळे सदर रस्ता ठाणे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात येईल. |
| | | २) ठाणे घोडबंदर रस्त्याचे मुख्य रस्ता व सेवा रस्त्यांचे विलिनीकरण करुन काँक्रीटीकरण करणे | काम प्रगतीपथावर राहील. |
| | | ३) ठाणे येथील मासुंदा तलावाचे सुशोभिकरण करणे | कंत्राटदाराची नेमणूक करुन कामास प्रत्यक्ष सुरुवात होईल. |
| | | सन २०२५-२०२६ मधील कामे | |
| | | १) ऐरोली कटाई नाका व ठाणे-बेलापूर रस्त्याच्या भारत बिजुली जंक्शन येथे चढणे व उतरणेकरीता मार्गिका बांधणे | काम प्रगतीपथावर आहे. |
| | | २) तिसऱ्या कळवा पुलाचा विस्तार | निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामास सुरुवात होईल |
| | | ३) ठाणे येथील ओवळा माजिवडा मतदारसंघातील विविध रस्त्यांचे बांधकाम | कामे सुरु राहतील. |
| | ७. | **उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०२३-२०२४ मधील कामे | |
| | | उल्हासनगर मधील ७ रस्त्यांची कामे | कामे पूर्ण. हस्तांतरणाची प्रक्रिया प्रगतीपथावर असेल. |
| | ८. | **कुळगांव बदलापूर नगरपरिषद अंतर्गतची कामे** | |
| | | सन २०१९ मधील कामे | |
| | | कात्रप बदलापूर बाह्य वळण रस्त्याचे काँक्रिटीकरण | कामे पूर्ण. हस्तांतरणाची प्रक्रिया प्रगतीपथावर असेल. |
| | | सन २०२५-२०२६ मधील कामे | |
| | | १) कुळगांव बदलापूर KBMC क्षेत्रामध्ये कात्रप ते बेलावली बदलापूर दरम्यान ROB बांधणे | कामाच्या वाव मधील २५% उद्दीष्ट साध्य करणे |
| | | २) कात्रप पेट्रोल पंप ते खरवई जुवेली (बदलापूर बायपास - भाग-II) पर्यंत सीसी रस्त्याचे बांधकाम | कामाच्या वाव मधील ७५% उद्दीष्ट साध्य करणे |
| | ९. | **वसई विरार क्षेत्रातील रस्ते, खाडीवरील पुल व रेल्वे उड्डाणपुलांची कामे** | |
| | | सन २०२५-२०२६ मधील कामे | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वसई विरार क्षेत्रातील रस्ते, खाडीवरील पुल व रेल्वे उड्डाणपुलांची कामे. | वसई विरार शहर महानगरपालिकेकडू विस्तृत प्रकल्प अहवाल व १००% जागा उपलब्ध करून दिल्यानंतर तसेच इतर संबंधित शासकीय विभागांकडनू नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येईल. |
| | | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील ४ प्रमुख शहरे व सभोवतालच्या गावाना जोडणारा ४० मी. रुंदीचा रिंगरोड विकसीत करणे. | वसई विरार शहर महानगरपालिकेकडू विस्तृत प्रकल्प अहवाल व १००% जागा उपलब्ध करून दिल्यानंतर तसेच इतर संबंधित शासकीय विभागांकडनू नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येईल. |
| | | विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा (Extd. MUIP) प्रकल्प अंतर्गत वसई विरार शहर महानगर पालिका हद्दीतील मागणी केलेल्या ५ रेल्वे ओव्हर ब्रिज कामांचे बांधकाम. | वसई विरार शहर महानगरपालिकेकडू विस्तृत प्रकल्प अहवाल व १००% जागा उपलब्ध करून दिल्यानंतर तसेच इतर संबंधित शासकीय विभागांकडनू नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येईल. |
| | १०. | **रायगड जिल्हाअंतर्गत अलिबाग तालुक्यातील रस्त्यांची कामे** | |
| | | सन २०२३-२०२४ | |
| | | मौजे आवास ता. अलिबाग जि. रायगड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे | हस्तांतरणाची प्रक्रिया प्रगतीपथावर असेल. |
| | | सन २०२४-२०२५ | |
| | | १) रायगड परिसरातील कर्जत चारफाटा ते चौक फाटा रस्त्याचे काम | काम प्रगतीपथावर राहतील |
| | | सन २०२५-२०२६ | |
| | | २) रायगड जिल्हाअंतर्गत अलिबाग तालुक्यातील ३ पॅकेज मधील रस्त्यांची कामे | कामे प्रगतीपथावर राहतील |

८. **अंदाजित खर्च-२०२५-२६** **(रुपये कोटीत)**

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **२३४५.१२** | **१२४५.४९** | **५२१.४७** |

९. **योजना अंमलबजावणी करणारी संस्था :** १) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
२) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ.
३) ठाणे महानगरपालिका.

*****

## अभियांत्रिकी विभाग — ४ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | **वांद्रे-कुर्ला संकुल परिसरातील मिठी नदी मधील तरंगता मलबा ट्रॅश स्किमरच्या सहाय्याने भरती असताना काढणे व नदी पात्राच्याकडेला जमा झालेला मलबा ओहोटी असताना काढणे.** |
| २. | **चालू योजना/नविन योजना** | : | **चालू योजना** |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | वांद्रे-कुर्ला संकुलात अनेक व्यापारी संस्था, शैक्षणिक संस्था व इतर अनेक संस्था कार्यान्वित आहेत. सदर परिसरातून वाहणा-या वाकोला नाला व मिठी नदीमध्ये संकुलाच्या सुरुवातीला असण्याऱ्या झोपडपट्टीमधून पाणी सोडले जाते, तसेच कचरा, प्लॅस्टिक इ.पाण्यामध्ये टाकले जातात. त्यामुळे मिठी नदी मधील साफसफाई करण्यासाठी प्राधिकरणामार्फत ट्रॅश स्किमरच्या सहाय्याने तरंगता मलबा (कचरा, प्लॅस्टिक इ.) काढण्यासाठी बी.के.सी. कनेक्टर ते धारावी पुलापर्यंतच्या भागामध्ये सदर प्रकल्प हाती घेण्यात आला होता.<br>**<u>उद्दिष्टे</u> :** मिठी नदीमध्ये तरंगणारा मलबा (कचरा, प्लॅस्टिक इ.) ट्रॅश स्किमरच्या सहाय्याने दूर करण्यात येत आहे. तसेच नदी पात्राच्याकडेला जमा झालेला मलबा ओहोटी असताना काढण्यात आला. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | --- |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | मार्च, २०१९ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | फेब्रुवारी, २०२२ (कामाचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे) |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | ट्रॅश स्किमरच्या सहाय्याने मलबा (कचरा, प्लॅस्टीक इ.) नदी पात्रामधून काढण्यात आला आहे. सद्य:स्थितीत कामाचा कार्यकाळ फेब्रुवारी, २०२२ मध्ये पूर्ण झाला आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | फेब्रुवारी, २०२२ रोजी कामाचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

| | | |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **०.००** | **०.३०** | **१.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | **:** | १) मे. क्लिनटेक<br>२) मुंबई विद्यापीठ |

*****

## अभियांत्रिकी विभाग — ५ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | **वडाळा ट्रक टर्मिनल बांधकाम** |
| २. | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण वडाळा भारवाहक तळासाठी विशेष नियोजन प्राधिकरण असून महाराष्ट्र शासनाने वडाळा अनुसूचित क्षेत्राच्या प्रारुप नियोजन प्रस्तावास व प्रारुप विकास नियंत्रण विनियमावलीस मंजूरी दिलेली आहे. वडाळा क्षेत्र हे वांद्रे कुर्ला संकुलाच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे केंद्र म्हणून विकसित करण्यास महाराष्ट्र शासनाच्या शक्तीप्रदान समितीने मंजुरी दिलेली आहे. या योजनेअंतर्गत प्रत्यक्षात साधारण ८० हेक्टर क्षेत्राचा विकास करुन त्यात खालील बाबींचा अंतर्भाव करुन सदर प्रकल्प तयार करण्यात आला आहे.<br>१. भू-संपादन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचा विकास<br>२. अंतर्गत रस्ते व वाहनतळ<br>३. पूर्व-पश्चिम जोडरस्त्याशी संबंधित कामे<br>४. झोपडयांचे अतिक्रमण व वाढ रोखण्यासाठी कुंपणांची व्यवस्था<br>५. आवाराच्या कडेवरील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन अणि विविध सुविधांची उपलब्धता, इत्यादी कामे<br>६. रस्त्यावरील दिवाबत्तीची सोय इत्यादी<br>७. शीव-कोळीवाडा रस्त्याचे बांधकाम<br>८. रस्ते,इमारती, बगीचाचे देखभालीचे काम<br>९. विकास आराखडयातील रस्ता टप्पा-२ लगतच्या नाल्याचे बांधकाम<br>१०. वृक्षारोपण व देखभाल<br>११. वडाळा-भारवाहक तळालगतच्या नाल्याची सुधारणा व पूर प्रतिबंधक कामे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | १) १२ डिसेंबर, १९८०<br>२) १९८०-८१ पासून भुसंपादनाला सुरुवात झाली आहे.<br>३) पुन:प्रापणाच्या कामाला १९८२ मध्ये सुरुवात झाली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | टप्पा-१ मधील कामे पूर्ण झाली. इतर कामे प्रगतीनुरुप. |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | १. अंतर्गत रस्त्यांची कॉंक्रीटीकरणाची बहुतांश कामे पुर्ण करण्यात आली आहेत.<br>२. इमारती व रस्ते दुरुस्ती देखभालीची कामे प्रगतीपथावर राहतील.<br>३. जलवाहिन्यांची दुरुस्ती व देखभाल करणे<br>४. टप्पा- १ मधील विद्युत पुरवठा व रस्त्यावरील दिवाबत्तची व्यवस्था वापरात असलेल्या रस्त्यावर करण्यात आली आहे.<br>५. मल:निस्सारण शुध्दीकरण केंद्राचे बांधकाम पूर्ण होऊन वापर चालू झाला आहे व तो चालवणे व देखभाल करणे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | १. वडाळा क्षेत्राच्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे केंद्र म्हणून विकास करणे.<br>२. टप्पा-१ मधील दुरुस्ती व देखभालीची खालील कामे प्रगतीत असतील :-<br>अ) अ-१, ब-१, ब-२ आणि ड-२ इमारती, सुविधा इमारत यांचे दुरुस्ती, देखभाल व रंगरंगोटीची कामे व या इमारतींध्यमे आग प्रतिबंधक कामाची देखभाल करण्यात येईल.<br>ब) हिरवळ व वृक्षारोपण ही उद्यान विभागामार्फत<br>क) विद्युत, अग्निशमन व उद्दवाहन इत्यादी<br>ड) गोदामे इमारतींच्या पाणी व विद्युत पुरवठयाची देयक अदा करणे.<br>इ) रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीची कामे<br>३. तार कुंपण व कुंपण भिंत नव्याने बांधण्याची कामे हाती घेण्यात येतील.<br>४. मल:निसारण शुध्दीकरण केंद्र चालवणे व देखभाल करणे.<br>५. पुर प्रतिबंधक कामे प्रगतीपथावर राहतील.<br>६. अंतर्गत रस्त्यावर पथदिवे बसविणे.<br>७. भाग-१ मधील दर्शनी भागाचे, संरक्षक भिंतीचे व भिंतीलगतच्या गटाराचे नुतनीकरण करण्यात येईल.<br>८. सुधारीत विकास आराखडयातील प्रस्तावित रस्त्याची व पुरक पायाभुत सुविधांची कामे.<br>९. जलवाहिन्यांची दुरुस्ती व देखभाल करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | (रुपये कोटीत) |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५**<br>**मूळ अंदाज** | **२०२४-२०२५**<br>**(सुधारीत)** | **२०२५-२०२६**<br>**अपेक्षित अंदाज** |
| **१५.००** | **१०.४२** | **४६.००** |

९. **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** **:** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

******

## अभियांत्रिकी विभाग – ६ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | **अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू (MTHL)** |
| २. | **चालू योजना/ नवीन योजना** | | **चालू योजना** |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | मुंबई शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याबरोबरच नवी मुंबईतील प्रदेशाचा विकास करण्याच्या दृष्टीने अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू प्रकल्पाचा प्रस्ताव सुमारे ३० वर्षापूर्वीपासून विचाराधीन होता. मुंबई व नवी मुंबई यामधील वाहतूक वेगवान व्हावी या हेतूने मुंबई बेटावरील शिवडी ते नवी मुंबईमधील चिर्ले या दरम्यान पूल बांधण्याचा विचार करण्यात आला होता. शासनाने दि.०४ फेब्रुवारी, २००९ च्या शासन निर्णयान्वये या प्रकल्पाची मालकी व अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे असेल असे आदेशित केले. त्याचप्रमाणे या प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे निधी उपलब्ध करण्यात येईल असेही आदेशित करण्यात आले. अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू प्रकल्प हा यापूर्वी रस्ते वाहतूक प्रकल्प म्हणून नियोजित होता. महाराष्ट्र शासनाने दि.०८ जून, २०११ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे या प्रकल्पास प्रादेशिक विकास प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला आहे.<br>प्रकल्पाच्या वावामध्ये मुंबई शहरातील शिवडी व नवी मुंबईमधील चिर्ले यांना जोडणाऱ्या २२ कि.मी. लांबीच्या ६ पदरी पुलाचा अंतर्भाव आहे. यामध्ये १६.५ कि.मी. लांबीचा समुद्रातील पुल व ५.५ कि.मी. लांबीच्या जमिनीवरील पुलाचा अंतर्भाव आहे. या पुलाला मुंबई शहरातील शिवडी व मुख्य भूमीवरील राष्ट्रीय महामार्ग-४ ब वर चिर्ले गावाजवळ आंतरबदल (Interchanges) आहेत.<br>या प्रकल्पाची अंमलबजावणी कंत्राटदाराकडून निविदा बोलावून डिझाईन-बिल्ड पद्धतीने करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठरविले. यादृष्टीने जायका (JICA- Japan International Co-operation Agency) या जपानी संस्थेकडून कर्ज प्राप्त करुन प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रस्तावास केंद्र शासनाच्या वित्त विभागाने मान्यता दिली आहे.<br>जायकाकडून प्रकल्पाचे अंदाजपत्रक बनविण्यात आले असून त्यानुसार प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत रु.१७,८४३ कोटी इतकी आहे. या किंमतीमध्ये बांधकामाची किंमत, महागाई, आकस्मिक बाबींवरील खर्च, भूसंपादन, प्रशासकीय खर्च, बांधकामाच्या कालावधीतील व्याज इ. बाबींचा समावेश आहे. प्रकल्पाकरिता रु.१५,१०० कोटी इतक्या रकमेपर्यंत कर्ज |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | जायकातर्फे देणे बाबतच्या करारावर जायकासोबत दि. ३१ मार्च, २०१७ व दि. २० मार्च, २०२० रोजी स्वाक्षऱ्या झाल्या आहेत.<br>केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाने अटल बिहारी वाजपेयी शिवडी-नाव्हाशेवा सेतू प्रकल्पास कोस्टल रेग्युलेशन झोन विषयक मान्यता (CRZ clearance) तसेच वन जमीन हस्तांतरणास मान्यता (Stage-1 Clearance for diversion of Forest Land) दिलेली आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | • सदर प्रकल्पाकरीता एइकॉम एशिया कंपनी लि.-पडेको कंपनी लि. - दार-अल-हंदाश - टी.वाय.लिन इंटरनॅशनल (कन्सॉर्शिअम) यांची डिसेंबर, २०१६ मध्ये सल्लागार म्हणून नेमणूक केली.<br>• प्रकल्पाचे बांधकाम हे ३ स्थापत्य कंत्राटदारांद्वारे करण्यात आले आहे.<br>• पॅकेज-०१: मे. लार्सन अँड टुब्रो लि.-आयएचआय इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टीम कं. लि. कंसोर्शिअम.<br>कंत्राटीय किंमत: ₹७,६३७ कोटी<br>• पॅकेज-०२ : मे. देवू इंजिनिअरींग अँड कन्स्ट्रक्शन कंपनी लि. व टाटा प्रोजेक्ट्स लि. जेव्ही.<br>कंत्राटीय किंमत: ₹ ५,६१२ कोटी<br>• पॅकेज-०३ : मे. लार्सन अँड टुब्रो लि.<br>कंत्राटीय किंमत: ₹ १,०१३ कोटी<br>• पॅकेज-०४: मे. स्ट्रॅाबॅग इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सेफ्टी सोल्यूशन्स जीएमबीएच जेव्ही.<br>कंत्राटीय किंमत: ₹ ४२७ कोटी<br>• अग्निशमन आणि मदत कार्यासाठी वाहन (Fire And Rescue Vehicle) आणि रुग्णवाहिका पुरविणे या कामाकरीता मे. आर्यन पंप्स आणि इन्वायरो सोल्युशन्स प्रा.लि.<br>कंत्राटीय किंमत : ₹. ६२ कोटी (वस्तू व सेवा कर वगळून)<br>• प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्ती या कामाकरीता मे. गवार कन्सट्रंक्शन लि. या कंत्राटदारास दि.१५/०३/२०२४ रोजी स्वीकृती पत्र देण्यात आले आहे.<br>• कंत्राटीय किंमत : ₹. १४०.२० कोटी (वस्तू व सेवा कर वगळून) |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | २३ मार्च, २०१८ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | सदर प्रकल्पाचे काम दि.०५/०१/२०२४ रोजी पूर्ण झाले असून, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत प्रकल्प पूर्णत्वाचा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • अग्निशमन आणि मदत कार्यासाठी वाहन (Fire And Rescue Vehicle) आणि रुग्णवाहिका पुरविणे तसेच प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्ती ही कामे प्रगतीपथावर आहे. |
| ७. | **अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | सदर प्रकल्प पूर्ण करुन, प्रकल्पाचे उद्‌घाटन मा. प्रतंप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि.१२/०१/२०२४ रोजी करण्यात आले असून, प्रकल्प रहदारीसाठी दि.१३/०१/२०२४ रोजी पासून खुला करण्यात आला आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | • कंत्राटदारांची देयके अदा करणे.<br>• अग्निशमन आणि मदत कार्यासाठी वाहन (Fire And Rescue Vehicle) आणि रुग्णवाहिका पुरविणे.<br>• प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीची कामे. |

८. **अंदाजित खर्च-२०२५-२६** **(रुपये कोटीत)**

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **८१७.००** | **६०४.५८** | **४४.००** |

९ **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

*****

## अभियांत्रिकी विभाग – ७ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **महापौर निवासस्थानाच्या परिसरात मा. स्व.बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे बांधकाम करणे टप्पा-१** |
| २. | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये** | : | प्रस्तावित कामास अवर सचिव नगर विकास विभागाचे पत्र क्र. एम एम आर डी-३३१९/प्र.क्र.३४/नवि-०७, दि. २८ मे, २०१९, रोजीच्या पत्रान्वये बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाच्या बांधकामाचे काम हाती घेण्यात आले. नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एम आरडी-२०१८/प्र.क्र. १४७/नवि-०७, दि. २० फेब्रुवारी २०१९ अन्वये ₹.१०० कोटी इतकी रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली होती. त्यास अनुसरुन, सुधारीत प्रकल्प प्रस्तावामुळे खर्चात वाढ होत असल्याने, सदर प्रकल्पास नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एमआरडी-२०१८/प्र.क्र. १४७/नवि-७, दि. १६ मार्च, २०२१ अन्वये टप्पा १ ₹.२५० कोटी व टप्पा २ ₹. १५० कोटी असे एकूण ₹. ४०० कोटी या शासन निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान झालेली आहे.<br>शासनातर्फे स्मारकाच्या बांधकामासाठी महापौर निवासस्थानाची निवड करण्यात आलेली असून, अस्तित्वातील महापौर निवासस्थानाचे वारसा संवर्धन व जतन करणे, इंटरप्रिटेशन सेंटर बांधणे, प्रशासकीय इमारत, प्रवेशद्वार इमारत इत्यादींचा समावेश आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | टप्पा-१ या कामा करीता टाटा प्राजेक्ट्स लि. या कंपनीस दि.२४/०३/२०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले.<br>प्रकल्पाची किंमत- ₹. १८०.९९ कोटी<br>टप्पा-१ या कामा करीता मे.आभा नरेन लांबा असोसिएट्स, सल्लागार या कंपनीस दि. २१/०७/२०२० कार्यारंभ आदेश देण्यात आले.<br>आजतागायत अदा केलेली रक्कम- ₹. २२९.४७ कोटी<br>शिल्लक रक्कम- ₹. २०.५३ कोटी |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | दि. ०१/०४/२०२१, रोजी पासून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | सदर कामास दि.३१ मार्च, २०२३ रोजी पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. प्रथम मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात आलेला असल्याने, दि.१५जानेवारी,२०२४ रोजी पर्यंत द्वितीय मुदतवाढ व दि.३० जून,२०२४ रोजी पर्यंत तृतीय मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी सदर काम दि. १५ नोव्हेंबर, २०२४ रोजी पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | असल्याने, सल्लागारामार्फत शिफारस केल्यानुसार चतुर्थ मुदतवाढ देण्याचे प्रस्तावित आहे.<br>**<u>टप्पा १</u>**<br>१. महापौर निवासस्थान इमारतीचे वारसा संवर्धन व जतन करण्यांतर्गत ९८.००% काम पूर्ण.<br>२. इंटरप्रिटेशन सेंटरचे ९८.००% काम पूर्ण.<br>३. प्रवेशद्वार इमारतीचे ९८.०० % काम पूर्ण.<br>४. प्रशासकीय इमारतीचे ९९.००% काम पूर्ण.<br>५. बाहय विकास ९६% कामे पूर्ण. |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | टप्पा-१ चे प्रत्यक्ष बांधकाम व पायाभूत सेवांची कामे माहे नोव्हेंबर,२०२४ रोजी पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | टप्पा -२ ची कामे माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत प्रगतीपथावर राहतील. |

८. **अंदाजित खर्च-२०२५-२६** (रुपये कोटीत)

| | **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|---|
| | **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५\-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **टप्पा-१** | **२०.००** | **३६.२७** | **५.००** |

९. **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

*****

## अभियांत्रिकी विभाग – ८ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पुनर्वसन वसाहतीतील रहिवाश्यांसाठी जीवनोपयोगी आवश्यक सुविधा पुरविणे. (R&R)** |
| २. | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत सुमारे ५५,००० कुटुंबे बाधित होत असून त्यांच्या पुनर्वसनासाठी मानखुर्द, आणिक, वाशिनाका, चेंबूर, पांजरपोळ, मजास, तुंगवा, पूनमनगर, अंजनीकुमार, आजगावकर प्लॉट, नेर्लोन नेस्को, ओशिवरा, गोरेगांव, बोर्ला कांजूरमार्ग (पूर्व) व कांजूरमार्ग (पश्चिम) एचडीआयएल संकुल किरोळ गाव, कुर्ला (पश्चिम) अशा ५१ वेगवेगळया ठिकाणी पक्कया सदनिका व एस. आर.ए. योजनेअंतर्गत टी.डी. आर. आधारीत इमारतींचे बांधकाम करणे आणि इमारतींचे दुरुस्ती व देखभाल करणे बांधण्यात आल्या आहेत. प्रत्येक रहिवाशी वसाहतीमध्ये सुमारे १००० ते २०००० पर्यंत लोकवस्ती आहे. विकास नियमावली क्र. ३३ (१०) परिशिष्ट ४ तरतूद क्र. ८.१ नुसार वरील रहिवासी संकुलामध्ये १०० घरामागे प्रत्येकी एक या प्रमाणात बालवाडया व कल्याण केंद्रे तसेच सोसायटी कार्यालय एवढयांचीच सुविधा विकासकामार्फत उपलब्ध झालेल्या आहेत. प्रकल्पग्रस्तांनी मागणी केल्यानुसार तसेच मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी शासनाने नियुक्त केलेल्या स्वंतत्र नियंत्रण यंत्रणेच्या अध्यक्षांनी शिफारस केल्यानुसार प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात आलेल्या वसाहतीत रस्ते, दिवाबत्ती, विविध दुरुस्त्या, पाण्याच्या टाक्यांची दुरुस्ती किंवा नवीन बसविणे, मलनिस:रण वाहिनीच्या दुरुस्त्या, PVC पाईप बसविणे तसेच वसाहतीमध्ये म.न.पा.च्या विविध कामासाठीच्या तरतुदी व सर्व वसाहतीत आरोग्यासाठी विविध कामे व सुविधा उपलब्ध करुन देणे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे /** | | सोबत तक्ता जोडला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | **सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | एप्रिल, २००८ कामास सुरुवात |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | कामे अव्याहत सुरु राहतील |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | १) PVC पाईप बसविणे<br>२) नाल्यांची सफाई व दुरुस्ती<br>३) मलनि:स्सारण वाहिनीच्या दुरुस्त्या<br>४) दिवाबत्ती<br>५) उदवाहनांच्या दुरुस्त्या<br>६) सोसायटी कार्यालय व बालवाडी यांची दुरुस्ती कामे<br>७) वितरीत केलेल्या सदनिकांमध्ये राहण्यायोग्य आवश्यक दुरुस्त्या<br>८) पाण्याच्या टाक्याची दुरुस्ती किंवा आवश्यक असल्यास नवीन बसविणे.<br>९) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेद्वारे मिळालेल्या सदनिकांची राहण्यायोग्य दुरुस्तीची सर्व कामे<br>१०) एस. आर.ए. योजनेअंतर्गत टी.डी. आर. आधारीत इमारतींचे बांधकाम करणे आणि इमारतींचे दुरुस्ती व देखभाल करणे |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | १) PVC पाईप बसविणे/CP Fitting, टाईल्स बसविणे.<br>२) नाल्यांची एकवेळेस कामा अंतर्गत सफाई व दुरुस्ती कामे.<br>३) गरजेनुसार वसाहतीतील रस्ते दुरुस्ती<br>४) मलनि:स्सारण वाहिनीच्या दुरुस्त्या / बदलणे व वृध्दीकरण नूतनीकरण कामे<br>५) नवीन हस्तांतरणाच्या सदनिका गळती व प्रतिबंधक कामे<br>६) दिवाबत्ती<br>७) उदवाहनांच्या दुरुस्त्या<br>८) सोसायटी कार्यालय व बालवाडी यांची सामाजिक विकास कक्षाच्या प्रस्तावानुसार दुरुस्ती<br>९) वितरीत केलेल्या सदनिकांमध्ये आवश्यक दुरुस्त्या<br>१०) पाण्याच्या टाक्याची दुरुस्ती किंवा नवीन बसविणे<br>११) वसाहतींच्या आवारात पेव्हर ब्लॉक्स / कॉंक्रिटीकरण करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १२) पावसाळी गटारांची सफाई व दुरुस्तीची कामे करणे<br>१३) अस्तित्वात असलेल्या सिव्हरेज ट्रिटमेंट प्लान्ट (STP) चे वार्षिक देखभाल, दुरुस्त्या व नवीन S.T.P. चे बांधकाम करणे.<br>१४) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेद्वारे नविन मिळालेल्या सदनिकांची दुरुस्ती व नुतनीकरणाची सर्व कामे<br>१५) इमारतींच्या गच्चीच्या जलरोधीकरणाची कामे<br>१६) एस. आर.ए. योजनेअंतर्गत टी.डी. आर. आधारीत इमारतींचे बांधकाम करणे आणि इमारतींचे दुरुस्ती व देखभाल करणे |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **१५०.००** | **२६०.००** | **२६५.८०** |

**९. योजना अंमलबजावणीकरणारी संस्था :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

*****

## अभियांत्रिकी विभाग — ९ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | **मुंबई पारबंदर प्रकल्पावरील वाहतूक निर्गमनाकरिता मुंबईकडील बाजूस वरळी ते शिवडी (पूर्व-पश्चिम) उन्नतमार्ग बांधणे.** |
| २. | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उददिष्टे** | : | मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या मुंबई बाजूकडील वाहतूक विकीरणाचा (traffic dispersal) भाग म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शिवडी ते वरळी उन्नतमार्गाची अंमलबजावणी करण्याचे ठरविले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३२व्या बैठकीत सदर कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. शिवडी ते वरळी उन्नतमार्ग शिवडी रेल्वे स्थानकाच्या पूर्वेपासून आचार्य दोदे मार्ग, जगन्नाथ भातनकर मार्ग, ड्रेनेज चॅनेल मार्ग यामार्गे प्रभादेवी येथील नारायण हर्डीकर मार्गापर्यंत प्रस्तावित आहे. सदर ४ मार्गिकांच्या या उन्नत मार्गाची लांबी सुमारे ४.३ कि.मी. आहे. या उन्नत मार्गावर शिवडी रेल्वे स्थानकाजवळ हार्बर व मुंबई पोर्ट ट्रस्ट रेल्वेवर आणि एल्फिन्स्टन रोड येथे मध्य व पश्चिम रेल्वेवर रेल्वे ओलांडणी पुल (Rail Over Bridge-ROB) बांधणे प्रस्तावित आहे.<br><br>प्रकल्पाकरिता मे. स्टूप कन्सल्टंट यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर कामाकरीता कंत्राटदार मे. जे. कुमार इन्फ्रापोजेक्टस लि. यांना कंत्राट देण्यात आले आहे. सद्य:स्थित ५८% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | MMRDA/ED/SWEC/TN/१७९०/Work Oder/०००३/२०२१/ Dtd. १३.१०.२०२३<br>१०५१.८६ कोटी<br>१६०५.४१ कोटी<br>- मे.जे. कुमार इंफ्राप्रोजेक्टस लि.<br>- मे. अस्सिटम स्टूप<br>५९३.७९ कोटी<br>७६३.३८ कोटी |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | जानेवारी, २०२१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | जानेवारी, २०२६ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | प्रकल्पाकरिता मे.जे. कुमार इन्फ्रापोजेक्टस लि. यांची कंत्राटदार म्हणून जानेवारी, २०२१ मध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत ५८% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | सदर प्रकल्प जानेवारी – २०२६ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित आहे. |

| ८. **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| | **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **६००.००** | **२४४.००** | **५७८.५०** |

९. **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

*****

## अभियांत्रिकी विभाग – १० (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | **मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहय क्षेत्रातील रस्त्यांची सुधारणा करणे (OARDS)** |
| २. | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | ठाणे, पालघर व रायगड जिल्हा अंतर्गत असणाऱ्या गावातील रस्ते सुधारण्याच्या दृष्टीकोनातून तसेच सार्वजनिक वाहतुक बळकट करण्यासाठी सदर योजना ही सन १९८६-८७ पासून प्राधिकरणाने सुरू केली होती. तद्नंतर सदर योजनेंतर्गत जिल्हा परिषद व नगर परिषद यांच्यासारख्या कार्यान्वित स्वराज्य संस्थांना प्राधिकरणाच्या निधीतून, अंदाजित खर्चाच्या ७५% अनुदान देऊन रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात यावी असा निर्णय प्राधिकरणाच्या दि. १२ मार्च, १९९८ रोजी झालेल्या ९२व्या बैठकीत ठराव क्र.७७९ अन्वये घेण्यात आला. त्यापुढे प्राधिकरणाच्या ९७ व्या बैठकीत अनुदान रक्कम मर्यादा ७५% वरुन ९०% पर्यंत वाढविण्यात आली. प्राधिकरणाच्या दि. २८ सप्टेंबर, २०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीमध्ये सदर योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना मान्यता देण्याबाबतचे सर्व अधिकार मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आले. प्राधिकरणाच्या दि. १९ ऑक्टोबर २०१६ रोजी झालेल्या १४१व्या बैठकीत सदर अनुदान हे ९०% वरुन १००% इतके देण्यास मान्यता देण्यात आली. तद्नंतर प्राधिकरणाच्या दि.२९ मार्च, २०१७ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १४२ व्या बैठकीत ठराव क्र.१४१२ अन्वये निर्णय झाला की, *'सध्या सुरू असलेल्या बाहय क्षेत्रातील रस्ते विकास योजनेच्या अंतर्गतची रु. ५ कोटी पेक्षा कमी किंमतीची कामे नगर परिषद किंवा जिल्हा परिषद मार्फत राबवून घेण्याऐवजी गरजेनुसार राज्य शासनाच्या सिडको, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत "ठेवी तत्वावर" करून घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, प्राधिकरण/महानगर आयुक्त यांना देण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.'*<br>दि. ०१ एप्रिल, २०१६ पासून स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार प्राधिकरणाने सुमारे रु.१७३० कोटी किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यापैकी आजतागायात सुमार रू. १०३० कोटी इतका खर्च झालेला आहे. मंजूर कामांपैकी काही कामे प्रगतीपथावर तर बहुतशः कामे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | हाती घेण्याचे स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत प्रस्तावित आहेत. तद्नंतर मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत मागणीनुसार सुमारे रू. १४७८ कोटी इतक्या रक्कमेच्या एकूण ६९० कामांचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांच्याकडे मान्यतेस ठेवण्यात आला होता. त्यापैकी रु.१३६३ कोटी इतक्या किंमतीच्या कामांचे प्रस्ताव सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात उपलब्ध निधी व मंजूर कामे यांचा विचार करता या वर्षासाठी स्थगिती देण्यात आली आहे. उर्वरित रु. ११४ कोटी किंमतीचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांचेकडे प्रस्ताव सादर आहे.<br>तसेच सुमारे रू.१८८० कोटी इतक्या किंमतीच्या १२२५ कामांची मागणी प्राधिकरणाकडे मान्यतेस्तव प्रलंबित आहेत. मागणी केलेल्या एकूण कामांपैकी सुमारे ७५% कामे ही रू.५कोटीच्या आतील आहेत. सबब मंजूर धोरणानुसार रू.५ कोटीपर्यंत किंमतीची कामे ही स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत राबविण्यात येतात. सदर योजनेअंतर्गत रु.५ कोटी पेक्षा जास्त किंमतीची कामे प्राधिकरणामार्फत करण्यात येतात. प्राधिकरणाकडे एवढ्या लहान व दूरवर विखुरलेल्या कामांकरीता पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे सदर कामे प्राधिकरणामार्फत सल्लागाराची व कंत्राटदाराची नियुक्ती करून प्रचलित पद्धतीनुसार हाती घेण्यात येतात.<br>**ठाणे जिल्हा :-**<br>१. कल्याण तालुका ३७ कामे- किंमत रु. ५९.६७ कोटी.<br>२. अंबरनाथ तालुका ४३ कामे- किंमत रु. ७३.४४कोटी.<br>३. भिवंडी तालुका ३२ कामे – किंमत रु ७७.३४ कोटी.<br>४. कुळगाव बदलापूर नगरपरिषद ८३ कामे – किंमत रु २१३.१९ कोटी.<br>५. ठाणे तालुका – १३ कामे- किंमत रु. ६५.०० कोटी<br><br>सदर २०८ कामांपैकी, १० कामे पूर्ण, ३ कामे रद्द, ६५ कामे प्रगतीपथावर असून, २ कामे निविदा स्तरावर, उर्वरित १२८ कामे अंदाजपत्रक स्तरावर आहेत.<br>**रायगड जिल्हा :-** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १. कर्जत तालुका ४२ कामे – किंमत रु. ५५.०० कोटी.<br>२. अलिबाग तालुका ६१६ कामे – किंमत रु. १६५.७५ कोटी<br>३. पनवेल, उरण, खालापूर तालुका १९३ कामे – किंमत रु. १०८.०६ कोटी.<br>४. कर्जत नगरपरिषद ९ कामे -किंमत रु ४६.१३ कोटी.<br>५. पेण नगरपरिषद २१ कामे – किंमत रु. ९४.३८ कोटी.<br>सदर ८८१ कामे किंमत रु.४६९.३२ कोटी कामांपैकी कर्जत तालुक्यातील १५ कामे पूर्ण व १६ कामे प्रगतीपथावर आहेत, १ अंदाजपत्रक स्तरावर, १ निविदा स्तरावर व उर्वरित १० कामांना स्थगिती दिलेली आहे. अलिबाग तालुक्यातील ६१३ कामांपैकी २० कामे पूर्ण, ५९१ कामे प्रगतीपथावर व तसेच २ कामे अंदाजपत्रक स्तरावर पनवेल, उरण व खालापूर तालुक्यातील १९३ कामांपैकी १० कामे पूर्ण झालेली आहेत. ९२ कामे प्रगतीपथावर असून उर्वरित ९१ कामे अंदाजपत्रक स्तरावर आहेत.<br>कर्जत नगरपरिषदेतील ९ कामे किंमत रु. ४६.१३ कोटी कामांपैकी ४ कामे किंमत रू. १७.८० कोटींची कामे प्रगतीपथावर असून उर्वरित ५ कामे २८.३३ कोटींच्या कामांना स्थगिती दिलेली आहेत. पेण नगरपरिषदेतील २१ कामे किंमत रु ९४.३८ कोटी कामांपैकी ९ कामे किंमत रु ४०.३८ कोटी कामे प्रगतीपथावर असून उर्वरित १२ कामे किंमत रु. ५४.०० कोटी कामे अंदाजपत्रक स्तरावर आहेत.<br>**पालघर जिल्हा :-**<br>पालघर जिल्ह्यातील वसई व पालघर तालुक्यातील ४० कामे किंमत रु २९.०५ कोटींच्या कामांना मंजुरी प्राप्त असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. २ कामे किंमत रु. ६.०० कोटींची कामे अंदाजपत्रक स्तरावर आहेत. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | अनुदानाबाबतच्या कामांची सदर माहिती निरंक तसेच प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या कामांची माहिती निरंक |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | १९ ऑक्टोंबर २०१६ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख,** | | ३१ डिसेंबर २०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | **कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | | |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | ठाणे जिल्ह्यातील २०८ कामांपैकी ६५ कामे हाती घेतलेली असून उर्वरित १२८ कामे निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रगतीपथावर असतील. तसेच रायगड जिल्हयातील ८८१ कामांपैकी ४५ कामे पूर्ण झालेली असून ९२ कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरित ७४४ कामे निविदा प्रक्रियाअंती प्रगतीपथावर असतील. त्याचप्रमाणे पालघर जिल्ह्यातील कामे प्रगतीपथावर २ मंजूर कामे निविदा प्रक्रियाअंती प्रगतीपथावर असतील. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | सन २०१६ ते सन- २०२३ मधील ₹.५ कोटीपेक्षा कमी किंमत असलेल्या कामांना कामाच्या प्रगतीनुसार व पूर्णतेनुसार जिल्हापरिषद, नगरपरिषदांना अनुदान मंजूर करून वितरीत करण्यात येईल. तसेच रु. ५ कोटी पेक्षा जास्त रक्कमेच्या मंजूर कामासाठी जागा व निधी उपलब्धतेनुसार सल्लागार व कंत्राटदाराची नियुक्ती करून प्राधिकरणामार्फत कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. |
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| तपशील | २०२४-२०२५ मूळ अंदाज | २०२४-२०२५ (सुधारीत) | २०२५-२०२६ अपेक्षित अंदाज |
|---|---|---|---|
| **प्रकल्प खर्च** | **२५.००** | **२१.००** | **३५.००** |

९. **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** :

१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
२) ठाणे जिल्हापरिषद
३) रायगड जिल्हापरिषद
४) पालघर जिल्हापरिषद
५) अंबरनाथ नगरपरिषद
६) कुळगाव-बदलापुर नगरपरिषद
७) पेण नगरपरिषद
८) कर्जत नगरपरिषद
९) अलिबाग नगरपरिषद
१०) उरण नगरपरिषद
११) खोपोली नगरपरिषद
१२)पनवेल महानगरपालिका (पूर्वीची पनवेल नगरपरिषद)
१३) सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे

*****

# अभियांत्रिकी विभाग - ११ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचे कुर्ला (सी.एस.टी. रोड) ते वाकोला पूलापर्यंत विस्तारीकरण करणे तसेच वांद्रे-कुर्ला संकुल ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत उन्नत मार्ग बांधणे भाग-I, भाग-II.** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दीष्टे** | : | पुर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गांना जोडणारा सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता ६.४५ की.मी. लांबीचा आहे यापैकी ३.४५ कि.मी. रस्ता ४५.७ मी. इतका रुंद करण्यात आला आहे. मुंबई उपनगरातील पूर्व-पश्चिम वाहतुकीची घनता या मार्गावर दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे उर्वरीत ३ कि.मी. मार्गावर असलेल्या तीन जंक्शनवर वाहतुकीची कोंडी होत असुन वांद्रे-कुर्ला जंक्शन ते वाकोला जंक्शनपर्यंत जाण्यासाठी वाहनांना बराच वेळ लागत आहे. सदर तीन जंक्शन खालीलप्रमाणे आहेत:-<br>• वांद्रे-कुर्ला संकुल जंक्शन<br>• मुंबई युनिव्हर्सिटी जंक्शन/आंबेडकर चौक<br>• वाकोला जंक्शन<br>सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचे कुर्ला (सीएसटी रोड) ते वाकोला पुलापर्यंत विस्तारीकरण करण्यात येत आहे. तसेच भविष्यात वांद्रे-कुर्ला संकुलाचा होणारा विस्तार पहाता महत्वाचे आहेत. परंतू, वाकोला नाल्याच्या बाजुने वांद्रे कुर्ला संकुलातून सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यापर्यंत उन्नत मार्ग व पुढे पश्चिम द्रुतगती महामार्गास जोडणारा उन्नत मार्ग बांधण्यात येणार आले. याप्रमाणे दोन्ही कामे भाग-१ व २ प्रमाणे हाती घेण्यात आली आहेत तसेच कुर्ला ते वाकोला जंक्शन उन्नत मार्गाची (भाग-१) संकल्पना करताना बी.के.सी ते वाकोला जंक्शन (वाकोला नाल्याच्या बाजुने) उन्नत मार्ग (भाग-२) जोडण्यासाठी योग्य ते प्रयोजन केले आहे.<br><br>प्रस्तावित भाग-१ व २ या उन्नत मार्गामुळे कलानगर जंक्शन येथील वाहतुकीची कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. सद्य:स्थितीत कलानगर जंक्शन येथे एस.व्ही.रोड, वांद्रे-वरळी सी लिंक व माहीम अशी दक्षिणेकडून येणारी वाहतूक, पश्चिम द्रुतगती महामार्गवरुन उत्तरेकडून येणारी वाहतूक व सायन धारावी मार्गे पुर्वेकडून येणारी वाहतूक यामुळे ब-याच प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे व या वाहतूकीच्या कोंडीमध्ये बी.के.सी. येथून कलानगरमार्गे उत्तर व दक्षिणेकडे जाणा-या वाहतुकीची भर पडत आहे.<br>सदर प्रस्तावित उन्नत मार्गामुळे बी.के.सी. मधून कलानगर जंक्शनमार्गे पूर्व व पश्चिम उपनगराकडे होणारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वाहतुक कमी होणार आहे. तसेच सायन-धारावी मार्गावरुन पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे होणारी वाहतुकसुध्दा याच मार्गाने होणार आहे. या सर्व कारणांमुळे कलानगर जंक्शन येथील वाहतुकीची कोंडी ब-याच प्रमाणात कमी होईल.<br>सदर प्रस्तावित दोन्ही उन्नत मार्गांमुळे बी.के.सी. पासून पूर्व द्रुतगती महामार्ग व पश्चिम द्रुतगती महामार्ग यांना थेट जोडमार्ग तसेच मुंबई विमानतळ व प्रस्तावित नवी मुंबई विमानतळ यांच्यासाठी थेट जोडरस्ता तयार होणार आहे. भविष्यात वांद्रे-कुर्ला संकुल येथे होणारा विस्तार पाहता बी.के.सी. पासून अशा प्रकारे तयार होणा-या जोडणीचा ब-याच प्रमाणात फायदा होणार आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | सोबत तक्ता जोडला आहे. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | भाग - १-ऑक्टोबर, २०१६<br>भाग - २- ऑक्टोबर, २०१७ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | भाग -१ - मार्च २०२५<br>भाग -२ - जून, २०२५ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | अद्यापपर्यंत भाग-१ चे ९५% काम पूर्ण झाले आहे. भाग-२ चे ९३% काम पूर्ण झाले असून माहे डिसेंबर, २०२४ पर्यंत उर्वरीत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | मार्च, २०२५ पर्यंत भाग-१ व भाग-२ जून २०२५ चे १००% काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | (रुपये कोटीत) |

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| **३५.८४** | **२४४.९२** | **७५.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

*****

## अभियांत्रिकी विभाग – १२ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **मुंबई महानगर प्रदेशातील संवृद्धीविकास केंद्रामध्ये (ग्रोथ सेंटर) पायाभूत सुविधा निर्माण करणे (भु-संपादनासह).** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दीष्टे** | : | ठाणे जिल्ह्याच्या कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रामध्ये कल्याण, ग्रोथ सेंटर (Kalyan Growth Center) विकसित करण्याचे प्रयोजन आहे. या योजने अंतर्गत पायाभूत सुविधा निर्माण करणे महत्वाचे आहे. सदर पायाभूत सुविधांमध्ये रस्ते, पर्जन्यवाहीन्या, पाणीपुरवठा व मलनि:सारण वाहीनी इ. कामे करण्यात येणार आहेत. सध्य:स्थिती मध्ये परिवहन व दळणवळण विभाग व भुमी व मिळकत शाखेकडे नियोजनाचे व जागा उपलब्ध करणे ही कार्यवाही चालू आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | सोबत तक्ता जोडला आहे. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | नोव्हेंबर, २०२२ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | डिसेंबर, २०२४ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | सदर प्रकल्पांतर्गत उसरघर-निळजे-घेसर, निळजे-कोळे-हेदुटणे, हेदूटणे-माणगाव-भोपर आणि उसरघर-घारीवली या गावांना जोडणाऱ्या चार रस्त्यांचे कॉंक्रीट रस्ता, पर्जन्यवाहीनी, पदपथ आणि अनुषंगिक बांधकाम करणे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | सद्य:स्थितीत भूमी व मिळकत शाखेकडून उपलब्ध झालेल्या जागेवर प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागाकडून रस्त्याचे १९% काम पूर्ण झाले असून २०२५-२०२६ या वर्षामध्ये उर्वरित जागेचे भूसंपादन करुन रस्त्यांची कामे पूर्ण करणे. |
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | (रुपये कोटीत) |

| खालील वर्षाचा अंदाजित खर्च | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **२५०.००** | **५००.६१** | **७००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

## अभियांत्रिकी विभाग - १३ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | **पूर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथील वाहतूक सुधारणा प्रकल्प** |
| २. | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता व पूर्व मुक्त मार्ग या रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या दोन्ही रस्त्यांवरील वाहतुक पूर्व द्रुतगती महामार्गावरील घाटकोपर (पूर्व) येथील छेडानगर जंक्शन येथे मिळते. या दोन्ही रस्त्यांवरील वाहतुकीचे प्रमाण फार मोठे असून त्यात पूर्व द्रुतगती महामार्गावरील वाहतुक देखील मिळत असल्याने छेडानगर जंक्शन येथे मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. या समस्येवर उपाययोजना म्हणून छेडानगर जंक्शन येथे वाहतुक सुधारणा प्रकल्प राबविण्यात येत आहे.<br>या प्रकल्पांतर्गत शीव-ठाणे दिशेकडील वाहतुकीकरिता उड्डाणपूल, मानखुर्द-ठाणे दिशेकडील वाहतुकीकरिता दुस-या पातळीवरील उड्डाणपूल, अस्तित्वातील छेडानगर उड्डाणपुलास अमर महल उड्डाणपुलाशी जोडणारा उन्नतमार्ग अणि रमाबाई नगर येथे वाहतुकीकरिता भुयारी मार्ग या कामांचा समावेश आहे. या प्रकल्पाकरिता रु. २४९ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | कार्यारंभ दिनांक – २९/०६/२०१८<br>कामाची किंमत ₹.२४९ कोटी<br>कंत्राटदार - मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्ट<br>सल्लागार - मे. स्पेक्ट्रम कन्सल्टंट<br>आजतागायत अदा केलेली रक्कम - रु. २०६.४५ कोटी<br>शिल्लक रक्कम - रु.१७.४० कोटी |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | जून, २०१८ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | डिसेंबर, २०२४ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | काम पूर्ण होणे अपेक्षित |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | काम पूर्ण. |

| | | | |
|---|---|---|---|
| **८.** | **अंदाजित खर्च-२०२४-२५** | | (रुपये कोटीत) |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२३-२०२४<br>मूळ अंदाज** | **२०२३-२०२४<br>(सुधारीत)** | **२०२४-२०२५<br>अपेक्षित अंदाज** |
| **१५.००** | **४२.९०** | **१.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | **:** | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

******

## अभियांत्रिकी विभाग — १४ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **पूर्व द्रुतगती मार्गाची देखभाल व दुरूस्ती** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | पुर्व द्रुतगती महामार्गावरील देखभाल व दुरूस्तीची विविध कामे करणे जसे,<br>१) पावसाळ्यापूर्वी नाले सफाई व गाळ काढणे<br>२) मुख्य मार्गिका व सेवा रस्त्यावर पावसाळ्यापूर्वी दुरूस्ती करणे, पावसाळ्यादरम्यान पडलेले खड्डे बुजविणे तसेच पावसाळ्यानंतर मार्गिकेची दुरूस्ती करणे.<br>३) पर्जन्यजल वाहिन्यांची दुरूस्ती करणे.<br>४) वार्षिक देखभाल व दुरूस्ती अंतर्गत मुख्य मार्गिका व सेवा रस्त्यावरील मध्य दुभाजक व झाडे यांना रंगरंगोटी करणे, इ.<br>५) रस्त्यावरील इतर संकीर्ण कामे तसेच सल्लागाराची नियुक्ती. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत मुख्य मार्गिका व सेवा रस्त्यावरील मध्य दुभाजक व झाडे यांना रंगरंगोटी करणे, पावसाळ्यापूर्वी नाले, पर्जन्यजल वाहिन्यांची दुरुस्ती करुन गाळ काढणे व साफसफाई इ. करिता प्रशासकीय मान्यता प्राप्त, निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदाराची नेमणूक करण्याची प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. अद्याप कंत्राटदाराची नेमणूक केलेली नाही. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | माहे एप्रिल, २०२५ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | | महे मार्च, २०२६ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | - पावसाळ्यापूर्वीची नाले सफाई व गाळ काढणे काम पूर्ण<br>- पावसाळया दरम्यान पडलेले खड्डे बुजविणेचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच पूर्व द्रुतगती महामार्ग भाग-५चे देखभाल व दुरुस्ती करणे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये पूर्व द्रुतगती महामार्ग सायन जंक्शन ते जुना जकात नाका, मुलुंड हा प्राधिकरणातर्फे बृहन्मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | महानगरपालिकेस दि. २९/११/२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस पुढील विकास, विस्तार, नुतनीकरण, देखभाल व दुरूस्ती, इत्यादी बाबींसाठी कायमस्वरूपी हस्तांतरीत करून घेण्यात आलेला आहे. तथापि जुना जकात नाका, मुलूंड ते गोल्डन डाईज जंक्शन, माजीवडा, ठाणे (भाग-५) हा रस्ता ठाणे महानगरपालिका यांचेमार्फत हस्तांतरण करुन घेण्यात आलेला नाही. यास्तव सदर लांबीच्या रस्त्याची देखभाल व दुरूस्तीची कामे प्रगतीपथावर आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **८.** | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | (रुपये कोटीत) |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१०.००** | **३३.५८** | **८.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | **:** | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## अभियांत्रिकी विभाग - १५ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **पश्चिम द्रुतगती मार्गाची देखभाल व दुरूस्ती** |
| २. | **चालू योजना / नविन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करायची उद्दिष्टे** | : | पश्चिम द्रुतगती मार्गावरील विविध देखभाल व दुरूस्तीची कामे करणे जसे,<br>- जनता कॉलनी आणि पारसी पंचायत वाहन भुयारी मार्ग ५ टप्पे पुर्ण करणे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | सोबत जोडले आहे. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | ०७/०३/२०१९ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | ३१/१२/२०२५ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | जनता कॉलनी आणि पारसी पंचायत वाहन भुयारी मार्ग पुर्ण करुन वाहतुकीस खुला करण्यात येईल. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | पश्चिम द्रुतगती मार्गावरील विविध देखभाल व दुरूस्तीची कामे करणे जसे, जनता कॉलनी आणि पारसी पंचायत वाहन भुयारी मार्ग पुर्ण करुन वाहतुकीस खुला करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | (रुपये कोटीत) |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **५.००** | **२५.८६** | **०.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

*****

## अभियांत्रिकी विभाग – १६ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **वडाळा भारवाहक तळ येथील नियोजित इमारतीचे बांधकाम** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | स्थगित |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे.** | : | बॉम्बे गुडस ट्रान्सपोर्ट असोशिएशन (बीजीटीए), महासंघ व इतर भाडेपट्टेदारांना वितरीत केलेल्या भूखंडाचे पुनर्स्थान निश्चयन केल्या नंतर मोक्याच्या ठिकाणची जागा प्राधिकरणास उपलब्ध होऊ शकेल. या प्रमाणे सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली. भूखंडाचे पुनर्स्थान करण्याकरीता १.७१ हेक्टर क्षेत्र असलेला एक भूखंड वडाळा येथील सर्व्हेनं. ८ चा भाग, प्लॉट क्र. २७ व २८ वर १,६५,००० चौ.मी. क्षेत्रफळात इमारत बांधण्याचे ठरविण्यात आले.<br>आर्किटेक्चरल स्थापत्य नियोजन व संकलन, इमारत बांधकामासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक मंजुऱ्या, अंदाजपत्रक बनविणे, मसुदा निविदा बनविणे, निविदा प्रक्रिया राबविणे व कंत्राटदार नियुक्तीकरणे, बांधकामादरम्यान पर्यवेक्षण व इमारत दोष-दायित्व कालावधीमध्ये पर्यवेक्षण करणे इत्यादी कामे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | कार्यारंभ आदेश: ED/WTT/New Bldg NIT/000817/ WO/662/17, dated 22/12/2017<br>कामाची किंमत: ₹.170,518,602.00<br>प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव: मे. स्कायलाईन आर्किटेक्ट्स<br>अद्यापपर्यंतचा खर्च: ₹. 7,136,050.00<br>उर्वरीत किमंत: सद्यस्थितीत प्रकल्प स्थगित करण्यात आलेला आहे. सल्लागाराने उपस्थित केलेल्या दाव्याबाबत कमिटी स्थापण करण्यात आलेली असून कमिटीच्या एकूण चार बैठकी झालेल्या आहेत. तसेच कमिटीमार्फत रु. १.९९ कोटीचा दावा मा. महानगर आयुक्त यांच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात आलेला आहे. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | ---- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | ---- |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | सल्लागाराची नियुक्ती केली होती व सल्लागाराकडून संकल्पचित्र आराखडे तयार करण्याची कार्यवाही चालू होती. परंतु महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने प्रकल्प सल्लागाराची सेवा दि. १०/०५/२०२१ पासून संपुष्टात आणल्या आहेत. त्या अनुषंगाने सल्लागाराने उपस्थित केलेल्या शुल्क व दावेबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | सदर प्रकल्पाची जागा मेट्रो लाईन-६ च्या कामाकरिता देण्यात आली असल्यामुळे सदर प्रकल्प स्थगित करण्यात आला आहे. |

| **८.** | अंदाजित खर्च-२०२५-२६ | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **२.००** | **१.००** | **२.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

*****

## अभियांत्रिकी विभाग — १७ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता व वांद्रा कुर्ला संकुल यांना जोडणारा ३०मी. रुंद डीपी. रस्ता** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साहय करावयाची उद्दिष्टे.** | : | वांद्रा - कुर्ला संकुलातील जी-एन विभागातील २५ मीटर रस्त्यापासून मुंबई विद्यापिठाच्या जमिनीमधून सी. एस. टी रोडला जाणाऱ्या ३० मीटर रूंद रस्त्यामुळे सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यावरून वांद्रा-कुर्ला संकुलाकडे दळणवळणासाठी थेट जोडरस्ता उपलब्ध होणार आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | अद्याप कंत्राटदाराची नियुक्ती नाही. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | २१ नोव्हेंबर, २०१८ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | प्रकल्पबाधीत घरे पुनर्वसन विभागाकडून न हटविल्यामुळे काम आहे त्या स्थितीत दि.२४/१२/२०२० रोजी अति महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने बंद करण्यात आले. |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | उपलब्ध जागेत रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | प्रकल्पबाधित घरे हटवल्यानंतर उर्वरीत काम पूर्ण करण्यात येईल. |

| ८. | अंदाजित खर्च-२०२५-२६ | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **५.००** | **४.००** | **६.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

*****

## अभियांत्रिकी विभाग – १८ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यावरील नरसी मेहता रस्त्यावर जागृतीनगर मेट्रो स्थानकाखाली पूलाचे बांधकाम. |
| २. | चालू योजना / नवीन योजना | : | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साहय करावयाची उद्दिष्टे. | : | अंधेरी -घाटकोपर जोडरस्त्यावरील नरसी मेहता रस्त्यावर जागृती मेट्रो स्थानकाखाली अंधेरी ते घाटकोपरकडे जाण्यासाठी एकपदरी वाहतूक चालू होती. तद्नंतर प्राधिकरणाकडून हे काम हाती घेऊन पूर्ण करण्यात आले. पुलाचे बांधकाम पूर्ण करुन दोन स्वतंत्र मार्गिका जाण्यासाठी व येण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत व वाहतुकीसाठी खुल्या करण्यात आल्या आहेत. |
| ४. | कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम | | Work order No. ED/viaduct/Jagruti Nagar/W.O./५५४/१९, dt ०८/०३/२०१९<br>कामाची कंत्राटीय किंमत - ₹ २०.३४ कोटी<br>कामाची सुधारीत किंमत - ₹ २८.११ कोटी<br>कंत्राटदाराचे नाव - मे. आर.ई.इन्फ्रा प्रा. लि.<br>प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव - मे. टीजीपी प्रोजेक्ट्स,<br>अद्यापपर्यंतचा खर्च - ₹ १८.४५ कोटी<br>उर्वरीत किमंत - ₹ ९.६६ कोटी |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | : | मार्च, २०१९. |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date) | : | दि.१५/०५/२०२२ रोजी काम पूर्ण झाले आहे. |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | सद्य:स्थितीत प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून वाहुकीसाठी खुला करण्यात आला आहे. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | : | -- |
| ८. | **अंदाजित खर्च** | : | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१.००** | **१.००** | **०.१५** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | योजना अंमलबजावणी करणारी संस्था | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## अभियांत्रिकी विभाग – १९ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **मुंबई विद्यापीठाच्या कलिना उपकेंद्र परिसरात पायाभुत सुविधा पुरविणे.** |
| २. | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सांताक्रुझ चेंबुर-जोडरस्त्याच्या विस्तारीकरणांतर्गत (१) वांद्रा-कुर्ला संकुल ते हंसभृगा मार्गास जोडणाऱ्या व मुंबई विद्यापीठाच्या जागेतून जाणारा १८.२० मी. रुंदीचा डी.पी. उन्नत मार्ग बांधणे व (२) वांद्रे-कुर्ला संकुलात आत व बाहेर ये-जा करण्याकरिता ३० मी. रुंदीचा अतिरिक्त डी.पी. रस्ता बांधणे ही कामे हाती घेतली असून, या कामाकरिता मुंबई विद्यापीठाची मालकी असलेल्या कलिना उपकेंद्राच्या परिसरातील एकूण २८,७४६ चौ.मी. इतकी जागा मुंबई विद्यापीठाने प्राधिकरणास हस्तांतरीत करावयाची आहे. या मोबदल्यात प्राधिकरणामार्फत विद्यापीठाच्या कलिना उपकेंद्र परिसराचा विकास करण्यासाठी पायाभूत सुविधा पुरविणेबाबत प्रस्तावित असल्याने कुलगुरु मुंबई विद्यापीठ यांनी दि. ०९/०८/२०१८ च्या पत्रान्वये याबाबत विनंती केली आहे.<br>मुंबई विद्यापीठ व प्राधिकरण यांच्यामध्ये दि.१२/०५/२०१६ रोजी सांमजस्य करार (MOU) करण्यात आलेला आहे. या करारानुसार वरील नमुद कामांकरिता जागा प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यास सहमती दर्शविलेली असून, जागेच्या मोबदल्यात प्राधिकरणामार्फत विद्यापीठाकरीता विद्यार्थी वसतीगृह इमारत, कर्मचारी वसाहत इमारत, विद्यापीठ अतिथीगृह बांधणे इत्यादी कामे प्राधिकरणामार्फत करणे प्रस्तावित आहे.<br>कुलगुरु मुंबई विद्यापीठ यांच्या दि.१०/१०/२०१८ च्या पत्रान्वये हस्तांतरीत करण्यात येणाऱ्या जमिनीच्या मोबदल्यात, जमिनीचे क्षेत्रफळ सापेक्ष विकास हस्तांतरण हक्क (TDR) विद्यापीठास देण्याविषयी विनंती केलेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २०३४ च्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन निममावलीनुसार तरतुदीच्या आधारे, विकास हस्तांतरण हक्क (TDR) च्या चालू दराने विक्री करणे प्रस्तावित आहे. विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून मुंबई विद्यापीठाच्या कलिना उपकेंद्र परिसराचा मास्टरप्लॅन बनविण्याकरिता सल्लागार कंपनीस द्यावा लागणारा अपेक्षित खर्च, विद्यापीठातील पायाभूत सुविधाकरिता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | लागणारा अपेक्षित निधी, डिपॉझिट कामे व प्राधिकरणास द्यावा लागणारा सेंटज खर्च भागविणे इ. सामंजस्य करारामध्ये (MOU) नमुद आहे.<br>तसेच विद्यापीठाकडून प्राप्त माहितीनुसार, कलिना येथे अपूर्णावस्थेत असलेली कामे पूर्ण करण्याकरिता अपेक्षित खर्च रु. ५१.३७ कोटी (चालू कामाचे सुधारीत दर) आहे. नॅक समिती (मानांकन संबंधित क्रेडिट स्कोर) च्या प्रस्तावित भेटीच्या दृष्टीने कलिना उपकेंद्रात पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा, रस्ते, इमारती वर्ग, प्रयोगशाळाच्या दुरुस्त्या/नुतनीकरणासाठी व नवीन इमारती इत्यादी कामांसाठी येणारा खर्च ढोबळ स्वरुपात रु. ५० कोटी इतका अपेक्षित आहे. तसेच यामध्ये विद्यापीठाचा मास्टर प्लान तयार करणे व इतर कामे विचारात घेऊन रु. १०६.३७ कोटी इतक्या निधीची तरतुद प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ च्या सुधारीत अर्थसंकल्पात करणेबाबतची कार्यवाही करण्यात आलेली होती.<br>मुंबई विद्यापीठाच्या दि.०९/०८/२०१८ च्या पत्रान्वये प्राप्त माहितीनुसार विद्यापीठाची आर्थिक व अपुरा उपलब्ध निधी विचारात घेता, अपूर्ण राहीलेली कामे व नवीन प्रस्तावित कामे याकरिता पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने, कामाची निकड लक्षात घेता अपूर्ण राहीलेली कामे व प्रस्तावित नवीन कामे प्राधिकरणामार्फत पूर्ण करणे प्रस्तावित आहे. सदर कामासाठी लागणारा अपेक्षित खर्चाचा वाटा प्राधिकरणामार्फत उचलण्यात येणार आहे. याबाबत मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी वरील नमुद कामाकरिता लागणाऱ्या रु.१०६.३७ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता दिली असून, याबाबत प्राधिकरणाच्या दि.२१/११/२०१८ रोजी झालेल्या १४६व्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | अद्याप कंत्राटदाराची नियुक्ती नाही. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | मुंबई विद्यापीठाकडून प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर कामे हाती घेण्यात येतील. |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख,** | : | ---- |

| | | | |
|---|---|---|---|
| | **कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | | |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | विद्यापीठामार्फत पत्रान्वये कळविण्यात आल्याप्रमाणे कलीना उपकेंद्रातील अंतर्गत रस्त्याची सुधारणा व सुशोभिकरण करण्याचे कामे पूर्ण झालेली आहेत. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | सल्लागाराकडून प्राप्त आराखडयानुसार परिसराचा विकास व विद्यापीठास अभिप्रेत असलेली इमारतीची बांधकामे व इतर सुचविण्यात आलेली आवश्यक दुरुस्ती / नुतनीकरणाची कामे करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१०.००** | **७.४०** | **१०.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | **:** | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

*****

## अभियांत्रिकी विभाग — २० (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक** |
| २. | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये** | : | ब) शासनाने आपल्या दिनांक १९ मार्च, २०१३ रोजीच्या अधिसूचने अन्वये इंडिया युनाइटेड मिल (इंदू मिल) क्र. ६, नगर रचना योजना क्र. ४, माहिम येथील अंतिम भूखंड क्र. ११६३ या अंदाजे ४.८४ हेक्टर जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेबआंबेडकर यांच्या भव्य स्मारकाच्या विकासासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१ बी) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे.<br>ब) या अनुषंगाने शासनाने दिनांक २० एप्रिल, २०१३ रोजी दिलेल्या निर्देशानुसार प्राधिकरणाने आंतरराष्ट्रीय स्पर्धा घेऊन स्मारकाची संकल्पचित्र तयार करण्यासाठी वास्तुशास्त्रज्ञांची शासनाच्या पूर्व मान्यतेने निवड करणे, निवडलेल्या वास्तुशास्त्रज्ञांमार्फत संकल्प चित्रे विस्तृत नकाशे तयार करून घेणे व त्यास शासनाची मान्यता घेऊन नियोजन प्राधिकरण म्हणून विकास प्रस्तावास मान्यता देणे, मान्य केलेल्या संकल्पचित्र, विस्तृत नकाशे इत्यादिच्या आधारे अंदाजपत्रे तयार करणे व त्यास प्रशासकीय मान्यता देऊन निविदा प्रक्रियेत सुयोग्य अभिकर्त्यांची निवड करणे, शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग करून त्याचे लेखे ठेवणे व विकसनाच्या संपूर्ण कामावर संनियंत्रण ठेऊन सदर प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घेणे इत्यादि जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या आहेत. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | Work order No. ED/INDU Mill/Dr. Ambedkar Memorial/WO/७३/२०१८ dtd. ०९/०२/२०१८<br>कामाची कंत्राटीय किंमत - ₹ ७६३.०५ कोटी<br>कामाची सुधारीत किंमत - ₹ १०८९.५९ कोटी<br>कंत्राटदाराचे नाव - मे. शापुर्जी पालनजी ॲण्ड कं. प्रा. लि.मे. शापुर्जी पालनजी ॲण्ड कं. प्रा. लि.<br>प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव: मे. शशी प्रभू ॲण्ड असोशिएटस् .<br>मे. डिझाईन असोशिएटस्<br>अद्यापपर्यंतचा खर्च - ₹ ४१३.३९ कोटी<br>उर्वरीत किमंत - ₹ ६७६.२८ कोटी |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | ०९ फेब्रुवारी, २०१८ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | मार्च, २०२४ (२५फुट प्रतिकृतीस शासनाकडून मे, २०२३ मध्ये मान्यता मिळाली आहे. पुतळ्याचे काम पुर्ण करण्यासाठी २४ महिने व उर्वरीत कामे ६ महिने एकुण ३० महिन्यांच्या कालावधीत काम करण्याचे अपेक्षित दि. डिसेंबर, २०२५ आहे.) |
| ७. | **१. आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | प्राधिकरणाने सदर स्मारकाचा आराखडा तयार करण्याकरिता सल्लागारांची नेमणूक करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागारांकडून दिनांक ११ जूलै, २०१३ रोजीच्या सूचनेअन्वये स्वारस्य अभिव्यक्ती मागविल्या व उचीत कार्यवाहीनंतर राज्य शासनाच्या मान्यतेने मे. शशी प्रभू अँड असो आणि डिझाईन असो. आयएनसी यांच्या कन्सर्टीयमची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यासाठी दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी करार करण्यात आला. दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते सदर प्रकल्पाचे भूमीपूजन करण्यात आले. इंदू मिलच्या जागेचा ताबा प्राधिकरणाने दिनांक २५ मार्च, २०१७ रोजी शासनाच्या वतीने घेतला आहे.<br>तद्नंतर सदर स्मारकाचा बृहत् आराखडा अंतिम करण्यासाठी स्थापिलेल्या एक सदस्यीय समितीने स्मारकासंबंधित व्यक्ती व संस्थाशी चर्चा करून सल्लागाराकडून सुधारीत संकल्पनात्मक आराखडा तयार करून शासनास सादर केला व शासनाने सदर संकल्पनेस तत्वत: मान्यता देऊन त्याअनुषंगाने स्मारकाचा विस्तृत आराखडा, अंदाजित खर्च तयार करून बांधकामासाठी निविदा मागविण्यासंबंधी कार्यवाही करण्याचे प्राधिकरणास दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजीच्या पत्रान्वये आदेश दिले.<br>सदर प्रकल्पास दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी अभिन्यास मंजूरी व किनारतटीय नियमावलीच्या तरतूदी लागू नसलेल्या क्षेत्रामध्ये स्थित असलेल्या संशोधन केंद्राच्या इमारतीस जोत्यापर्यंत बांधकाम परवानगी (२०,००० चौ. मी. बांधकाम क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र) देण्यात आली आहे. व संपूर्ण प्रकल्पाच्या जोत्यापर्यंतच्या बांधकामास दि. २७/०८/२०१९ रोजी परवानगी देण्यात आली आहे.<br>दरम्यान प्रकल्पाच्या प्रत्येक स्तरावर देखरेख ठेवण्याकरीता दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या समिक्षेकरीता व बारकाव्यांच्या मंजूरीकरीता दिनांक २० मार्च, २०१८ रोजी समिती गठीत करण्यात आली आहे.<br>सदर कामाचे नकाशे वास्तुशास्त्रज्ञामार्फत तयार झाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन कार्यारंभ आदेश दि. ०९/०२/२०१८ रोजी देण्यात आला. कामासाठी आवश्यक परवानग्या, चाचण्या इत्यादी प्रकिया पूर्ण करण्यात आली. प्रकल्पासाठीचे बांधकाम नकाशे तसेच आवश्यक असणाऱ्या विविध मंजुऱ्या जसे आग प्रतिबंधक ना-हरकत प्रमाणपत्र, वृक्ष प्राधिकरण मंजुरी, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, वाहनतळ ना-हरकत प्रमाणपत्र, पर्यावरण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | विभागाची सी.आर.झेड परवानग्या मिळाल्या आहेत. पुतळ्याचे संपूर्ण वास्तुशिल्प योग्य स्वरूपात होण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीमार्फत २५ फुटाचे पुतळ्याच्या प्रतिकृतीची वास्तुशिल्प तयार करणेत आले आहेत. तसेच सदर २५ फुट प्रतिकृती डिसेंबर २०१९ पर्यंत अंतिम होईल. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे स्मारकातील पुतळ्याची उंची ३५० फुटावरून ४५० फुट (पायथा १०० फुट व पुतळा ३५० फुट) करण्याचे आदेश प्राप्त झाले असुनत्यानुसार सदर बदलामुळे स्मारक इमारतीचे नव्याने वास्तुशास्त्रीय व अभियांत्रिकी नकाशे आराखडे तयार करण्याबाबत प्रकल्प सल्लागार व कंत्राटदारांना त्यासाठी लागणारा अतिरिक्त खर्च, वेळ, अंदाजपत्रकासह सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. स्मारकाची उंची ४५० फुट (१०० फुटाचे पादपीठ व ३५० फुटाची पुतळ्याची उंची) केल्यामुळे सुधारीत आराखड्याप्रमाणे कराव्या लागणा-या अतिरिक्त/ वाढीव कामासाठी लागणारा खर्च तसेच मा. उप मुख्यमंत्री यांच्या दि. ०२/०१/२०२० रोजी झालेल्या क्षेत्रिय पहाणी दरम्यान व बैठकीत दिलेल्या सुचनांप्रमाणे प्रस्तावित केलेले बदल उदा. प्रवेशद्वार इमारतीची उंची वाढविणे, दरवाजे व खिडक्या यांची उंची वाढविणे, बाह्य परिक्रमा व अंतर्गत परिक्रमा यांच्या रूंदीत वाढ करणे, वृक्ष लागवडीची संख्या वाढविणे, पावसाच्या पाण्याची साठवण क्षमता वाढविणे, प्रेक्षक गृहाच्या छतावर हिरवळ लावणे, सौर्यउर्जेचे पॅनल वाढविणे इत्यादींचे रु. १६ कोटी किंमतीचे ढोबळ अंदाजपत्रक सल्लागराने प्रस्तावित केले आहे. सल्लागाराने छाननी करून सादर केलेली ढोबळ अंदाजपत्रकीय किंमत रू. ९९०.८६ कोटी प्रस्तावित करण्यात येत आहे. सदरचे अंदाजपत्रक ढोबळ (Block Estimate) अंदाजपत्रक असूनकामाचे तंतोतंत अंदाजपत्रक सविस्तर संरचनात्मक स्थापत्य रचना (Detailed Engineering Design) झाल्यानंतर काढण्यात येईल. सुधारीत संकल्पनेनुसार प्रकल्पाची अंदाजित ढोबळ किंमत (Block Estimate) रू. ९९०.८६ कोटी इतकी असुन त्यामध्ये सदर कामात प्रकल्पाच्या किंमतीच्या ५ टक्केप्रमाणे आकस्मिक खर्च (Contingency) रू. ४९.५५ कोटी व २% मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे अंमलबजावणीकरिता लागणारे शुल्क रू. १९.८१ कोटी अपेक्षित आहे. तसेच सदर कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे ३% प्रमाणे लागणारे शुल्क रू. २९.७३ कोटी इतके आहे. वर नमूद केलेल्या बाबींमुळे प्रकल्पाची सुधारीत प्रशासकीय किंमत रू. १०८९.९५ कोटी इतकी अपेक्षित आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदूमिल येथील भव्यस्मारकाच्या सुधारीत संकल्पनेचे सादरीकरण दि. १५/०१/२०२० रोजी मा. राज्य मंत्रीमंडळासमोर करण्यात आले व त्यास मान्यता दिली. त्यानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकातील पुतळ्याची उंची वाढवून पादपीठ ३० मीटर (१०० फूट) उंच व पुतळा १०६.६८ मीटर (३५० फूट) उंच अशी एकूण १३६.६८ मीटर (४५० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | फूट) उंची ठेवण्यास मान्यता देण्यात आली. मा. राज्य मंत्रीमंडळाच्या निर्देशानुसार प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीयकिंमत रू. १०८९.९५ कोटी रक्कमेस प्राधिकरणाच्या दि. ०७/०७/२०२० रोजी झालेल्या १४९ व्याबैठकीतमान्यतादेण्यात आली. तसेच सदर काम प्रकल्पाचे विद्यमान कंत्राटदार मे. शापुरजी पालनजी आणि कंपनी प्रा.लि. यांचेमार्फत करण्यासही मान्यता देण्यात आली.सुधारीत संकल्पनेनुसार प्रकल्पाचे तंतोतंत अंदाजपत्रक सविस्तर संरचनात्मक स्थापत्य रचना (Detail Engineering Design) पूर्ण झालेनंतर काढण्यासही मान्यता देण्यात आली. याव्यतिरीक्त कामाच्या कंत्राटातील तरतुदीनुसार देय असणारी भाववाढही अनुज्ञेय असेल. तसेच मूळ निविदेमध्ये अंतर्भाव नसलेल्या मुख्य प्रवेशद्वार इमारतीमधील उपहारगृह व दुकाने यांची अंतर्गत सजावट, संशोधन केंद्र (ग्रंथालय व व्याख्यानवर्ग) यातील अंतर्गत सर्व प्रकारची सजावट, तसेच स्मारक इमारतमधील संग्रहालय, कलादालन यांचे अंतर्गत सर्व प्रकारच्या सजावटींची कामे व वापरा संबंधीतील निर्देश महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर या भागांची अंतर्गत रचना व अंदाजपत्रके तयार करून स्वतंत्रपणे शासनाकडून त्यांची मंजूरी घेण्यासही मान्यता देण्यात आली. मा. राज्य मंत्रीमंडळाच्या निर्देशानुसार प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय किंमत रू. १०८९.९५ कोटी रक्कमेस प्राधिकरणाच्या दि. ०७/०७/२०२० रोजी झालेल्या १४९ व्याबैठकीतमान्यतादेण्यात आली. तसेच सदर काम प्रकल्पाचे विद्यमान कंत्राटदार मे. शापुरजी पालनजी आणि कंपनी प्रा.लि. यांचेमार्फत करण्यासही मान्यता देण्यात आली.सुधारीत संकल्पनेनुसार प्रकल्पाचे तंतोतंत अंदाजपत्रक सविस्तर संरचनात्मक स्थापत्य रचना (Detail Engineering Design) पूर्ण झालेनंतर काढण्यासही मान्यता देण्यात आली. याव्यतिरीक्त कामाच्या कंत्राटातील तरतुदीनुसार देय असणारी भाववाढही अनुज्ञेय असेल. तसेच मूळ निविदेमध्ये अंतर्भाव नसलेल्या मुख्य प्रवेशद्वार इमारतीमधील उपहारगृह व दुकाने यांची अंतर्गत सजावट, संशोधन केंद्र (ग्रंथालय व व्याख्यानवर्ग) यातील अंतर्गत सर्व प्रकारची सजावट, तसेच स्मारक इमारतमधील संग्रहालय, कलादालन यांचे अंतर्गत सर्व प्रकारच्या सजावटींची कामे व वापरा संबंधीतील निर्देश महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर या भागांची अंतर्गत रचना व अंदाजपत्रके तयार करून स्वतंत्रपणे शासनाकडून त्यांची मंजूरी घेण्यासही मान्यता देण्यात आली. प्रकल्पासाठी सुधारीत संरचनेनुसार बांधकाम नकाशे तसेच आवश्यक असणाऱ्या विविध मंजुऱ्या प्राप्त करण्यात आल्या व स्मारकाचे काम प्रगतीपथावर आहे. सद्यस्थितीत प्रकल्पातील सहाय्यभूत इमारतींचे ६०.५०% काम पूर्ण करण्यात आले आहे व स्मारकातील पुतळा वगळता पादपीठाचे २१% काम पूर्ण करण्यात आले आहे व उर्वरीत कामे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्रगतीत आहेत. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | प्रकल्पातील सहाय्यभूत इमारतीजसे, प्रवेशद्वार, ग्रंथालय, प्रेक्षागृह, वाहनतळ बांधकाम करणे अपेक्षित आहे. तसेच स्मारक इमारत व कांस्य पुतळ्याचे पॅनेल, स्टीलचा सांगाडा इत्यादी काम प्रगतीपथावर राहतील. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| **६००.००** | **५००.००** | **४००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

*****

## अभियांत्रिकी विभाग – २१ (प्रकल्प)

| | | |
|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव :** | **ठाणे ते बोरीवली (संजय गांधी राष्ट्रीय उद्यान) ४ पदरी भुयारी मार्ग** |
| २. | **चालू योजना/ नवीन योजना :** | **चालू योजना** |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबुवन साध्य करावयाची उद्दिष्टे** | १. ठाणे घोडबंदर रोड (एसएच-४२) हा मुख्य दुवा रस्ता आहे जो एक पूर्व पश्चिम लिंक आहे. व एनएच-३ आणि एनएच-८ दरम्यान मोठया प्रमाणावर व्यावसायिक रहदारी असते.<br>२. ठाणे ते बोरीवली या लांबीतील अंतर घोडबंदर मार्गे २३ कि.मी आहे. ठाणे ते बोरीवली लांबीतील अंतर पार करण्यासाठी सद्य:स्थितीत सकाळी व संध्याकाळी वर्दळीच्या वेळी (peak hours) अंदाजे दीड ते दोन तासाचा वेळ लागतो.<br>३. ठाणे ते बोरिवली दरम्यान संजय गांधी राष्ट्रीय उद्यान अंतर्गत दुहेरी बोगद्याचे बांधकाम प्रस्तावित आहे. जेणेकरुन ठाणे ते बोरीवली हा प्रवास १२ किमी. ने कमी होईल.<br>४. बोगद्याचा भाग हा संरक्षित वन क्षेत्रातुन जात असल्याने Tunnel Boring Machine च्या सहाय्याने बोगद्याचे खोदकाम करण्याचे प्रस्तावित आहे.<br>५. बोगद्याची ठळक माहिती खालीलप्रमाणे :<br>○ एकूण लांबी - ११.८५ कि.मी. (बोगद्याची एकूण लांबी १०.२५ किमी. व जोडरस्तयाची लांबी १.६० किमी. आहे.)<br>○ दोन बोगदे (प्रत्येक बोगद्यात २ मुख्य +१ आपत्कालीन मार्गिका )<br>○ दोन्ही बोगद्यांना जोडण्यासाठी सुमारे ३०० मी. अंतरावर आंतरजोड मार्गिका (cross passages) प्रस्तावित आहेत.<br>○ अग्निशमन यंत्रणा, प्रकाशित सुचनाफलक (LED Light sign boards) योग्य ठिकाणी स्थापित केले जातील.<br>६. प्रकल्पाची अंदाजित बांधकाम किंमत ₹. १६६००.४० कोटी (भुसंपादनासह) असून सदर अंदाजित किंमतीस प्राधिकरणाने दिनांक १० मार्च, २०२३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १५४ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाचे बांधकाम एकूण ३ पॅकेजमध्ये करणे प्रस्तावित आहे. त्यापैकी २ स्थापत्य (Civil works) कामे M/s Megha Engineering & |

| | | |
|---|---|---|
| | | Infrastructures Ltd (MEIL) या कंत्राटदारामार्फत (दि. ०८/०५/२०२३ रोजीच्या स्वीकृती पत्रान्वये) कार्यान्वयन हाती घेण्यात आलेले आहे. उर्वरित १ पॅकेज सुनियोजित वाहतुक प्रणाली, वायुविजन इ. (Intelligent Transport System, Ventilation etc.) या कामाचे पॅकेज स्वतंत्रपणे लवकरच हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | कंत्राटदार- मे. मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लि.<br>स्विकृती पत्र पॅकेज - १ पत्र क्र. MMRDA//Twin Tunnel/PKG १/LOA/४८३/२०२३, Dt. ०८.०५.२०२३<br>स्विकृती पत्र पॅकेज-२ पत्र क्र. MMRDA/TwinTunnel/PKG२/LOA/ ४८४/२०२३, Dt. ०८.०५.२०२३ रोजी देण्यात आले आहेत.<br>स्वीकृत किंमत पॅकेज- १: ₹६१७८ कोटी,<br>स्वीकृत किंमत पॅकेज- २: ₹५८७९ कोटी<br>सल्लागार- हिल इंटरनॅशनल प्रोजेक्ट मॅनेजमेंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड / मे. टाटा कन्सल्टिंग इंजिनियर्स लिमिटेड (जेव्ही)<br>कार्यारंभ आदेश- दि. २०/०६/२०२३<br>प्रकल्पावर आजतागायत अदा केलेली रक्कम ₹.२,००६.०० कोटी,<br>शिल्लक रक्कम ₹. १४,५९४.३३ कोटी |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | ०८ मे,२०२३ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | ०७ डिसेंबर, २०२८ |
| ७. | **अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | **केंद्रीय पर्यावरण व वनविभागा च्या दि. ०१ डिसेंबर, २००९ च्या सुधारित अधिसुचनेनुसार पर्यावरण ना-हरकत प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव पर्यावरण व वनविभागाकडे सादर केला होता. दिनांक १५.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी सदर प्रकल्पासाठी पर्यावरण ना हरकत दाखल्याची आवश्यकता नसल्याचे कळविले आहे.**<br>सदर प्रकल्पाच्या बांधकामात बाधित होणाऱ्या वन जमिनीच्या बदल्यात पर्यायी वनीकरणा**साठी नियमानुसार उमरावती ता. फुलंब्री जि. औरंगाबाद येथील गट** नं. ४९५ मधील ६०.०३ हेक्टर क्षेत्रापैकी ३५.५६४४ हेक्टर क्षेत्राची (पर्यायी वनीकरणाचे अंदाजपत्रक (CA scheme) दि. २९.०३.२०२३ रोजी उप वनसंरक्षक, औरंगाबाद वनविभाग यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.<br>दिनांक **२४/५/२०२३ आणि दि. २५/७/२०२३ रोजी नागपूर येथे झालेल्या प्रकल्प स्क्रिनिंग कमिटी (PSC)-I** |

| | | |
|---|---|---|
| | | **आणि PSC-II च्या बैठकीत वन वळवण्याचा प्रस्ताव (FDP) मंजूर करण्यात आला आहे.**<br>**त्यानंतर, दिनांक १३.१०.२०२३ रोजी अवर सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांनी हा प्रस्ताव प्रथम टप्पा मंजुरीसाठी उपमहासंचालक वने (मध्य), नागपूर यांच्याकडे पाठविला आहे.**<br>सदर प्रकल्पासाठी खाजगी जागेचा भुसंपादनाचा प्रस्ताव प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आला असुन, भुसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे. गाव- मानपाडा, जि. ठाणे याची संयुक्त मोजणी दि. १४.१०.२०२२ व २१.१२.२०२२ रोजी पुर्ण करण्यात आली आहे. तसेच गाव- मागाठाणे बोरीवली येथील सुयंक्त मोजणी २४.०७.२०२३ रोजी करण्यात आली आहे.<br>**वन्यजीव मंजुरी प्रस्ताव (WL/MH/ROAD /४२८४२६/२०२३ dt ७/५/२०२३):** दि **१६ ऑक्टोबर २०२३ रोजी सह्याद्री येथे माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या २२ व्या बैठकीत विचारात घेण्यात आला आहे.**<br>वन मंजुरी: ०८/०२/२०२३ रोजी झालेल्या प्रादेशिक सक्षमीकरण समितीच्या (REC) ११२ व्या बैठकीत वनपरिवर्तन प्रस्ताव (FDP) मंजूर करण्यात आला. केंद्रीय वन विभागा (MOEF&CC) कडून मंजूरी पत्र ०९/०२/२०२४ रोजी प्राप्त झाले. २६/०६/२०२४ रोजी वन्य विभागाची काम करणेसंबधी परवानगी प्राप्त झाली, तसेच ESZ समितीची मान्यता १५/०७/२०२४ रोजी प्राप्त झाली.<br>हिल इंटरनॅशनल प्रोजेक्ट मॅनेजमेंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - मे. टाटा कन्सल्टिंग इंजिनियर्स लिमिटेड (जेव्ही) या सल्लागारास दि.२०/०६/२०२४ रोजी ₹. ४९८,५८,६६,५००/- (चारशे अठ्ठयाण्णव कोटी अठ्ठावण्ण लाख सहासष्ट हजार पाचशे फक्त) (वस्तु व सेवा कर वगळून) इतक्या किंमतीच्या कामाचे कार्यारंभ आदेश (Notice to Proceed) देण्यात आलेले आहे.<br>**शासनाने सदर प्रकल्पास दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाचे बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्यास व इतर प्रकल्प अनुषंगिक बाबी जसे की, बाह्य कर्ज सहाय्य/इतर वित्तीय संस्थांमार्फत कर्ज उभारण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्प "महत्त्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" व "निकडीचा सार्वजनिक प्रकल्प" म्हणून घोषित करण्यात आला आहे.** |
| | **ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी** | पॅकेज १: दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ रोजीच्या |

| | | |
|---|---|---|
| | **कामगिरीची उद्दिष्टे** | शासन निर्णयानुसार बोरिवली बाजूकडील झोपड्यांचे एम यु टी पी धोरणानुसार पुनर्वसन करून पोर्टलचे प्रत्यक्ष काम हाती घेण्याचे उद्दिष्ट.<br>पॅकेज २:<br>१. ठाणे बाजूकडील पोर्टलचे काम पूर्ण करून टनेल बोरिंग मशीन उतरवून बोगद्याच्या प्रत्यक्ष कामास सुरू करण्याचे नियोजन.<br>२. सेगमेंट मोल्ड आयात करून बोगद्यातील काँक्रीट लाइनिंगच्या प्रत्यक्ष कामास (cast) सुरुवात करण्याचे उद्दिष्ट. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **४०००.००** | **१५८०.००** | **२६८४.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | **:** | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

*****

## अभियांत्रिकी विभाग - २२ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आंतरराज्यीय टर्मिनल (T१) जवळ पश्चिम द्रुतगती महामार्गावर भुयारी .०२१मार्गाचे बांधकाम करणे आणि कि.मी. ५+३०० ते मी. ६+१०० मधील उड्डाणपुलाचे रुंदीकरणाचे बांधकाम करुन सुधारीकरण करणे. |
| २. | चालू योजना / नवीन योजना | : | चालू योजना (EPC mode Contract) |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | : | वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळ T२ वरून वांद्रेकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी २-लेन एकेरी (oneway) उड्डाणपूल प्रस्तावित आहे. हे सध्याच्या WEH च्या जुहू– विलेपार्ले उन्नतउड्डाण पुलाच्या समांतर (RHS) च्या शेवटी जोडले जाईल. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय विमानतळ T२ वरून वांद्रेकडे जाणा-या वाहतुकीच्या रहदारीची क्षमता वाढेल. पश्चिम द्रुतगती महामार्गावरील समस्यांवर मात करुन सुरक्षिततेसह होणारा विलंब व प्रदूषण कमी होईल तसेच प्रवाशांचा प्रवास आरामदायक, सुखद व वेळेत होईल. |
| ४. | कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम | | कार्यारंभ आदेश – दिनांक २२/०६/२०२१<br>प्रशासकीय मान्यता – ₹. ७१.०६ कोटी<br>सुधारीत किंमत – ₹. ४८.४३ कोटी<br>कंत्राटदार – मे. आर.पी.एस इन्फ्राप्रोजक्टस् प्रा.लि.<br>सल्लागार – मे. टेक्नाजेम कंन्सल्टंट प्रा.लि.<br>अदा केलेली रक्कम – ₹.३३.४२ कोटी<br>शिल्लक रक्कम – ₹.१५.०१ कोटी |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | : | १७ फेब्रुवारी, २०२३ |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date) | | माहे फेब्रुवारी, २०२४ |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | सद्यस्थितीमध्ये ७५% काम पूर्ण झाले आहे. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | : | उड्डाणपुलाचे रुंदीकरणाचे बांधकाम पुर्ण करुन वाहतुकीसाठी खुले करण्यात येईल. |
| ८. | **अंदाजित खर्च** | : | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **३०.००** | **३१.२८** | **३.६८** |

९. योजना अंमलबजावणी करणारी संस्था : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

## अभियांत्रिकी विभाग - २३ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (T२) टर्मिनल जवळ पश्चिम द्रुतगती महामार्गावर कि.मी. ६+१४० ते कि.मी. ६+९५० येथे भुयारी मार्गांचे बांधकाम व सुधारीकरण करणे. (सुधारीत) |
| २. | चालू योजना / नवीन योजना | : | चालू योजना (EPC mode Contract) |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | : | आंतरराष्ट्रीय विमानतळ T२ वरून बाहेर पडणा-या आणि दहिसर बाजूने जाणा-या ट्रॅफिकसाठी विद्यमान WEH २.५m ने उंची वाढवणारा नवीन २-लेन एक-मार्ग अंशतः स्टिल्ट व्हायाडक्ट आणि अर्धवट बॉक्स अंडरपास प्रस्तावित आहे. (उत्तर बाजू)<br>WEH च्या उभारणीसाठी मुख्य ROW आणि त्यालगतच्या भिंतींचे बांधकाम, फुटपाथ इत्यादी.<br>MIAL च्याआपत्कालीन रस्त्याची उभारणी छत्रपती शिवाजी महाराजपुतळा आणि एमआयएएल रस्त्याचे रुंदीकरण.<br>मोकळ्या डाव्या वळणाच्या रस्त्याचे काही भाग रुंदीकरण, म्हणजे, आंतरराष्ट्रीय विमानतळ T२ पासून आणि वांद्याच्या बाजूने जाणारे. (दक्षिण बाजूला).<br>याभुयारी मार्गामुळे आंतरराष्ट्रीय विमानतळाकडून दहिसरकडेजाण्या-या पश्चिम द्रुतगती महामार्गावर जलदगतीने जाण्यासाठी उपयुक्त ठरेल तसेच वाहतुक कोंडी कमी होवून रहदारीची क्षमता वाढेल. पश्चिम द्रुतगती महामार्गावरील समस्यांवर मात करुन सुरक्षित ते सह होणारा विलंब व प्रदूषण कमी होईल तसेच प्रवाशांचा प्रवास आरामदायक, सुखद व वेळेत होईल. |
| ४. | कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम | : | कंत्राटदार नियुक्तीची निविदा प्रक्रिया सुरू आहे. |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | : | अंदाजे माहे फेब्रुवारी, २०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date) | : | डिसेंबर, २०२५ |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | EPC कंत्राटदार नियुक्तीची (व्याप्ती बदल) व्दीतीय बोलीची निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. कंत्राटदाराची नियुक्ती करुन पुलाचे काम सुरु करण्याचे अपेक्षित आहे. |
| | ब) २०२४-२०२५ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | : | काम प्रगतीपथावर राहील. |
| ८. | **अंदाजित खर्च** | : | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२३-२०२४<br>मूळ अंदाज** | **२०२३-२०२४<br>(सुधारीत)** | **२०२४-२०२५<br>अपेक्षित अंदाज** |
| **२५.००** | **२१.००** | **०.००** |

९. योजना अंमलबजावणी करणारी संस्था : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

## अभियांत्रिकी विभाग — २४ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **आत्माराम पाटील चौक (खारेगांव टोल नाका ते कळवा नाका रस्त्याचे बांधकाम)** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | आत्माराम पाटील चौक (खारेगाव टोल नाका ते कळवा नाका) रस्त्याचे बांधकामामुळे नवी मुंबई, जेएनपीटी खारेगाव भागात प्रवेश न करता बाहेरुन नाशिक महामार्गाकडे जाणेकरीता पर्याय उपलब्ध होईल. यामुळे ठाणे, खारेगांव, कळवा भागातील वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवासाच्या वेळेत बचत होईल. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे प्रगतीपथावर आहे. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | माहे जोनवारी, २०२५ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | माहे जानेवारी, २०२८ पर्यंत पूरण होणे अपक्षित आहे. |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | निविदा प्रक्रिया करुन कामास सुरुवात करणे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | काम प्रगतीपथावर राहील. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१५०.००** | **११७.००** | **५०.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

*****

## अभियांत्रिकी विभाग – २५ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **मुंबई पारबंदर ते मुंबई पूणे द्रुतगती महामार्गाचे बांधकाम** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | मुंबई पारबंदर प्रकल्प चिर्ले येथून मुंबई-पुणे महामार्गांत थेट जोडणी करणे. JNPT ते पनवेल मार्गावरील वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून हा पर्यायी मार्ग आहे. पुणे-गोवा कडून येणारी व जाणारी वाहतुक विना अडथळा मुंबई पारबंदर प्रकल्पावरुन होईल. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | MMRDA/ED/MECP/GC/NTP/WO/268/2024dt.16.08.2024<br>Rs.1420.00 Cr<br>मे. गवार कन्स्ट्रक्शन लि.<br>मे. AECOM ऐशीय कंपनी लि. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | 16.08.2024 |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | फेब्रुवरी 2027 |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | प्रकल्पाकरिता मे. गवार कन्स्ट्रक्शन लि. यांची कंत्राटदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | उर्वरित काम फेब्रुवरी 2027 पर्यंत पूर्ण करणे. |

| ८. | अंदाजित खर्च-२०२५-२६ | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **५००.००** | **१७०.००** | **५१०.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

*****

## अभियांत्रिकी विभाग - २६

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | रायलादेवी तलावाचे संवर्धन, पुनरुज्जीवन व तलाव परिसरात सार्वजनिक उपयोगाची सुविधेची कामे करणे. |
| २. | चालू योजना / नवीन योजना | : | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | : | रायलादेवी तलावाचे संवर्धन, पुनरुज्जीवन व तलाव परिसरात सार्वजनिक उपयोगाची सुविधेचे काम हे विशेष बाब म्हणून प्राधिकरणाने हाती घेतलेले आहे. सदर कामात रंगमंच तसेच तलावाभोवती सुशोभिकरण करण्याचा समावेश आहे. |
| ४. | कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम | : | कंत्राटदार – मे. हिरावती कंन्स्ट्रक्शन<br>कार्यारंभ आदेश दिनांक - १७/१०/२०२२<br>सल्लागार – मे. किकॉन्स् लि. |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | : | दिनांक १७/१०/२०२२ |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date) | : | माहे, एप्रिल, २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | काम प्रगतीपथावर |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | : | एप्रिल, २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे |
| ८. | **अंदाजित खर्च** | : | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१४.५६** | **२७.६३** | **०.५०** |

९. योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

## अभियांत्रिकी विभाग - २७

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | बोरीवली - गोराई रस्त्यावर, गोराई खाडीपूल बांधणे (भू-संपादन) |
| २. | चालू योजना / नवीन योजना | : | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | : | प्रकल्पाची एकुण अंदाजित किंमत ८८८.७४ कोटी इतकी आहे. प्रस्तावित गोराई खाडीपूल २+२ मार्गिकेची लांबी ३.१८५ कि.मी. आहे. गाराई खाडीपूलामुळे प्रवासाचे अंतर २५ कि.मी. कमी होणार आहे. |
| ४. | कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची कंत्राटीय किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम | : | अद्याप नियुक्ती नाही. |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | : | मार्च, २०२४ |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date) | : | मार्च, २०२७ |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | १. महाराष्ट्र सागरी मंडळाच्या पत्र क्र.MMB/CEO/HGR/T-१९४/Borivali-Gorai bridge/V&H Clearance/५५७, dt. १ June, २०१८ पत्रान्वये नेव्हीगेशनल क्लिअरन्स चालु ठेवण्यासाठी १० मीटरच्या व्हर्टिकल आणि १२० मीटरचा स्पॅन ठेवण्यासाठी मंजुरी दिली आहे.<br>२. राज्य पर्यावरण प्रभाव मुल्यांकण प्राधिकरण (SEIAA) च्या दि. १७.०६.२०२२ रोजीच्या २४४ व्या (दिवस ३ रा) बैठकीनुसार CRZ मंजुरी मिळालेली आहे.<br>३. कांदळवन (Mangroves Cell) मोजणी अहवाल दि. १०.०६.२०२१ रोजी प्राप्त झाला असुन वन विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे.<br>वन विभागाच्या परवानगी नियमावलीनुसार ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सुधारीत प्रस्ताव मंजुरीकरीता दिनांक १०.०८.२०२१ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पाच्या बांधकामात बाधित होणाऱ्या वन जमिनीच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी नियमानुसार उमरावती ता. फुलंब्री जि. औरंगाबाद येथील गट नं. ४९५ मधील ६०.०३ हेक्टर क्षेत्रापैकी ५.६५ हेक्टर क्षेत्राची (पर्यायी वनीकरणाचे अंदाजपत्रक (CA scheme) दि. १२.०७.२०२३ रोजी उप वनसंरक्षक, औरंगाबाद |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वनविभाग यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. गोराई खाडीपुल व पोहोच रस्त्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया तसेच वनप्रस्ताव व इतर परवानग्या मान्यता घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | : | सदर कामासाठी वन विभागाची परवानगी व भूसंपादनाचे काम पूर्ण करुन कामास सुरुवात करण्यात येईल. |
| ८. | **अंदाजित खर्च** | : | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **७५.००** | **६२.००** | **०.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## अभियांत्रिकी विभाग — २८ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | **मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी उन्नत/भुयारी मार्गाचे बांधकाम** |
| २. | **चालू योजना/ नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | मुंबई शहरभागात पूर्व मुक्तमार्ग ते सागरी किनारा मार्ग या द्वारे पूर्व-पश्चिम किनारपट्टी जोडणारा प्रकल्प आहे. सदरच्या कामामध्ये दोन भूमिगत बोगदयांचे काम ऑरेंज द्वार ते मरीन ड्राईव्ह पर्यत करण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पाच्या डाव्या बाजूकडील बोगद्याची लांबी ४२७० मी. आणि उजवीकडील बोगद्याची लांबी २२४० मी. इतकी आहे. प्रत्येक बोगद्याच्या आतीलबाजूस व्यास सुमारे ११ मी. इतका प्रस्तावित आहे. त्यामध्ये वाहतूकीसाठी ३.२० मी. रूंदीच्या २ मार्गिका व २.५० मी. रूंदीची १ आपत्कालीन मार्गिका आणि पादचारी मार्ग अशी रचना दोन्ही बोगद्यांमध्ये प्रस्तावित आहे. बोगद्यांचे काम टनेल बोरींग मशिनद्वारे करण्याचे नियोजित आहे. प्रकल्पाची एकूण लांबी ९२३९ मी. इतकी आहे.<br>प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ १५-२० मिनिटांनी कमी होण्यास मदत होईल आणि इंधनाची बचत होईल. तसेच ध्वनी आणि वायू प्रदूषण कमी होईल.<br>सदर प्रकल्प हा मुंबई शहरभागातील पूर्व मुक्तमार्ग ते मरीन ड्राईव्हदरम्यान वाहतूक कोंडी सोडवणारा महत्त्वकांक्षी प्रकल्प असल्याने सदर प्रकल्पास मान्यता देणे आवश्यक आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची कंत्राटीय किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | मे. लार्सन ॲण्ड टुब्रो लि. या लघुत्तम निविदाकाराची सर्व करांसहित व तात्पुरत्या रक्कमेसह असलेला ₹.७,७६५,०९,६६,०००/- (रुपये सात हजार सातशे पासष्ट कोटी नऊ लाख सहासष्ट हजार फक्त) इतक्या किंमतीच्या कामाचे कार्यारंभ आदेश (Notice to Proceed) दि. २०/०६/२०२४ रोजी देण्यात आलेले आहे.<br>मे. हिल इंटरनॅशनल प्रोजेक्ट मॅनेजमेंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - मे. टाटा कन्सल्टिंग इंजिनियर्स लिमिटेड (जेव्ही) या सल्लागारास दि.२०/०६/२०२४ रोजी ₹. २४६,२७,३३,०००/- (दोनशे सेहचाळीस कोटी सत्तावीस लाख तेहेतीस हजार फक्त) (वस्तु व सेवा कर वगळून) इतक्या किंमतीच्या कामाचे कार्यारंभ आदेश (Notice to Proceed) देण्यात आलेले आहे.<br>प्रकल्पावर आजतागायत अदा केलेली एकूण रक्कम-रु.१६.७६ कोटी<br>शिल्लक रक्कम- रु.८०३९.२४ कोटी |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | दि. २० जून,२०२४ (कार्यारंभ आदेशानुसार) |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | दि. १९ डिसेंबर, २०२८ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | १. महाराष्ट्र सागरी मंडळाची तत्वता: मंजूरी दि.०७/०८/२०२३ रोजी प्राप्त झाली आहे.<br>२. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून तत्त्वतः मंजूरी दि. १० ऑगस्ट २०२३ रोजी प्राप्त झाली आहे.<br>३. मुंबई शहर जिल्हाधिकारी यांची तत्वता: मंजूरी दि.३०/०८/२०२३ रोजी प्राप्त |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | झाली आहे.<br>४. दि. १५/१२/२०२३ रोजी झालेल्या MCZMA च्या १७१ व्या बैठकीत, CRZ मंजुरीच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली.<br>५. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची तत्त्वतः मंजूरी दि. ०३/०१/२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.<br>६. मुंबई वारसा संवर्धन समितीची तत्वता: मंजूरी दि.०८/०१/२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.<br>७. पाणी पुरवठा विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिकेची तत्वता: मंजूरी दि.११/०१/२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.<br>८. मुंबई पत्तन प्राधिकरणामार्फत प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मान्यता प्राप्त झाली असून प्रथम चरणात मुंबई पत्तन प्राधिकरणाकडून १.९६ हेक्टर इतक्या जमिनीचे हस्तांतरण दि. ०१/१०/२०२४ रोजी करण्यात आले आहे.<br>९. प्राथमिक कामे जसे भूसर्वेक्षण तपासणी, स्थलाकृतिक सर्वेक्षण, रचने संबंधित इत्यादी कामे प्रगतीपथावर आहे.<br>१०. प्रकल्पासाठी लागणा-या टनेल बोरींग मशिनच्या नुतनीकरणाचे काम कंत्राटदारामार्फत करण्यात येत आहे.<br>११. टनेल बोरींग मशिन जमिनीखाली उतरविण्यासाठी आवश्यक असलेल्या लॉचिंग शाफ्ट बनविणेसाठी प्रत्यक्ष स्थळी पाईल फाऊंडेशनचे काम सुरु झाले आहे.<br>१२. शासनाने सदर प्रकल्पास दि. ०७ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाचे बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्यास व इतर प्रकल्प अनुषंगिक बाबी जसे की, बाहय कर्ज सहाय्य/ इतर वित्तीय संस्थामार्फत कर्ज उभारण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्प "महत्वपुर्ण नागरी वाहतुक प्रकल्प" व “निकडीचा सार्वजनिक प्रकल्प” म्हणून घोषित करण्यात आला आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | लॉचिंग शाफ्टचे काम पूर्ण करुन, टनेल बोरींग मशिनद्वारे बोगदयाचे काम सुरु करण्याचे उद्दिष्ट. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **२४००.००** | **१२२८.००** | **१८१३.४०** |

| ९. | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |
|---|---|---|---|

## अभियांत्रिकी विभाग — २९ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **मुंबई, ठाणे व नवी मुंबई शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याबरोबरच विकास कामाच्या दृष्टीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आलेले प्रकल्प** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | ठाणे व मुंबई शहरातील वाहतुक कोंडी कमी करणे, वेळ, इंधनाची बचत. अंतर कमी होईल. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची कंत्राटीय किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | कंत्राटदार नियुक्ती प्रक्रिया सुरु आहे. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | ऑक्टोबर २०२४ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | |

| | अ.क्र. | कामाचे नाव | कार्यवाही |
|---|---|---|---|
| | १. | कोपरी पटणी पूल | विस्तृत प्रकल्प अहवाल सल्लागार यांच्याकडून बनविण्यात आला असून त्याचे पियर रिव्हिव सल्लागार मे. TCE यांच्या कडून करण्यात येत आहे |
| | २. | ठाणे कोस्टल रोड (टप्पा-२) | सविस्तर प्रकल्प अहवाल पूर्ण करुन सुधारीत प्रशासकीय मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येईल |
| | **३.** | **पालघरमध्ये रस्ता रुंदीकरण** | |
| | | अ) वसई ते पालघर - नारींगी खाडीपूल | सदर कामाकरता निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. परंतु, सदर कामांमध्ये लोकप्रतिनिधींनी बदल सुचविल्याने त्यात आवश्यक बदल अंतर्भूत करून सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सक्षम प्राधिकरण यांचेकडे पाठवण्यात |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आलेला आहे. |
| | | ब) पालघर ते विरार-वैतरणा नदीवरील पूल | सदर कामाकरता निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. परंतु, सदर कामांमध्ये लोकप्रतिनिधींनी बदल सुचविल्याने त्यात आवश्यक बदल अंतर्भूत करून सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सक्षम प्राधिकरण यांचेकडे पाठवण्यात आलेला आहे. |
| | **४.** | वाडा-वाशिंद-पडघा | विस्तृत प्रकल्प अहवाल मंजूर झाल्यानंतर पुन:च्छ प्रक्रिया हाती घेण्याचे प्रयोजन आहे. |
| | **५.** | मुरबे-पालघर कनेक्टिव्हिटी | सदर कामाकरता निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्या नंतर प्रत्यक्ष काम हाती घेऊन सुरु करण्यात येईल. |
| | ६. | शिळफाटा ते माणकोली | प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल करण्याकरीता सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रकल्प व्यवहार्य ठरल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| | ७. | **कल्याण ते माणकोली (बापगांव)**<br>अ) गांधारी खाडी पूलाचे रुंदीकरण<br>ब) कल्याण गांधीरी ब्रिज ते NH३ सापे मार्गे<br>क) बापगांव जंक्शन ते NH३ सोनाळे मार्गे | सविस्तर प्रकल्प अहवालास अनुसरुन जमिन अधिग्रहण करण्यासाठीची प्रक्रीया सुरु करण्याचे नियोजन आहे. |
| | ८. | टिटवाळा ते बदलापूर<br>कल्याण-NRC-टिटवाळा<br>अ) आंबिवली NRCते उंबरणी सर्कल<br>ब) उंबरणी सर्कल ते निमकर नाका टिटवाळा स्टेशनमार्गे<br>क) वाजपाई चौक ते निकमर नाका | सल्लागाराची व कंत्राटदाराची नेमणूक करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. |
| | ९. | टिटवाळा ते पडघा | प्रकल्पाचा सुसाध्यता अभ्यास (Feasibility Study) तयार करण्याकरीता सल्लगाराची नियुक्ती करण्यात आली आहे. |
| | १०. | महापे-दहिसर बोगदा | प्रकल्पाचा सुसाध्यता अभ्यास (Feasibility Study) तयार करण्याकरीता सल्लगाराची नियुक्ती करणे. |
| | ११. | दहिसर ते मुरबाड रोड | प्रकल्पाचा सुसाध्यता अभ्यास (Feasibility Study) तयार करण्याकरीता सल्लगाराची नियुक्ती करणे. |
| | **१२.** | चिंचोटी ते अंजूर फाटा रस्ता | सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात आले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | |
| | **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **कार्यवाही** |
| | १. | कोपरी पटणी पूल | कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येईल. |
| | २. | ठाणे कोस्टल रोड (टप्पा-२) | कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येईल. |
| | ३. | **पालघरमध्ये रस्ता रुंदीकरण** | |
| | | अ) वसई ते पालघर - नारींगी खाडीपूल | सदर कामाकरता सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्यास त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| | | ब) पालघर ते विरार-वैतरणा नदीवरील पूल | सदर कामाकरता सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्यास त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| | ४. | वाडा-वाशिंद-पडघा | निविदा प्रक्रीया सुरु करण्यात येईल. |
| | ५. | मुरबे-पालघर कनेक्टिव्हिटी | सदर काम पूर्ण करण्याचे दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल |
| | ६. | शिळफाटा ते माणकोली | प्रकल्प व्यवहार्य ठरल्यास निधीच्या उपलब्धतेनुसार सल्लागार आणि कंत्राटदाराची नियुक्त करण्यात येईल. |
| | ७. | **कल्याण ते माणकोली (बापगांव)**<br>अ) गांधारी खाडी पूलाचे रुंदीकरण<br>ब) कल्याण गांधीरी ब्रिज ते NH३ सापे मार्गे<br>क) बापगांव जंक्शन ते NH३ सोनाळे मार्गे | जमिन अधिग्रहणाची प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदाराची नेमणूक करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येईल. |
| | ८. | टिटवाळा ते बदलापूर<br>कल्याण-NRC-टिटवाळा<br>अ) आंबिवली NRCते उंबरणी सर्कल<br>ब) उंबरणी सर्कल ते निमकर नाका टिटवाळा स्टेशनमार्गे<br>क) वाजपाई चौक ते निकमर नाका | काम प्रगतीपथावर राहील. |
| | ९. | टिटवाळा ते पडघा | प्रकल्पाचा सुसाध्यता अभ्यास अहवाल प्राप्त झाल्यानंतर सखोल प्रकल्प अहवाल (DPR) व अंदाजपत्रके तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करुन कामाच्या निविदा मागवून काम हाती घेण्याचे प्रयोजन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आहे. आवश्यक त्या परवानग्या विहित वेळेत घेण्यात येतील. |
| | १०. | महापे-दहिसर बोगदा | प्रकल्पाचा सुसाध्यता अभ्यास अहवाल प्राप्त झाल्यानंतर सखोल प्रकल्प अहवाल (DPR) व अंदाजपत्रके तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करुन कामाच्या निविदा मागवून काम हाती घेण्याचे प्रयोजन आहे. आवश्यक त्या परवानग्या विहित वेळेत घेण्यात येतील. |
| | ११. | दहिसर ते मुरबाड रोड | प्रकल्पाचा सुसाध्यता अभ्यास अहवाल प्राप्त झाल्यानंतर सखोल प्रकल्प अहवाल (DPR) व अंदाजपत्रके तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करुन कामाच्या निविदा मागवून काम हाती घेण्याचे प्रयोजन आहे. आवश्यक त्या परवानग्या विहित वेळेत घेण्यात येतील. |
| | १२. | चिंचोटी ते अंजूर फाटा रस्ता | सदर काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे मार्फत हाती घेण्याचे प्रयोजन असल्याने मु.म.प्र.वि. प्रा मार्फत काम हाती घेण्यात येणार नाही. |
| **८.** | **अंदाजित खर्च** | : | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१२७२.००** | **११६.००** | **९९१.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | **:** | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

*****

# अभियांत्रिकी विभाग — ३० (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **उत्तन-विरार सागरी सेतू प्रकल्प** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत सुविधा अपुऱ्या पडत असल्याने मुंबईतील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर होत आहे. पश्चिम व मध्य रेल्वे बेस्ट, खासगी वाहतूक इ. सेवेवरील ताण कमी करण्याच्या उद्देशाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मेट्रो आणि मुंबई पारबंदर प्रकल्पाद्वारे वाहतूक पर्याय उपलब्ध करण्याचे कामे हाती घेतले आहे. तसेच प्राधिकारणामार्फत मोठ्या संख्येने उड्डाणपूले आणि जोडरस्ते बांधण्यात आले आहेत. मात्र तरीही वाढत्या वाहनाच्या संख्येमुळे मुंबईतील वाहतूक कोंडी दूर करणे आव्हानात्मक झाले आहे. मुंबईतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तसेच मुंबई महानगर प्रदेशातील अंतर कमी करण्याच्या दृष्टीने तसेच प्रवास वेगवान करण्यासाठी आता वाहतुकीच्या विविध पर्यायांचा विचार करण्यात आला असून त्यामधील एक पर्याय म्हणजे वर्सोवा- विरार सागरी सेतू आहे.<br>मुंबईतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वर्सोवा ते विरार ४३.०० कि.मी. लांबीचा मुख्य सागरी सेतू बांधणे प्रस्तावित आहे. या सागरी सेतूचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नरिमन पॉईंटवरून थेट विरारला वेगात पोहचता येणार असून वर्सोवा ते विरार हे अंतर केवळ ४५ मिनिटांत पार करता येणार आहे. यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वाहतूकीची कोंडी संपुष्टात येऊन वेळेची व इंधनाची बचत होईल.<br>या सागरी सेतूचा वापर अधिकाधिक प्रवाशांना करता यावा यासाठी या प्रकल्पाला चार कनेक्टर/ जोड रस्ता देण्यात आले आहेत. चारकोप, उत्तन, वसई आणि अर्नाळा असे हे चार कनेक्टर/ जोडरस्ते आहेत. या कनेक्टरमुळे वाहनचालकांना चार ठिकाणांहून सागरी सेतूवर ये-जा करता येईल. या प्रकल्पाची अनेक वैशिष्ट्ये असून हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई आणि मीरा-भाईंदर तसेच वसई-विरारमधील वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत तर होईल. तसेच दक्षिण मुंबईहून अहमदाबाद महामार्गावर पोहचणे शक्य होईल.<br>दि.१३/०२/२०२४ रोजी झालेल्या बैठकीत ठरवल्याप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेने वर्सोवा-दहिसर-भाईंदर पर्यंत उत्तर सागरी उन्नत मार्ग (North Costal Road) हाती घेतला असल्याने, दि.१५/०३/२०२४ रोजीच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | शासन निर्णयानुसार प्राधिकरणामार्फत उत्तन ते विरार (टप्पा-१) अंतर्गत काम हाती घेण्याचे प्रस्तावित असून, विरार ते पालघर (टप्पा-२) दरम्यान शक्यशक्यता अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | • सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणा-या सल्लागाराची (मे.पेंटॅकल-सेमोसा-जेव्ही) नियुक्ती -११/०५/२०२३<br>• समवयस्क पुनरावलोकन करणेसाठी सल्लागाराची (मे. निप्पोन कोई -अरुप जेव्ही) नियुक्ती - १४/०३/२०२४.<br>प्रशासकीय मान्यता किंमत रु. ६३,४२६ कोटी<br>आजतागायत अदा केलेली रक्कम – रु. २३.२९ कोटी<br>शिल्लक रक्कम – रु. ६३,४०२.७१ कोटी |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | अंदाजे डिसेंबर, २०२५ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | अंदाजे डिसेंबर, २०३१ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | मे. पेंटॅकल यांनी प्रकल्पासाठी अंतिम शक्यशक्यता अहवाल तयार करुन माहे ऑक्टोबर २०२२ रोजी सादर केला असुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने त्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम मे. पेंटॅकल यांचे मार्फत प्रगतीपथावर आहे.<br>सविस्तर प्रकल्प अहवाल व त्या अनुषंगीक बाबींची तपासणी मे. निप्पॉन कोई-अरुप जेव्ही या सल्लागारामार्फत प्रगतीपथावर असून, डिसेंबर २०२४ पूर्वी पूर्ण होणे अपेक्षित आहे.<br>प्राधिकरणाच्या दि.२०/१०/२०२२ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीत तसेच दि. १०/०३/२०२३ रोजी झालेल्या १५४ व्या बैठकीत सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून, जायका या वित्तिय संस्थेकडून प्रस्तावित प्रकल्पासाठी कर्ज (ODA) घेण्यास शासनाने सुद्धा मंजुरी दिली आहे.<br>प्रकल्पाचा सविस्तर अहवाल माहे, सप्टेंबर २०२४ मध्ये सविस्तर प्रकल्प अहवाल सल्लागाराने सादर केलेला आहे.<br>सविस्तर प्रकल्प अहवाल व त्याअनुषंगीक बाबीची तपासणी मे. निप्पॉन कोई-अरुप जेव्ही या सल्लागारामार्फत प्रगतीपथावर असून, डिसेंबर २०२४ पूर्वी पूर्ण होणे अपेक्षित आहे.<br>प्रकल्पाचा सविस्तर अहवाल मंजुरीनंतर बाह्य कर्ज |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सहाय्य प्राप्त झाल्यानंतर कंत्राटदाराच्या नियुक्तीसाठी साधारण ८-१० महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. तसेच कंत्राटदाराच्या नियुक्तीनंतर सदर काम पूर्ण करण्यासाठी अंदाजे ५ वर्षांचा कालावधी अपेक्षित आहे.<br><br>बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वर्सोवा-दहिसर-भाईंदर या मुंबई उत्तर सागरी किनारा (नॉर्थ कोस्टल रोड) मार्गाचे काम हाती घेतलेले आहे. दि. १५/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार, भाईंदरपासून पुढे पालघरपर्यंत जोडणी करण्यासाठी उत्तन ते विरार (टप्पा-१) आणि विरार ते पालघर (टप्पा-२) असा सागरी सेतू मार्ग विकसित करणे प्रस्तावित आहे.<br>सदर दि.१५/०३/२०२४ च्या शासन निर्णयानुसार, उत्तन ते विरार सागरी सेतू मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास सादर करणे आवश्यक आहे. वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्पास जायकाकडून अर्थ सहाय्य घेण्यासाठी केंद्रीय व्यवहार आर्थिक विभागाच्या निर्देशानुसार व दि.१६/०५/२०१७ रोजीच्या मार्गदर्शक तत्वेनुसार शासनाकडे सविस्तर प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्याचे नियोजन आहे. |
| | ब) **२०२४-२०२५ साठी प्रत्यक्ष कामगिरी व उद्दीष्टे** | : | दि.१५/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन, सविस्तर प्रकल्प अहवाल तसेच केंद्रीय व्यवहार विभागाच्या मार्गदर्शन तत्वेनुसार सविस्तर प्रस्ताव सादर करुन राज्य तसेच केंद्र शासनाची बाहय कर्ज सहाय्य प्राप्त करुन प्रकल्पाच्या टप्पा-१ (उत्तन ते विरार) बाबत निविदा बोलविण्याचे नियोजन असून, मार्च २०२५ पर्यंत मे. निप्पॉन कोई -अरुप जेव्ही या समवयस्क पुनरावलोकन सल्लागारामार्फत विरार ते पालघर या टप्पा-२ च्या लांबीकरीता अंतिम शक्यशक्यता अहवाल पूर्ण करण्याचे उदिष्ट आहे. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **१५०.००** | **११७.००** | **२०००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **९.** | **योजना अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |

*****

## अभियांत्रिकी विभाग — ३१ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **ठाणे येथील तीन हात नाका जंक्शनची सुधारणा करणे.** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | तीन हात नाका येथील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी उपाययोजना करणे. पूर्व द्रुतगती महामार्गावर दोन उड्डाणपूलांचे बांधकाम करणे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | कंत्राटदार नियुक्ती प्रक्रिया सुरु आहे. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | फेब्रुवारी, २०२५ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | फेब्रुवारी, २०२७ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामास सुरुवात करणे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | ५०% काम पूर्ण करणे |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१५०.००** | **११७.००** | **१००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## अभियांत्रिकी विभाग — ३२ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **ठाणे येऊर डोंगररांगांच्या पायथ्याशी रस्ता** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | मुंबईकडून येऊर-बोरीवली दिशेकडे जाणारी तसेच ठाणे शहरातून बोरीवली दिशेकडे जाणारी वाहतुक सध्या ठाणे शहरातून जाते, त्यामुळे ठाणे शहरात वाहतूक कोंडी होत आहे. येऊर डोंगररांच्या पायथ्याशी रस्त्याने या वाहतुकिस ठाणे शहराबाहेरुन जाणारा पर्यायी मार्ग उपलब्ध होऊन ठाणे शहरातील वाहतूक कोंडी कमी होईल. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे प्रगतीपथावर |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | मार्च, २०२५ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | मार्च, २०२८ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन निविदा प्रक्रिया पूर्ण करणे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | काम प्रगतीपथावर राहील. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **५०.००** | **४१.००** | **१००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## अभियांत्रिकी विभाग – ३३ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **ता. पाटण, जि. सातारा येथील अतिवृष्टीमुळे भुस्खलन बाधित झालेल्या गावांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करण्याबाबत** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील आंबेघर (खालचे), आंबेघर (वरचे), डोकावळे, मिरगांव, हुंबराणे, क्षिदुरकवाडी, जितकरवाडी, (जिंती) या अतिवृष्टीमुळे भूस्खलनग्रस्त झालेल्या सात गावांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाकरीता ५८८ घरे व ले आऊट विकास कामे करण्याबाबत |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | प्रकल्प सल्लागार – डि. ओ. निकम |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | मार्च, २०२४ (प्रस्तावित) |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | मार्च, २०२६ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | सदर काम सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा जिल्हा यांचे मार्फत हाती घेण्यात आले आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | -- |

| ८. **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१६१.००** | **१२६.००** | **९१.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## अभियांत्रिकी विभाग – ३४ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **भिवंडी-वाडा रोड राज्यमार्ग (क्र.३५) विश्वभारती नाका ते भिनार ते वडपे या रस्त्याचे बांधकाम करणे.** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | सदर योजनेमुळे भिवंडी शहरातील वंजारपट्टी उड्डाणपूलावरुन होणारी वाहतूक कोंडी दूर होऊन तसेच भिवंडी शहरातील व नाशिककडून अहमदाबादकडे जाणारी जड वाहनांची वाहतूक, वर्दळ कमी होऊन इंधनाची बचत होईल. प्रदूषण कमी होईल व वेळेची बचत होईल. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | कंत्राटदाराची अद्याप नियुक्ती नाही. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | एप्रिल २०२५ (अंदाजित) |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | एप्रिल २०२७ (अंदाजित) |
| ७. | अ) **अद्यापपर्यतची प्रत्यक्ष कामगिरी व मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) व अंदाजपत्रके तयारकरण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली. त्या अनुषंगाने सल्लागाराने तीन पर्यायी संरेखन प्रस्तावित केले असून व्यवहार्यता संरेखन मंजूरी नंतर भू-संपादन हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. तसेच निविदा तयार करण्याचे काम प्रस्तावित आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ साठी प्रत्यक्ष कामगिरी व उद्दीष्टे** | : | भू-संपादनाची प्रक्रिया प्रगतीपथावर राहील. |

| ८. **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **४०.००** | **३३.००** | **३५.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रादेशिक स्तरावर जल स्त्रोतचा विकास** | | | |
| **(सुर्या प्रकल्प, कवडास उन्नैयी बंधारा, सुर्या नदीवर पाच कोल्हापूर पध्दतीचे बांधकाम_काळू प्रकल्प, देहरजी प्रकल्प)** | | | |
| **१) सुर्या प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना** | | | |
| | | | |
| **१.** | **योजनेचे नांव** | : | मुंबई महानगर प्रदेशातील (मुंबई वगळून) उर्वरित भागातील शहरे व खेडी यांच्या पाणी पुरवठयासाठी निश्चित केलेले जलस्त्रोत विकसित करणे व सुर्या प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना राबविणेचा कार्यक्रम. |
| **२.** | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना. (**सुर्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना**) |
| **३.** | **योजनेचे संक्षिप्त वर्णन** व **योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्ट्ये** | : | मुंबई महानगर क्षेत्राचा सर्वांगिण विकास साधण्याच्या दृष्टीने पुरेसा पाणी पुरवठा ही बाब महत्वाची असल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून महानगर क्षेत्रातील पिण्याच्या व औद्योगिक वापराच्या पाणी पुरवठयासाठी पुढील दोन दशकात या क्षेत्रात होणाऱ्या संभाव्य वाढीचा विचार करून निश्चित केलेले जलस्त्रोत विकसित करुन त्यावर आधारित पाणी पुरवठा योजना राबविणे.<br>मुंबई महानगर प्रदेशातील पश्चिम उप-प्रदेशातील सध्याच्या पाण्याची कमतरता व भविष्यातील वाढीव गरज लक्षात घेऊन सुर्या धरणातून उपलब्ध करण्यात आलेले ४०३ द.ल.ली.प्रतिदिन पाणी यावर आधारित योजना राबवून महानगर क्षेत्रातील पश्चिम उप-प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे. |
| **४.** | कार्यारंभ आदेश/ स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक/ कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे/सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम | | कार्यारंभ आदेश — MMRDA/WSRM/F-२२७/११०/२०१७<br>दि. ०४/०८/२०१७<br>कामाची किंमत - १३२९.०१ कोटी. (वस्तू व सेवा कर आणि दरवाढ वगळून)<br>कामाची सुधारीत किंमत - NA<br>कंत्राटदाराचे नाव- मे.लार्सन ॲन्ड ट्युब्रो कंन्स्ट्रक्शन<br>आजतागायत अदा केलेली रक्कम -₹ १३६५.४५ कोटी. (वस्तू व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सेवाकर आणि दरवाढ धरुन)<br>सल्लागाराचे नाव/**PMC**- M/s. Shah Technical Consultant Pvt Ltd.<br>आजतागायत अदा केलेली रक्कम - ₹१२.२५ कोटी<br>शिल्लक रक्कम - ₹ ०.४८ कोटी |
| ५. | **प्रारंभाची तारीख/ प्रत्यक्ष तारीख** | : | प्रकल्पाच्या कामास दि. ०४/०८/२०१७ कार्यादेश देण्यात आला असून प्रत्यक्ष काम दि. फेब्रुवरी, २०२१ रोजी सुरू करण्यात आले आहे. |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, EOT Date** | : | सुर्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना सुधारित वाढीव कालावधीनुसार मे, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. |
| ७. | **अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | अ) केलेली प्रत्यक्ष कामगीरी :<br>सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची सर्व कामे, प्रगतीपथावर असून जलवाहिनी टाकण्याच्या एकूण कामातील ८२.१८ कि.मी. लांबीपैकी ७७.२८ कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाले आहे. तसेच कवडास येथील उद्‌चन केंद्राचे काम ९९% पूर्ण झाले आहे व वेती येथील जलशुध्दिकरण केंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर असून ९७% काम पूर्ण झाले आहे. तसेच १.७० कि.मी. लांबीच्या मेंढवण बोगद्याचे काम १००% पूर्ण झाले आहे. वसई-विरार महानगरपालिकेला पाणी पुरवठा करण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या काशिदकोपर येथील संतुलन टाकीचे काम पूर्ण झालेले आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेस दि.१५/११/२०२३ पासून पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे.<br>मिरा-भाईंदर महानगरपालिकेला पाणी पुरवठा करण्यासाठी ४६०० मी लांबीच्या तूंगारेश्वर बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. तसेच चेणे येथील संतुलन टाकीचे बांधकाम प्रगतीपथावर असून ६९% काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित काशिदकोपर ते चेणे या दरम्यान ४.९ कि.मी. जलवाहिनी अंथरण्याचे काम, वसई व कमणखाडी वरील लघुबोगद्याची कामे प्रगतीपथावर आहेत. सर्वसाधारणपणे संपूर्ण प्रकल्पाचे ८९% काम पूर्ण झालेले आहे. सदर प्रकल्पावर आजपर्यंत निविदेअंतर्गत एकूण ₹१३६५.४५ कोटी इतका खर्च झालेला आहे.<br>ब) अपेक्षित कामगिरी :<br>संपूर्ण योजना दोन टप्प्यामध्ये कार्यान्वित करण्याचे प्राधिकरणाचे नियोजन आहे.<br>**१) टप्पा-१ (वसई-विरार महानगरपालिकेस पाणी पुरवठा** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **करणे):-**<br>योजनेचा टप्पा-१ कार्यान्वित करण्यात आला असून दिनांक १५/११/२०२३ पासून वसई-विरार महानगरपालिकेस नियमित पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. टप्पा-१ चे उद्‌घाटन मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यंच्या शुभहस्ते दि.१२/०१/२०२४ रोजी करण्यात आले आहे. या योजनेमधून वसई-विरार महानगरपालिका व इतर १७ गावांना मिळून १८५ द.ल.लि. पाणी मिळणार आहे. हे पाणी जवळजवळ १४ लक्ष लोकांना पुरेल. |
| | **ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची / उद्दिष्ट्ये** | : | **टप्पा-२ कार्यान्वित करणे (मिरा-भाईंदर महानगरपालिकेस पाणी पुरवठा करणे):-**<br>या टप्प्यामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिकेस माहे मे, २०२५ अखेर पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे. सदरच्या योजनेमधून मिरा-भाईंदर महानगरपालिकेस (२१८ द.ल.लि.) व वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील उर्वरित २७ गावांना पाणी मिळणार असून हे पाणी जवळजवळ १६ लक्ष लोकांना पुरेल. हा टप्पा कार्यान्वित करणेसाठी १३२ के.व्ही. वीज पुरवठ्याची आवश्यकता असून त्याचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (MSETCL) मार्फत प्रगतीत आहे. |

| २) नवीन कवडास उन्नैयी बंधाऱ्याचे बांधकाम (मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या अर्थसहाय्यातून) | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| **१.** | **योजनेचे नांव** | : | **नवीन कवडास उन्नैयी बंधाऱ्याचे बांधकाम** |
| **२.** | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना. (नवीन कवडास उन्नैयी बंधाऱ्याचे बांधकाम) |
| **३.** | **योजनेचे संक्षिप्त वर्णन** व **योजना राबवून साध्य करावयाचे उद्दिष्ट्ये** | : | सुर्या धरण प्रकल्पाअंतर्गत दोन धरणे असून पहिले धरण सुर्या नदीवर मुख्य धरण धामणी, ता. विक्रमगड येथे बांधण्यात आले असून दुसरे धरण सुमारे ८ कि. मी. अंतरावर कवडास ता. डहाणू येथे १३.७० द.ल.घ.मी. पाणीसाठा क्षमतेचा उन्नैयी बंधारा बांधण्यात आलेला आहे. या बंधाऱ्यात अतिरिक्त १३.४१ द.ल.घ.मी. पाणीसाठा करणेसाठी कोंकण पाटबंधारे विकास महामंडळामार्फत जुन्या बंधाऱ्याच्या ६७ मी. खालील बाजूस नवीन बंधारा बांधणे प्रस्तावित आहे.<br>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांची दिनांक ०८ जुलै, २०१९ रोजीच्या १४८ व्या बैठकीत ₹ १८४.६० कोटी रक्कमेस मान्यता देण्यात आली आहे.<br>दिनांक ०८ जुलै, २०१९ रोजीच्या १४८ व्या बैठकीत सदर काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे करिता ठेव तत्वावर करणे बाबत ठराव पारित झाला. कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यात दिनांक ०६ सप्टेंबर, २०१९ रोजी सदर कामाचा सामंजस्य करारनामा करण्यात आला आहे. |
| **४.** | कार्यारंभ आदेश/ स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक/ कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे/सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम | | अ) **स्थापत्य कामे :-**<br>कार्यारंभ आदेश - पापावि/लेशा-३/२७५०/२०१९ दि.११/११/२०१९<br>कामाची किंमत - १७२,७०,९७,६४१/- कोटी<br>कामाची सुधारीत किंमत - NA<br>कंत्राटदाराचे नाव- नोबल इंडिया कंन्स्ट्रक्शन प्रा.लि.<br>आजतागायत अदा केलेली रक्कम - ₹ १६२.५७ कोटी<br>शिल्लक रक्कम - ₹१०.१३ कोटी<br>सल्लागाराचे नाव/**PMC**- NA<br>**ब) यांत्रिकी कामे :-**<br>कार्यारंभ आदेश- MSDD/AB-२/३१२/२०२३ Dt.१७/०२/२०२५<br>कामाची किंमत - ११.८९ कोटी<br>कामाची सुधारीत किंमत - NA |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कंत्राटदाराचे नाव – मे. गौंस इंजिनियरिंग प्रा.लि.<br>आजतागायत अदा केलेली रक्कम -₹३.६५ कोटी<br>शिल्लक रक्कम - ₹८.२५ कोटी<br>सल्लागाराचे नाव/PMC- NA |
| ५. | **प्रारंभाची तारीख/ प्रत्यक्ष तारीख** | : | स्थापत्य- प्रकल्पाच्या कामास दि. ११ नोव्हेंबर, २०१९ कार्यादेश देण्यात आला असून प्रत्यक्ष काम दि. ०२ मार्च, २०२० रोजी सुरू करण्यात आले आहे.<br>यांत्रिकी – यांत्रिकी कामे दि.१७/०२/२०२३ पासून सुरू केली आहेत. |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, EOT Date** | : | डिसेंबर, २०२४ |
| ७. | **अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | प्रकल्पाची साधारण भौतिक प्रगती ७५% असुन डिसेंबर, २०२४ अखेर २५% काम पूर्ण करण्याचे नियोजन कों.पा.वि.महामंडळाचे आहे. |
| | **ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची / उद्दिष्ट्ये** | : | डिसेंबर २०२४ अखेर प्रकल्पाचे स्थापत्य काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे व मार्च २०२५ अखेर यांत्रिकी कामे पूर्ण करून जलसाठा तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. |

| **३) सुर्या नदीवर पाच कोल्हापूर पध्दतीचे बांधकाम (मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या अर्थसहाय्यातून)** | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| १. | **योजनेचे नांव** | : | **सुर्या नदीवर पाच कोल्हापूर पध्दतीचे बांधकाम** |
| २. | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना. (**सुर्या नदीवर पाच कोल्हापूर पध्दतीचे बांधकाम**) |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन** व **योजना राबवून साध्य करावयाचे उद्दिष्ट्ये** | : | सुर्या धरणातून जलसंपदा विभागातर्फे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास १४६.३३ द.ल.घ.मि. सुर्या नळ पाणीपुरवठा योजनेसाठी आरक्षित आहे<br>सदर आरक्षणामुळे सिंचन क्षेत्रात संभाव्य कपातीचा मुद्दा उपस्थित करुन सुर्या धरण पाणी बचाव संघटना व स्थानिक कष्टकरी संघटना यांनी पाणी पुरवठा योजनेस विरोध दर्शविला होता. या संदर्भात संघटनांकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनूषंगाने मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५ मे, २०१८ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये सिंचन क्षमता वाढवण्याकरीता करावयाच्या उपाययोजणांची अंमलबजावणी करण्याचे सुचविले. सदर बैठकीत कवडास बंधाऱ्याच्या खालील भागातील नदी पात्रात पाच वेगवेगळ्या ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधून अतिरिक्त २.९८ द.ल.घ.मी. (८ द.ल.लि. प्रतिदिन) इतका पाणीसाठा उपलब्ध करावा असे ठरविण्यात आले. सदरचे काम कों.पा.वि. महामंडळाने करावे व त्यास लागणारा निधी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाकडून उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.<br>त्यानुसार सदर प्रस्तावास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांची दिनांक ०७ जुलै, २०२० रोजीच्या १४९ व्या बैठकीत ₹ ५०.९८१ कोटी रक्कमेस मान्यता देण्यात आली आहे. |
| ४. | कार्यारंभ आदेश/ स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक/ कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे/सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम | | कार्यारंभ आदेश –<br>१) गारगांव बंधारा- जा.क्र.भाकाविक्र.१/लेखा-४/७०९ दि.१७/०२/२०१६<br>कंत्राटदाराचे नाव- श्री. शिवाजी ए. कंकाळे<br>२) घोळ बंधारा - जा.क्र.भाकाविक्र.१/लेखा-४/७१० दि.१७/०२/२०१६<br>कंत्राटदाराचे नाव - मे. पायोनिअर फाऊंडेशन इंजिनियर,<br>३) अंबोली बंधारा - जा.क्र.भाकाविक्र.१/लेखा-४/२३१ दि.१५/०१/२०१६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कंत्राटदाराचे नाव – श्री. जे.जी. चंपानेरकर<br>४) उर्से बंधारा - जा.क्र.भाकाविक्र.१/लेखा-४/२७१ दि.१९/०१/२०१६<br>कंत्राटदाराचे नाव – श्री. जे.जी. चंपानेरकर<br>५) चिंचारे बंधारा - जा.क्र.भाकाविक्र.१/लेखा-४/७३५ दि.१८/०२/२०१६<br>कंत्राटदाराचे नाव – श्री. ए.बी. व्ही. गोविंदू<br>एकूण पाच कामांची किंमत – ५०.९८ कोटी<br>कामाची सुधारीत किंमत - NA<br>आजतागायत अदा केलेली रक्कम - ₹४४.४४ कोटी<br>शिल्लक रक्कम - ₹६.५४ कोटी<br>सल्लागाराचे नाव/**PMC**- NA |
| ५. | **प्रारंभाची तारीख/ प्रत्यक्ष तारीख** | : | प्रकल्पाच्या कामास सन २०१६ रोजी कार्यादेश देण्यात आला असून प्रत्यक्ष काम सन २०२१ पासून सुरू करण्यात आले आहे. |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, EOT Date** | : | मे, २०२५. |
| ७. | **अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२५पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | घोळ व चिंचारे बंधाऱ्याचे काम १००% पूर्ण झाले असून पाणीसाठा निर्माण करण्यात आलेला आहे.<br>कों.पा.वि.महामंडळामार्फत गारगांव, अंबोली व उर्से को.प.बंधाऱ्याचे काम मे, २०२५ पर्यंत पूर्ण करणे. |
| | **ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची / उद्दिष्ट्ये** | : | कों.पा.वि.महामंडळामार्फत गारगांव, अंबोली व उर्से को.प.बंधाऱ्याचे काम पूर्ण करून बंधाऱ्यात पाणीसाठा निर्माण करणे. |

| **४) काळू पाणी पुरवठा प्रकल्प (मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या अर्थसहाय्यातून)** | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नांव** | : | मुंबई महानगर प्रदेशातील (मुंबई वगळून) उर्वरित भागातील शहरे व खेडी यांच्या पाणी पुरवठयासाठी निश्चित केलेले जलस्त्रोत विकसित करणे व नळपाणी पुरवठा योजना राबविणेचा कार्यक्रम. |
| २. | **चालू योजना/ नवीन योजन** | : | चालू योजना. (काळू पाणी पुरवठा प्रकल्प) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्ट्ये** | : | मुंबई महानगर क्षेत्राचा सर्वांगिण विकास साधण्याच्या दृष्टीने पुरेसा पाणी पुरवठा ही बाब महत्वाची असल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून महानगर क्षेत्रातील पिण्याच्या व औद्योगिक वापराच्या पाणी पुरवठयासाठी पुढील दोन दशकात होणाऱ्या संभाव्य वाढीचा विचार करून निश्चित केलेले जलस्त्रोत विकसित करुन त्यावर आधारित पाणी पुरवठा योजना राबविणे.<br>त्यानुसार मुंबई महानगर प्रदेशातील पुर्व उप-प्रदेशासाठी सध्याची पाण्याची कमतरता व भविष्यातील वाढीव गरज लक्षात घेऊन काळू हा निश्चित केलेला जलस्त्रोत विकसित करण्यात येत आहे.<br>या धरणतून उपलब्ध होणाऱ्या ११४० द.ल.ली. प्रतिदिन पाणीसाठा प्राधिकरण क्षेत्रातील पूर्व उप-प्रदेशास म्हणजे ठाणे, भिवंडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ व कुळगांव-बदलापूर या शहरांच्या पाणी पुरवठ्यात सुधारणा करण्याचे उद्दिष्ट आहे. |
| ४. | कार्यारंभ आदेश/ स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक/ कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे/सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम | : | कार्यारंभ आदेश – जा.क्र.रापावि-२/१५८६/२०१० दि.२९/०५/२०१०. (कों.पा.वि.महामंडळामार्फत)<br>कामाची किंमत - **₹**६६१ कोटी<br>कामाची सुधारीत किंमत – अद्यापर्यंत प्राप्त नाही.<br>कंत्राटदाराचे नाव- मे. एफ. ए. एन्टरप्रायझेस<br>आजतागायत अदा केलेली रक्कम –<br>₹ ११४.२८ कोटी. (बांधकामावर + सर्वेक्षण)<br>₹ ३९६.५४ कोटी (भुसंपादनावर)<br>शिल्लक रक्कम – ₹१५० कोटी |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | काळू प्रकल्पातील धरण बांधकाम कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाकडून मार्च २०११ पासुन सुरु करण्यात आले होते. परंतु हे काम सध्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वन जमीनी संदर्भात वन विभागाची परवानगीच्या कारणाने दि. ०२/०३/२०१२ पासून स्थगित असून आजतागायत काम बंद आहे.<br>काळू प्रकल्पाची वन व खाजगी भुसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून सन २०२४-२५ पासून प्रत्यक्ष काम सुरू करण्याचे को.पा.वि.महामंडळाचे नियोजन आहे. |
| **६.** | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख EOT Date** | : | काळू धरणबांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन कालावधी प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर ६० महिन्याचा आहे. |
| **७.** | **अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | अ) केलेली कामगारी :<br>काळू धरणाचे बांधकाम कोंकण पाटबंधारे विकास महामंडळातर्फे करण्यात येत असून यासाठी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने आतापर्यंत रु. ११४.२८ कोटी इतका निधी कोंकण पाटबंधारे विकास महामंडळास उपलब्ध केला आहे.<br>ब) अपेक्षित कामगीरी: |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | i) कोंकण पाटबंधारे विकास महामंडळातर्फे मागणी केल्यानुसार रु. ३९६.४४ कोटी इतकी NPV ची रक्कम वनविभागास अदा करणे तसेच खाजगी भूसंपादनाची कार्यवाही करणे.<br>ii) कोंकण पाटबंधारे विकास महामंडळातर्फे धरणबांधकामाची कार्यवाही. |
| | **ब) २०२५-२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्ट्ये** | : | कोंकण पाटबंधारे विकास महामंडळातर्फे वन जमिन अधिग्रहण करणे तसेच खाजगी भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन सन २०२४-२५ पासून धरणाचे बांधकाम सुरु करण्याचे उद्दिष्ट आहे. |

| **<u>५) देहरजी मध्यम प्रकल्प</u>** | | | |
|---|---|---|---|
| **१.** | **योजनेचे नांव** | : | देहरजी मध्यम प्रकल्प, ता.विक्रमगड, जि.पालघर. |
| **२.** | **चालू योजना/नवीन योजना** | : | चालू योजना. (देहरजी मध्यम प्रकल्प) |
| **३.** | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्ट्ये** | : | देहरजी मध्यम प्रकल्प पाणी पुरवठा प्रकल्पास (अंदाजित रक्कम रु. १४४३.७२ कोटी) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अर्थसहाय्यातून राबविण्यास प्राधिकरणाच्या दि. २०/१०/२०२२ रोजीच्या १५३ व्या बैठकीत मंजूरी प्राप्त आहे.सदर प्रकल्प कों.पा.वि.महामंडळामार्फत पूर्ण करण्यात येणार आहे.<br>याबाबत प्राधिकरण व कों.पा.वि.महामंडळ यांच्यातील सामंजस्य करारनामा पूर्ण झाला आहे. देहरजी धरणाची मालकी व एकुण उपलब्ध होणाऱ्या जलसाठ्यातील पाणी वाटपाचे अधिकार प्राधिकरणाचे असणार आहे.<br>या प्रकल्पातून उपलब्ध होणारा ९३.२२ द.ल.घ.मी. (२५५.३९ द.ल.लि. प्रतिदिन) पाणीसाठा मुंबई महानगर क्षेत्रातील विविध पाणी वापर संस्थांना वितरीत करण्याचे प्राधिकरणाचे उद्दिष्ट आहे. |
| **४.** | कार्यारंभ आदेश/ स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक/ कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे/सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम | | कार्यारंभ आदेश – रापावि २/लेखा-२/२२६५/०६ रायगड पाटबंधारे विभाग क्र.२ कोंकण भवन २७/०७/२००६<br>कामाची किंमत - **₹**१०३,३२,७६,७५९/-<br>कामाची सुधारीत किंमत – ९१६,६१,११,७३५/-<br>कंत्राटदाराचे नाव- मे. पी.व्ही.आर. प्रोजेक्टस लि., पुणे<br>आजतागायत बांधकामासाठी अदा<br>केलेली रक्कम -₹११४४.२५ कोटी. |
| **५.** | **प्रारंभाची अंदाजित /** | : | कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाने सन २००६-२००७ मध्ये |

| | | | |
|---|---|---|---|
| | **प्रत्यक्ष तारीख** | | निविदा मागवून देहरजी मध्यम प्रकल्पाच्या कामाचा कार्यारंभ आदेश मे. पी.व्ही.आर. प्रोजेक्टस लि., पुणे यांना दिनांक २७/०७/२००६ रोजी देण्यात आलेला आहे.<br>सदर काम मे. पी.व्ही.आर. प्रोजेक्टस लि., पुणे यांना देण्यात आले असून मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश यांच्या दि. ११/१२/२०२० च्या पत्रान्वये कामाच्या नियोजनानुसार दि.३०/६/२०२४ पर्यंत तृतीय मुदतवाढ देण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष काम सुरू मे २०२२. |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख EOT Date** | : | ५ वर्षांचा कालावधी (डिसेंबर २०२७) |
| **७.** | **अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | अ) <u>केलेली कामगीरी :</u><br>१) प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या ४४५.२९ हे. वनजमिन हस्तांतरणाच्या प्रस्तावास दि.१९/०२/ २०१६ रोजीच्या केंद्र शासनाच्या पत्रान्वये टप्पा-२ ची मंजूरी प्राप्त आहे.<br>२) देहरजी प्रकल्पास आवश्यक जवळपास सर्व सांविधानिक मान्यता प्राप्त आहे.<br>३) सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार देहरजी मध्यम प्रकल्पास अंदाजे ₹१४४३.७२ कोटी इतक्या निधीची आवश्यकता असून सदर निधी पुरवठ्या संबंधीचा प्रस्ताव कों.पा.वि. महामंडळाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सादर केला आहे व त्यास प्राधिकरणाच्या दि. २०/१०/२०२२ रोजीच्या १५३ व्या बैठकीत मंजूरी मिळालेली आहे.<br>४) देहरजी प्रकल्प प्राधिकरणाच्या अर्थसहाय्यातून राबविण्याकरिता मुं.म.प्र.वि. प्राधिकरण व कों.पा.वि. महामंडळ यांच्यातील सामंजस्य करारनामा पूर्ण झाला आहे.<br>५) सद्यस्थितीत कंत्राटदाराने माहे मे, २०२२ पासून पाया खोदकाम सुरु केलेले असून माहे नोव्हेंबर, २०२२ पासून घळभागात संधानकाचे बांधकाम सुरु केले आहे. माहे जून, २०२३ अखेर धरणाच्या बांधकामाची भौतीक प्रगती ४३% आहे. |
| | **ब) २०२५-२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्ट्ये** | : | १) सदर प्रकल्पामुळे ३ गांवे (खुळेद, साखरे, जांभे) अंशत: बाधित होत आहेत. प्रकल्पबाधीत २७२ कुटुंबाच्या पुनर्वसनाची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे मार्फत प्रगती पथावर आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | २) धरण व बुडित क्षेत्रासाठी आवश्यक २३४.९३ हे. खाजगी भुसंपादनाची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचेमार्फत प्रगती पथावर आहे. |

८. **अंदाजित खर्च-२०२५-२६** **(रुपये कोटीत)**

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **८८६.००** | **२५८१.१८** | **१६४५.००** |

**योजना राबविणारी संस्था :**

१) सुर्या प्रकल्प - मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
२) नवीन कवडास उन्नैयी बंधाऱ्याचे बांधकाम - कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
३) सुर्या नदीवर पाच कोल्हापूर पध्दतीचे बांधकाम - कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
४) काळू प्रकल्प - कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
५) देहरजी मध्यम प्रकल्प - कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.

## अभियांत्रिकी विभाग — ३६ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | अंबरनाथ नगरपरिषद कुळगाव - बदलापूर नगरपरिषद आणि उल्हासनगर महानगरपालिकेसाठी एकात्मिक घनकचरा प्रक्रियेच्या सुविधेचा विकास आणि संचालनासाठी, संरचना-बांधणे-चालविणे-हस्तांतरित करणे (DBOT) या आधारावर राबविण्याबाबत |
| २. | चालू योजना / नवीन योजना | : | नवीन योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे. | : | संरचना-बांधने-चालविणे-हस्तांतरित करणे (DBOT) यावर आधारित ६०० **TPD** क्षमतेचा एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प सर्वे क्र. **१८८** मौजे-वालीवली येथील २३.८० एकर जागेपैकी **१३.४९** एकराच्या जागेमध्ये उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्पामध्ये **Material Recovery Facility**, **Bio- degradable waste, Sanitary Landfill site**, इत्यादी सुविधांचा समावेश असून सदर प्रकल्पाचे परिचलन व देखभाल १५ वर्षाकरीता प्रस्तावित आहे. |
| ४. | कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम | | LOA: No. MMRDA/SWM/ ४१९(Part ५)/७५८/२०२३ dt.२७.०९.२०२३<br>कंत्राटदाराचे स्वीकृतीपत्र:०३.१०.२०२३<br>कार्यारंभ आदेश:No. MMRDA/SWM/ ४३०/१३३८/२०२३ dt ०७.१२.२०२३<br>कंत्राटदाराचे नाव : R&B Infra Project Ltd<br>सल्लागाराचे नाव : M/s. Tandon Urban Solutions Pvt Ltd (अंबरनाथ नगरपरिषद यांनी सदर सल्लागारासोबत प्रकल्पासाठी करारनामा केलेला आहे.)<br>दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्राधिकरणामार्फत प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देणे : १२८.८८ कोटी<br>(शासन निर्णय क्र. स्वमअ-२०२०/प्र.क्र.१५/नवि-३४ नुसार)<br>दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रकल्पाची किंमत: १४८.६८ कोटी<br>(शासन निर्णय क्र. स्वमअ-२०२०/प्र.क्र.१५/नवि-३४ नुसार) |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | : | डिसेंबर, २०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | **डिसेंबर, २०२४** |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | **सदर प्रकल्पा**साठी **कंत्राटदार नेमणूकीची प्रकिया** पूर्ण करून **कंत्राटदा**रास ०७.१२.२०२३ रोजी **कार्यारंभ आदेश** देण्यात आला आहे. तसेच, **कंत्राटदा**रासोबत प्राधिकरणाने करारनामा सुद्धा केलेला आहे.<br>कंत्राटदाराने प्रकल्पाच्या जागेवर साईट ऑफिस, कंपाऊंड वॉल, इत्यादी उभारले असून एकात्मिक घनकचरा प्रक्रियेच्या सुविधेचे बांधकामाचे काम प्रगती पथावर आहे. **कंत्राटदा**रास सदर प्रकल्पाचे संपूर्ण बांधकामाचे काम संपवून सदर प्रकल्प चालविणे व देखरेख (O&M) करावयाची आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | **प्रत्यक्ष काम सुरु** असून **डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण क**रून **कंत्राटदा**रास सदर प्रकल्प चालविणे व देखरेख (O&M) करावयाची आहे. |

| ८. | अंदाजित खर्च-२०२५-२६ | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** | |
| **१३१.५०** | **१०८.००** | **५०.००** | |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## अभियांत्रिकी विभाग — ३७ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **ठाणे घोडबंदर रस्त्यावरील गायमुख ते फाउंटन हॉटेल जंक्शनपर्यंत भुयारी मार्गाचे संकल्पन व बांधकाम करणे भाग-१** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | नवीन योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे.** | : | • गायमुख ते भाईंदर मुंबई व ठाणे शहारात सुरु असलेल्या विविध विकास कामांमुळे या शहरांतील अंतर्गत वाहतुक व्यवस्थेवरील त्राण मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. सदर बाह्य वळण रस्ता सदृश्य व्यवस्था परीपूर्ण करण्याच्या अनुषंगाने गायमुख ते भाईंदर या शिल्लक भागात वाहतुक व्यवस्था निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.<br>• **गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शन भुयारी मार्ग :** ठाणे घोडबंदर रस्ता गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शन या भागात चार पदरी (२+२ मार्गिका) असुन या मागील ठाणे शहरातील घोडबंदर रस्त्याचा भाग व पुढील राष्ट्रीय महामार्गाचा भाग विस्तृत रुंदीचे असल्याने, गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शन या भागात मोठ्या प्रमाणावर वाहतुक कोंडी होते.<br>• रस्त्याच्या एका बाजुला असलेल्या डोंगर रांगा व दुसऱ्या बाजुला असलेली खाडी यामुळे या भागात भुयारी मार्ग ३+३ मार्गिकांच्या बोगद्यांच्या स्वरुपात नविन रस्ता प्रस्तावित आहे.<br>• एकूण लांबी ५.५ किमी, प्रत्येकी ३.५ किमी लांबीचे दोन स्वतंत्र बोगदे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | कामाची किंमत — रु.७,९९७.६२ कोटी<br>ठेकेदाराची नियुक्ती प्रक्रीया प्रगतीपथावर. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | मार्च, २०२५ (अंदाजित प्रस्तावित) |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | मार्च, २०३० |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | ठेकेदाराची नियुक्ती करण्याकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | काम प्रगतीपथावर राहील. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **०.००** | **०.००** | **१२००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## अभियांत्रिकी विभाग — ३८ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **ठाणे घोडबंदर रस्त्यावरील फाऊंटन हॉटेल जंक्शन ते भाईंदर पर्यंत उन्नत मार्गाचे संकल्पन व बांधकाम करणे. भाग-२** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | नविन योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | • गायमुख ते भाईंदर मुंबई व ठाणे शहारात सुरु असलेल्या विविध विकास कामांमुळे या शहरांतील अंतर्गत वाहतुक व्यवस्थेवरील त्राण मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. सदर बाह्य वळण रस्ता सदृश्य व्यवस्था परीपूर्ण करण्याच्या अनुषंगाने गायमुख ते भाईंदर या शिल्लक भागात वाहतुक व्यवस्था निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.<br>• मुंबई महानगरपालिकेमार्फत वर्सोवा ते भाईंदर या प्रकल्पाचे काम सुरु असून भाईंदर येथील अंतिम ठिकाणापासून घोडबंदर रस्त्यापर्यंत येणेकरीता मिरा भाईंदर शहरातील अंतर्गत वाहतुक व्यवस्थेचा वापर करण्यात येणार आहे. भाईंदर ते फाऊंटन हॉटेल जंक्शन पर्यंत नविन मार्गाची निर्मिती करणे आवश्यक आहे.<br>• खाडी किनारा लगत असणारा खारफुटीचा भाग लक्षात घेता भाईंदर ते फाऊंटन हॉटेल जंक्शन या भागात संपूर्णत: उन्नत ४+४ मार्गिकांकरीता, एकूण लांबी साधारणपणे १० किमी. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे** | : | कामाची किंमत — रु.५,६२४ कोटी<br>ठेकेदाराची नियुक्ती प्रक्रीया प्रगतीपथावर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | **नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | मार्च, २०२५ (अंदाजित प्रस्तावित) |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | मार्च, २०३० |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | ठेकेदाराची नियुक्ती करण्याकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करणे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | काम प्रगतीपथावर राहील. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **०.००** | **०.००** | **१०००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## अभियांत्रिकी विभाग — ३९ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **रमाबाई आंबेडकरनगर झोपडपट्टी पुर्नवसन योजना** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | नवीन योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दीष्टे** | : | दिनांक २१ सप्टेंबर,२०२३ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे रमाबाई आंबेडकरनगर घाटकोपर (पूर्व) भू. क्र. १९४ (भाग) व १९५(भाग) येथील ३,१८,२६३ चौ. मी. (३१.८२ हेक्टर) जमिनीवर व्यापलेली झोपडपट्टी ही प्राधिकरणामार्फत संयुक्त भागिदारी तत्वावर राबविण्याबाबत विनंती केली होती.<br>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि. १२ डिसेंबर, २०२३ रोजी पार पडलेल्या १५५ व्या बैठकी मध्ये सदर विषयासंदर्भात ठराव क्र १६६७ अन्वये, रमाबाई आंबेडकरनगर घाटकोपर पूर्व भू. क्र. १९४ (भाग) व १९५ (भाग) येथील झोपडपट्टी ही प्राधिकरणामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणसोबत संयुक्त भागीदारी तत्वावर राबविण्यास मान्यता दिली आहे.<br>सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे क्षेत्र ३,१८,२६३ चौ. मी. (३१.८२ हेक्टर) एवढे असून त्यापैकी १,४१,७२८ चौ. मी. (14.17 हेक्टर) जागा शासनाच्या मालकीची व १,७६,५३५ चौ. मी. (१७.६५ हेक्टर) एवढी जमीन खाजगी मालकीची आहे. तसेच या योजनेअंतर्गत सुमारे १७,००० झोपड्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | सदर योजनेसाठी मे.संदीप शिक्रे व असोसिएट्स यांची वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून दिनांक 06 ऑगस्ट, 2024 रोजीच्या कार्यादेशाद्वारे नेमणूक करण्यात आली आहे.<br>रमाबाई आंबेडकर नगर व कामराज नगर, घाटकोपर (पु), मुंबई येथे पुनर्वसन इमारतींचे आर्किटेक्चरल फिनिशेस, लँडस्केपींग, MEPF व संबंधित पायाभुत सुविधाचे संकल्पन व बांधकाम (टप्पा -१) करण्याकरीता कंत्राटदाराची नेमणूक करण्याची प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | **टप्पा -१** ०१ जानेवारी, २०२५ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | **टप्पा -१** ३१ डिसेंबर, २०२७ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५** | : | माहे मार्च, २०२५ पर्यंत २% काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | **पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | | |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | माहे एप्रिल २०२५ ते मार्च, २०२६ पर्यंत २१% काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **०.००** | **०.००** | **२५०.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## अभियांत्रिकी विभाग – ४० (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **पूर्व द्रुतगती महामार्गावर ठाणे शहरातील आनंद नगर ते साकेत पर्यंतच्या ८.२४ कि.मी लांबीच्या उन्नत मार्गाचे बांधकाम करणे.** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | पूर्व द्रुतगती महामार्ग ठाणे शहरात आनंद नगर येथे प्रवेश केल्यानंतर ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागातून मार्गक्रमण करीत साकेत गृहसंकुलाच्या पुढे ठाणे शहराची सीमा ओलांडतो. याच महामार्गाचे पुढे राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० मध्ये रुपांतर होते. त्यामुळे या महामार्गाच्या ठाणे शहरातील भागात शहरांतर्गत तसेच बाह्य वाहतुकीची सरमिसळ होऊन मोठ्या प्रमाणावर वाहतुक कोंडी होते. यावर उपाययोजना करण्यासाठी आनंद नगर ते साकेत या भागात पूर्व द्रुतगती महामार्गावर उन्नत मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. या उन्नत मार्गाचा वापर बाह्य वाहतुकीने केल्याने शहरांतर्गत वाहतुकीला दिलासा मिळेल. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि<br>स्वीकृतीपत्र दिनांक ३०/०९/२०२४<br>कामाची किंमत: १८४७.७३ कोटी<br>सल्लागाराचे नाव: मे. निपॉन कोई इं – प्रभावी (जे.व्ही.) |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | माहे ऑक्टोबर, २०२४ पासून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे.. |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | माहे ऑक्टोबर, २०२८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली असून काम सुरु असेल. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | काम प्रगतीपथावर राहील |
| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| **३००.००** | **२९९.००** | **५००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

# अभियांत्रिकी विभाग — ४१ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **बाळकुम ते गायमुख ठाणे खाडी किनारा मार्गाचे (ठाणे कोस्टल रोड) बांधकाम करणे.** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | ठाणे शहरातील घोडबंदर रस्ता हा मुंबई-आग्रा महामार्ग व मुंबई अहमदाबाद महामार्ग यांना जोडणारा मुख्य दुवा असल्याने या रस्त्यावर वाहतुकीचे प्रमाण मोठे आहे. तसेच या रस्त्याच्या दोन्ही बाजूंस मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असल्याने शहरांतर्गत वाहतुकीचे देखील प्रमाण फार मोठे आहे. त्यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतुक कोंडी होते. शहराबाहेरील वाहतुकीकरीता पर्यायी मार्ग म्हणुन बाळकुम ते गायमुख या ठाणे खाडी किनारा मार्गाचे बांधकाम प्रस्तावित करण्यात आले आहे. या रस्त्यामुळे घोडबंदर रस्त्यावरील वाहतुक कोंडी पासुन दिलासा मिळेल. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | कंत्राटदार - नवयुगा इंजिनियर कंपनी लि.<br>स्विकृतीपत्र दिनांक: ३०/०९/२०२४<br>कामाची किंमत ₹ २७२७.०० कोटी<br>सल्लागार — टेकफोर योशीन जेव्ही |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | नोव्हेंबर, २०२४ पासून कामास सुरुवात |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | माहे नोव्हेंबर, २०२८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | २) निविदा प्रक्रिया करुन कामास सुरुवात करणे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | काम प्रगतीपथावर राहील |
| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| **५००.००** | **४१०.८९** | **६००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## अभियांत्रिकी विभाग — ४२ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **छेडानगर-घाटकोपर ते ठाणे पर्यंत पूर्व मुक्त मार्गाचे विस्तारीकरण** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | चालू योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | पूर्व द्रुतगती मार्गावरील वाहन क्षमता वाढविणे व मुंबई उपनगराकडून ठाणे कडे जाणाऱ्या वेळेत बचत करणे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | | कंत्राटदार - मे. नवयुगा इंजिनियर कंपनी लि.<br>स्वीकृती पत्र दि.३०/०९/२०२४<br>कामाची किंमत : रु.२६८२.०० कोटी<br>सल्लागार: मे.शेलाडीया असोशिएट्स जेव्ही स्नेक इंटरनॅशनल |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | नोव्हेंबर, २०२४ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | माहे नोव्हेंबर, २०२८ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | निविदा प्रक्रिया पूर्ण करून कंत्राटदाराची नेमणूक करून प्रत्यक्ष कामास सुरूवात होईल. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | काम प्रगतीपथावर राहील |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **५००.००** | **४०८.२३** | **८००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मुरबाड रोड, बदलापुर रोड व पुना लिंक रोड यांना जोडणारा वालधुनी नदीस समांतर असलेला विकास आराखड्यातील २४ मी. रूंद रस्ता व त्यावरील दोन रेल्वे उड्डाणपुल (आर.ओ. बी.) विकसित करणे.** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | नविन योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | • उन्नत रस्त्याची लांबी - ४.१० किमी. (२+२ मार्गिका, आर्म आणि रॅम्पसह.)<br>• रस्त्याची लांबी – २.७ किमी.<br>• रहदारी आणि प्रवासाचा वेळ 25 मिनिटांनी कमी होईल.<br>• कल्याण शहरासाठी उत्तम पूर्व-पश्चिम कनेक्टिव्हिटी.<br>• यामुळे वाहतूक सुरळीतपणे पार पाडणे सुलभ होईल. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक : No. No.ED/KDMC/Waldhuni/WO/१३९७/२०२४ dt. ११.१०.२०२४<br>कामाची कंत्राटीय किंमत: ₹.४७४.१ कोटी<br>कंत्राटदाराचे नाव: M/s. Ashoka Buildcon Limited<br>प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव: मे. लायन इंजिनिअरींग कन्सल्टन्ट प्रा. लि.<br>कंत्राटदारास मोबलायजेशन अडव्हान्स अदा: Rs.२२.७५ कोटी |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | ११/१०/२०२४ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | ११/०४/२०२७ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून जमिन उपलब्ध करुन दिल्यास आणि अडथळे वेळेवर दूर झाल्यास डिझाइन, बांधकाम रेखा चित्रे, प्लांटची स्थापना, कास्टिंग यार्ड मोबलायझेशन इ. पूर्व बांधकाम उपक्रमे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | ५०% काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. |
| ८. | **अंदाजित खर्च २०२५-२६** | : | **(रुपये कोटीत)** |

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| **१००.००** | **८७.९७** | **२००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## अभियांत्रिकी विभाग – ४४ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **गायमुख ठाणे ते पायेगांव** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | नविन योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | चिंचोटी अंजूरफाटा रस्त्यावरील पायेगांव आणि ठाणेमधील गायमुख दरम्यानची प्रस्तावित मिसींग लिंक आहे. ठाणे खाडीच्या दोन्ही बाजू सदर प्रकल्पाने जोडल्या जाणार आहेत. सद्यस्थितीत गायमुख ते पायेगांव (गायमुख मार्गे फाउंटेन ते चिंचोटी अंजूरफाटा रोड मार्गे व कामण ते पायेगाव ) ह्या ३१.५ किमी अंतरासाठी सुमारे दीड तास कालावधी लागत आहे. सदर प्रकल्पामुळे प्रवासाचे अंतर केवळ ५ ते ७ मिनिटे होणार आहे.जे सद्यस्थितीत सुमारे १.५० तास लागत आहे. इंधनाची व वेळेची बचत होणार आहे. प्रकल्पामुळे प्रवास जलद होणार आहे.<br>**प्रकल्पाची मुख्य वैशिष्टये:**<br>• प्रकल्पाची एकूण लांबी: ६५०६ मी. आणि रुंदी २३.६० मी.<br>• व्हायाडक्टची लांबी : ४०२५ मी.<br>• रॅम्प्सची लांबी : २.४८४ मी.<br>• प्रकल्पाच्या संरेखनामध्ये खाडीवरील पुलासोबत बुलेट ट्रेन, मल्टिमोडल कॉरिडोर, डेडिकेटेड फ्राइट कॉरिडोर, दिवा-वसई रेल्वे मार्ग व अंजुर चिंचोटी रस्ता पार करावा लागत आहे. सदर प्रकल्पाच्या वाहतुकीचे सुयोग्य नियमन होण्याच्या दृष्टीने अंजुर-चिंचोटी रस्त्यावर चढण्या व उतरण्याकरीता रॅम्प्सची तरतुद करण्यात आली आहे.<br>• प्रकल्पाचे काम पूर्ण होण्याचा कालावधी : ४२ महिने (पर्यावरण, इतर वैधानिक मंजुरी आणि पावसाळ्याच्या कालावधीसह)<br>• दोष दायित्व कालावधी : २४ महिने |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक : No. MMRDA/ED/WO /Gaimukh-Payegaon / १४०४/२०२४,<br>Date: १४.१०.२०२४<br>कामाची कंत्राटीय किंमत: ₹.९७५.५८ कोटी<br>कंत्राटदाराचे नाव: M/s. Ashoka Buildcon Limited<br>प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव: M/s. Sheladia associates Inc.<br>कंत्राटदारास मोबलायजेशन अडव्हान्स अदा: Rs.१४.१० कोटी |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | १४/१०/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | १३/०४/२०२८ |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | सर्व परवानग्यांचे प्रस्ताव संबंधित विभागास साद करण्यात आलेले आहे. त्याबाबतचा पाठपुरावा सुरु आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | आवश्यक परवानग्या, भू-संपादन करुन कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येईल. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **२००.००** | **१४८.००** | **५९०.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | **:** | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## अभियांत्रिकी विभाग – ४५ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **कासारवडवली ठाणे ते खारबाब भिवंडी** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | नविन योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | प्रस्तावित रस्ता मुंबई मेट्रो लाईन ४ आणि ईशान्य विभाग मध्य रेल्वेच्या दिवा वसई रेल्वे लाईन दरम्यान कनेक्टर म्हणून काम करेल. प्रस्तावित खाडी पूल ठाणे आणि भिवंडी ग्रामीण भागाला जोडेल. सध्या, ठाणे ते खारबाव हे अंतर पार करण्यासाठी NH-३ आणि अंजूर चिंचोटी रस्त्याने सुमारे १.५ तास लागतो. या पुलामुळे प्रवासाचा वेळ 5 ते 7 मिनिटे कमी होणार आहे. यामुळे वाहतूक सुरळीतपणे पार पडेल, प्रवासाचा वेळ आणि इंधनाची बचत होईल. प्रस्तावित संरेखन ठाणे खाडी ओलांडते आणि पुढे - विरार अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडॉर (MMC), मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वे, दिवा-वसई विद्यमान रेल्वे आणि समर्पित फ्रेट कॉरिडॉर (DFC) आणि अंजूर चिंचोटी रोडला जोडते.<br>**प्रकल्पाची मुख्य वैशिष्टये:**<br>• प्रकल्पाची एकूण लांबी: ३९३० मी. आणि रुंदी: ४० मी.<br>• प्रकल्पाचे काम पूर्ण होण्याचा कालावधी : ४२ महिने (पर्यावरण, इतर वैधानिक मंजुरी आणि पावसाळ्याच्या कालावधीसह)<br>• दोष दायित्व कालावधी : २४ महिने |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक : No. MMRDA/ED/WO/Kasarvadavali to Kharbav/ १३९८(A)/ २०२४, Date: ११.१०.२०२४<br>कामाची कंत्राटीय किंमत: ₹.१५२५.३१ कोटी<br>कंत्राटदाराचे नाव: M/s. AFCONS Infrastructure Ltd.<br>प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव: M/s. SMEC International Pvt Ltd. in association with M/s. Sui Generis Infratech LLP<br>कंत्राटदारास मोबलायजेशन अडव्हान्स अदा: Rs.७६.२६ कोटी |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | १४/१०/२०२४ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख** | : | १३/०४/२०२८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | **(EOT Date)** | | |
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | सर्व परवानग्यांचे प्रस्ताव संबंधित विभागास साद करण्यात आलेले आहे. त्याबाबतचा पाठपुरावा सुरु आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | आवश्यक परवानग्या, भू-संपादन करुन कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ८. **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **५००.००** | **३७०.००** | **४००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## अभियांत्रिकी विभाग – ४६ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **कोलशेत ठाणे ते काल्हेर भिवंडी** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | नविन योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | कोलशेत ठाणे आणि ठाणेमधील काल्हेर भिंवडी दरम्यानची प्रस्तावित मिसींग लिंक आहे. काल्हेर गाव जुना आग्रा रोडशी जोडलेले असून सदर परिसर औद्योगिक क्षेत्र आहे. सद्यस्थितीत कोलशेत ते काल्हेर (कोलशेत-कापूरबावडी-बाळकुम-कशेळी-काल्हेर) ह्या ८.५०किमी अंतरासाठी सुमारे पाऊण तास कालावधी लागत आहे. सदर प्रकल्पामुळे प्रवासाचे अंतर केवळ ५ ते ७ मिनिटे होणार आहे सद्यस्थितीत सुमारे ४५ मिनिटे लागत आहे. इंधनाची व वेळेची बचत होणार आहे प्रकल्पामुळे प्रवास जलद होणार आहे.<br>**प्रकल्पाची मुख्य वैशिष्टये:**<br>• प्रकल्पाची एकूण लांबी: १.६४० किमी. आणि रुंदी २३.६० मी.<br>• व्हायाडक्टची लांबी : ११७५ मी.<br>• रॅम्प्सची लांबी : ४६५ मी.<br>• प्रकल्पाचे काम पूर्ण होण्याचा कालावधी : ३६ महिने (पर्यावरण, इतर वैधानिक मंजुरी आणि पावसाळ्याच्या कालावधीसह)<br>• दोष दायित्व कालावधी : २४ महिने |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक : No. MMRDA/ED/WO/Kolshet-Kalher/१४०६/२०२४, Date: १४.१०.२०२४<br>कामाची कंत्राटीय किंमत: ₹.२८८.१८ कोटी<br>कंत्राटदाराचे नाव: M/s. Ashoka Buildcon Limited<br>प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव: M/s. Bloom Companies LLC & M/s. Spectrum Techno Consultant Pvt. Ltd (JV).<br>कंत्राटदारास मोबलायजेशन अडव्हान्स अदा: Rs.१५.०० कोटी |
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | १४/१०/२०२४ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | १३/१०/२०२७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | अ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | सर्व परवानग्यांचे प्रस्ताव संबंधित विभागास साद करण्यात आलेले आहे. त्याबाबतचा पाठपुरावा सुरु आहे. |
| | ब) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | आवश्यक परवानग्या, भू-संपादन करुन कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येईल. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| **१५०.००** | **११७.००** | **१८४.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## अभियांत्रिकी विभाग — ४७ (प्रकल्प)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | : | **ऐरोली बोगदा ते कटाई नाका रोड** |
| २. | **चालू योजना / नवीन योजना** | : | नविन योजना |
| ३. | **योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे** | : | ऐरोली - कटाई नाका रस्ता प्रकल्प हा ऐरोली पुलापासून सुरु होऊन ठाणे - बेलापूर रस्ता, ठाणे -बेलापूर रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग क्र. ४, दिवा - पनवेल रेल्वे, इ. ओलांडून कल्याण शिळ रस्त्यावरील कटाई नाका येथे पर्यंत असून त्यांची एकूण लांबी १२.७१ किमी इतकी आहे. सदर भाग- १ व २ कामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता रु. १४४१.३९ कोटी इतक्या रक्कमेस प्राधिकरणाच्या दिनांक २०/१०/२०२२ रोजी संपन्न झालेल्या १५३ व्या बैठकीत घेण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पामुळे कल्याण — डोंबिवली आणि नवी मुंबईमधील अंतर ७ कि.मी. ने कमी होईल त्यामुळे १५ मिनिटांच्या वेळेत बचत होईल. सदर प्रकल्प कामकाजाच्या दृष्टीने खालील ३ भागांमध्ये विभागणी केलेली आहे.<br>प्रकल्पाचा भाग ३ हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ते कल्याण — शिळ रोडवर कटाई नाका यांचे दरम्यान आहे. सदर संपूर्ण मार्ग उन्नत मार्ग असून (Elevated Road) त्यांची लांबी ६.७१ कि.मी. इतकी आहे. सदर प्रकल्पासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता रु. २६७७.९४ कोटी इतक्या रक्कमेस प्राधिकरणाच्या दिनांक ०५/०३/२०२४ रोजी संपन्न झालेल्या १५६ व्या बैठकीत घेण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पासाठी कंत्राटदार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या नेमणूकी करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ४८ महिन्याचा (डिझाईन, भूसंपादन व बांधकामासह) कालावधी आहे. सदर प्रकल्पासाठी लागणा-या भूसंपादनाची प्रक्रिया ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. |
| ४. | **कार्यारंभ आदेश / स्वीकृतीपत्र क्र. आणि दिनांक / कामाची किंमत, कामाची सुधारीत किंमत, कंत्राटदाराचे / सल्लागाराचे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव, आजतागायत अदा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम** | : | Work Order: MMRDA/CD/WO/NH TO KATAI NAKA/१३९४/२०२४ DATED ११/१०/२०२४<br>Project Cost: Rs.१९८१.१७<br>Contractor Name: M/s. AFCONS Infrastructure Ltd.<br>Consultant Name: M/s. SMEC International Pty. Ltd. in association with M/s. Sui Generis Infratech LLP<br>Mobilisation Advance Paid to Contractor: Rs.११६.८८ Cr. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | **प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख** | : | ११/१०/२०२४ |
| ६. | **काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, कामाची मुदत वाढ तारीख (EOT Date)** | : | १०/१०/२०२८ |
| ७. | आ) **आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी आणि मार्च २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी** | : | प्रकल्पा करीता कंत्राटदार व व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून काम सुरु करण्यात आली आहे. |
| | भ) **२०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे** | : | काम प्रगतीपथावर राहील. |

| | | |
|---|---|---|
| ८. **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **२००.००** | **१७६.८९** | **४५०.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था** | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

# नगर व क्षेत्र नियोजन विभाग

(ड)

# अनुसूची

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | योजना | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **(सर्वेक्षण व अभ्यास)** | | |
| १ | वांद्रे कुर्ला संकुलातील विकास व नियंत्रण | ५.०० | १७५ |
| २ | सार्वजनिक परिवहन उन्मुख विकास (TOD) - मेट्रो मार्गिका अभ्यासासाठी | ५.०० | १७६ |
| ३ | मुंबई महानगर प्रदेशामध्ये महामुंबई सार्वजनिक कलाकृती प्रकल्प राबविणे. | १.०० | १७७ |
| ४ | वरळी व कुर्ला डेअरीच्या व इतर जमीनीचा विकास | ५.०० | १७८ |
| ५ | ठाणे येथील TMT च्या बस स्थानकांचा विकास | ५.०० | १७९ |
| ६ | बुलेट ट्रेन व आंतरराष्ट्रीय विकास केंद्र (IFSC Integration in BKC) | ५.३० | १८० |
| ७ | बुलेट ट्रेन स्टेंशन व सभोवतालच्या क्षेत्राचा विकास (SMART) | १५.०० | १८१ |
| ८ | ब्रँड MMRDA आणि  प्राधिकरणाची ५० वर्षे यशस्वी वाटचाल | ५.०० | १८२ |
| ९ | घनकचरा व्यवस्थापन - क्षेत्रीय योजना | ५.०० | १८३ |
| १० | जागतिक आर्थिक केंद्र म्हणून MMR विकसित करणे (Growth Hub) | १००.०० | १८४ |
| ११ | मुंबई विद्यापिठाच्या कलिना परिसराचा बृहत आराखडा | १.१० | १८६ |
| | **एकूण** | **१५२.४०** | |

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग – १ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव. | : | **वांद्रे-कुर्ला संकुलातील विकास व नियंत्रण** |
| २. | चालू योजना/नवीन योजना. | : | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये. | : | वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदींनुसार विकास परवानग्या देणे. |
| ४. | Work order/LOA Number and Date, Awarded cost of work, Revised cost of work, Name of Contractor/Consultant/ PMC, Payment done till date, Balance payable amount. | : | प्राधिकरणाच्या १४९ व्या बैठकीमधिल मान्यतेनुसार वांद्रे-कुर्ला संकुलातील 'E' ब्लॉकच्या पूर्नविकासासाठी एकत्रित आराखडा बनविण्यासाठी खालिलप्रमाणे सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.<br>Work Order date - १२th April, २०२१.<br>Awarded Cost of work - ₹०२.१० Cr.<br>Name of Contractor - Architect Hafeez Contractor.<br>Payment done till date - ₹०.०Cr.<br>Balance Payment - ₹०२.१० Cr. |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख. | : | दिनांक ७ मार्च, १९७७ पासून, म्हणजे बांद्रा-कुर्ला अधिूसचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नियुक्ती झाल्याच्या तारखेपासून. |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, EOI Date. | : | अखंड प्रक्रिया |
| | अ) आतापर्यंतची (३१/१०/२०२४ पर्यंत) प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी. | : | या वर्षामध्ये आतापर्यंत एकूण _____ प्रकरणांना विकास परवानग्या देण्यात आलेल्या आहेत. |
| ७. | ब) २०२५ व २०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे. | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे जेव्हा केव्हा विकास परवानगी आणि इमारतींचा वापर सुरु करण्यासाठी वापर प्रमाणपत्र यासाठी अर्ज येतील तेव्हा तेव्हा त्यावर संस्करण करुन ते देण्यात येतील. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| | **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| ५.०० | ०.५० | ५.०० |

| | | |
|---|---|---|
| ९. | योजनची अंमलबजावणी करणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग – २ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव. | : | सार्वजनिक परिवहन उन्मुख विकास (TOD) मेट्रो मार्गिका अभ्यासाठी कामाचे नियोजन व विकास नियंत्रण. |
| २. | चालू योजना/नवीन योजना. | : | चालू योजना. अखंड प्रक्रिया. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये. | : | (अ) आवासन व शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार यांनी MRTS मार्गिकांपासून चालत जाण्याच्या अंतरामध्ये अधिकतम रहिवास, वाणिज्य व तत्सम वापरांना उत्तेजन देण्यासाठी राष्ट्रीय परिवहन उन्मुख विकास (TOD) योजना प्रसिध्द केली आहे. त्याप्रमाणे भारतामधील अनेक शहरांमधील MRTS मार्गिकांलगत परिवहन उन्मुख विकासाबाबतचे धोरण अमलात आले आहे.<br>ब) मुंबई माहनगर प्रदेशामधील MRTS स्थानकावर अपेक्षित प्रवासी संख्या उपलब्ध होण्यासाठी सदर स्थानकालगतच्या क्षेत्रामध्ये अधिकतम रहिवास, वाणिज्य व तत्सम वापरांना प्रोत्साहन देण्यासाठी या मार्गिकांलगत परिवहन उन्मुख विकास (TOD) करणे आवश्यक आहे. सदर परिवहन उन्मुख विकासामधून प्राधिकरणास भविष्यात नविन उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल व त्याद्वारे प्राप्त झालेला निधी मेट्रो प्रकल्पांच्या भांडवली खर्चाची परतफेड करण्यास उपयुक्त होईल.<br>(क) तसेच, मुंबई महानगर प्रदेशामध्ये MRTS स्थानकांलगत परिवहन उन्मुख विकासाबाबतचे प्रारुप धोरण व प्रारुप नियमावली शासनास सादर केली आहे. |
| ४. | Work order/LOA Number and Date, Awarded cost of work, Revised cost of work, Name of Contractor/Consultant/ PMC, Payment done till date, Balance payable amount. | : | लागू नाही. |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख. | : | मार्च, २०१९ |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख/EOT Date | : | अखंड प्रक्रिया |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी. | : | (अ) मेट्रो लाईन ७ मार्गिकेवरील परिवहन उन्मुख विकास नियोजन व नियंत्रणाचा पायलट प्रकल्प.<br>(ब) मुंबई महानगर प्रदेशासामधील MRTS स्थानकांलगत परिवहन उन्मुख विकासाबाबत धोरण व नियमावलीबाबतची कामे. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची अद्दिष्टये. | : | धोरण/नियमावली बाबतची कामे. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| ५.०० | ५.०० | ५.०० |

| | | |
|---|---|---|
| ९. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग — ३ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव. | : | मुंबई महानगर प्रदेशामध्ये महामुंबई सार्वजनिक कलाकृती प्रकल्प राबविणे. |
| २. | चालू योजना/नवीन योजना. | : | नविन योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये. | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत समाविष्ट होणारे विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्र, प्रादेशिक प्रकल्प जसे की, मेट्रो, मुंबई पारबंदर प्रकल्प, बहुउद्देशीय मार्गिका व सामाजिक उपक्रमांमध्ये सार्वजनिक कलाकृतीचा समावेश करण्यासाठी आराखडा व धोरण निश्चित करुन त्याप्रमाणे महामुंबई सार्वजनिक कलाकृती प्रकल्प राबविणे. |
| ४. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख. | : | दिनांक ३० जानेवारी, २०२०. याबाबतच्या प्रस्तावास मा. महानगर आयुक्तांची मान्यता मिळालेल्या तारखेपासून. |
| ५. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख. | : | अखंड प्रक्रिया |
| ६. | अ) आतापर्यंत प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी.<br>ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची अद्दिष्टये. | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिरण अंतर्गत समाविष्ट होणारे विशेष नियोजन प्रधिकरण क्षेत्र, प्रादेशिक प्रकल्प जसे की, मेट्रो, मुंबई पारबंदर, बहुउदेशीय मार्गिका व सामाजिक उपक्रमांमध्ये सार्वजनिक कलाकृतीचा समावेश करण्यासाठी आराखडा व धोरण बनविण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करणे. |

| ७. **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| १.०० | १.०० | १.०० |

| | | |
|---|---|---|
| ८. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग — ४ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव. | : | **वरळी व कुर्ला डेअरीच्या व इतर जमीनीचा विकास** |
| २. | चालू योजना/नवीन योजना. | : | नवीन योजना. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये. | : | सदर भूखंडावर उच्च घनतेचा मिश्र वापर विकास प्रस्ताव करुन सदर क्षेत्रामध्ये रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करता येतील. तसेच सदर भूखंडाच्या विल्हेवाटीद्वारे प्राधिकरणास उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे. |
| ४. | Work order/LOA Number and Date, Awarded cost of work, Revised cost of work, Name of Contractor/Consultant/ PMC, Payment done till date, Balance payable amount. | : | --- |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख. | : | प्राधिकरणाच्या १५५ व्या बैठकीतील मान्यता दिनांक १२/१२/२०२३. |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख/EOT Date | : | --- |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी. | : | प्राधिकरणाने दिनांक ३१/०१/२०२३ रोजी सदर भूखंड विनामोबदला, बोजारहीत व भोगवटादारवर्ग-१ पध्दतीने वाटप करण्याबाबत आणि प्राधिकरणास प्रकल्प अंमलबजावणी संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमण्याबद्दलचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची अद्दिष्टये. | : | --- |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **५.००** | **०.००** | **५.००** |

| | | |
|---|---|---|
| ९. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग – ५ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव. | : | **ठाणे येथील TMT बस स्थानकांचा विकास** |
| २. | चालू योजना/नवीन योजना. | : | नविन योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये. | : | ठाणे येथील TMT च्या मालकीच्या बस स्थानकांचा तसेच एस.टी. महामंडळाच्या बस स्थानकांचा संमिश्र वापरासाठी विकास करुन अथवा परिसरातील शासकीय जमिनीवरिल झोपडपट्टयांचे पूनर्वसन करण्यासाठी वापरुन सदर झोपडया शासकीय जमिनीवर संमिश्र वापराद्वारे बस स्थानकांचे आधुनिकिकरण करुन प्राधिकरणासाठी निधी उभारण्याचे प्रस्तावित आहे. |
| ४. | Work order/LOA Number and Date, Awarded cost of work, Revised cost of work, Name of Contractor/Consultant/ PMC, Payment done till date, Balance payable amount. | : | --- |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख. | : | ठाणे महानगरपालिकेकडून प्राधिकरणास प्रस्ताव सादर झाल्यानंतर. |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख/EOT Date | : | --- |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी. | : | --- |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची अद्दिष्टये. | : | --- |

| ८. **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **५.००** | **०.००** | **५.००** |

| | | |
|---|---|---|
| ९. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग — ६ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव. | : | **बुलेट ट्रेन व आंतरराष्ट्रीय विकास केंद्र** |
| २. | चालू योजना/नवीन योजना. | : | नवीन योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये. | : | वांद्रे-कुर्ला संकुलाच्या जी-टेक्ट ब्लॉकमधील बुलेट ट्रेनच्या भूमीगत स्थानकाच्या वर हाय स्ट्रीट रिटेल पध्दतीचा विकास करणे. |
| ४. | Work order/LOA Number and Date, Awarded cost of work, Revised cost of work, Name of Contractor/Consultant/ PMC, Payment done till date, Balance payable amount. | : | --- |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख. | : | प्राधिकरणाच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या १४६ व्या बैठकीनुसार बुलेट ट्रेन व आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्राच्या एकात्मिक विकासास मान्यता. |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख/EOT Date | : | --- |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी. | : | --- |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची अद्दिष्टये. | : | --- |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **५.२७** | **१.००** | **५.३०** |

| | | |
|---|---|---|
| ९. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग - ७ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव. | : | **बुलेट ट्रेन स्टेशन व सभोवतालच्या क्षेत्राचा विकास** |
| २. | चालू योजना/नवीन योजना. | : | |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये. | : | मुंबई –अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या महाराष्ट्रातील ठाणे, विरार व भोईसर स्टेशनांच्या सभोवताल क्षेत्राचा विकास करणे. |
| ४. | Work order/LOA Number and Date, Awarded cost of work, Revised cost of work, Name of Contractor/Consultant/ PMC, Payment done till date, Balance payable amount. | : | --- |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख. | : | महाराष्ट्र शासनाने दि. ०४/१०/२०१९ रोजीच्या आदेशान्वये प्राधिकरणाचा प्रकल्प करणारी संस्था (Project Implimantation Agency) म्हणून नेमणूक केली आहे. |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख/EOT Date | : | --- |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी. | : | --- |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची अद्दिष्टये. | : | शासनाकडून प्राधिकरणास या क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करणे. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१५.००** | **०.००** | **१५.००** |

| | | |
|---|---|---|
| ९. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग – ८ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव. | : | प्राधिकरणाची ५० वर्षे यशस्वी वाटचाल + ब्रँड MMRDA |
| २. | चालू योजना/नवीन योजना. | : | नवीन योजना. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये. | : | मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने, प्राधिकरणाने त्याच्या स्थापनेपासून मुंबई महानगर प्रदेशाच्या (MMR) वृद्धीसाठी व विकासाकरिता केलेले योगदान यांचे संकलन करून पुस्तक / अहवाल प्रकाशित करणे. |
| ४. | Work order/LOA Number and Date, Awarded cost of work, Revised cost of work, Name of Contractor/Consultant/ PMC, Payment done till date, Balance payable amount. | : | --- |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख. | : | २६ जानेवरी, २०२४ (प्राधिकरणाच्या ४९ व्या वर्धापन दिनापासुन) |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख/EOT Date | : | --- |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी. | : | --- |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची अद्दिष्टये. | : | मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने प्राधिकरणाच्या स्थापनेपासून मुंबई महानगर प्रदेशाच्या (MMR) वृध्दीसाठी व विकासाकरिता केलेले योगदान व प्राधिकरणाच्या मागील ५० वर्षातील यशस्वी वाटचालीबद्दलची माहिती संकलीत करुन प्रकाशित करणे. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| **५.००** | **५.००** | **५.००** |

| | | |
|---|---|---|
| ९. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग – ९ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | घनकचरा व्यवस्थापन - क्षेत्रीय योजना |
| २. | चालू /नवीन योजना | : | नवीन योजना. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्ट | : | शाश्वत शहरी विकासासाठी मुंबई महानगर प्रदेशातील एकात्मिक कचरा व्यवस्थापन, हवामान लवचिकता आणि चक्रीय अर्थव्यवस्था ह्या उपक्रमामुळे घनकचरा व्यवस्थापनासंबंधित समस्यांचे निराकरण होऊन, चक्रीय अर्थव्यवस्थेस चालना मिळेल. ज्यामुळे मुंबईच्या ३० दशलक्ष रहिवाशांकरिता स्वच्छ, हरित भवितव्याचा मार्ग मोकळा होईल. या उपक्रमामुळे मुंबई महानगर प्रदेश (MMR), स्मार्ट कचरा व्यवस्थापन करणे, हवामानबदलामुळे परिणाम न होणाऱ्या पायाभूत सुविधा उभारणे ज्यायोगे चक्रीय अर्थव्यवस्थेत भरीव वाढ हाईल. |
| ४. | Work Order/LOA Number and Date, Awarded Cost of Work, Revised cost of Work, Name of Contractor/Consultant/PMC, Payment done till date, Balance payable Amount | : | निरंक |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | : | एप्रिल, २०२४ |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | : | निरंक |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | शाश्वत शहरी विकासासाठी संयुक्त घोषणा (Joint Declaration): मुंबई महानगर प्रदेशातील एकात्मिक कचरा व्यवस्थापन, हवामान लवचिकता आणि चक्रीय अर्थव्यवस्था, ह्या उपक्रमाकरिता मुं.म.प्र.वि.प्राधिकरण व नेदरलँड येथील पायाभूत सुविधा आणि जल व्यवस्थापन मंत्रालय यांच्यासोबत एका संयुक्त घोषणापत्र (Joint Declaration) करण्यात आले आहे. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | : | यांस अनुसरुन प्राथमिक अभ्यास करणे, भागधारकांचा सल्ला, प्रकल्पस्थळांना भेटी देणे, तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करणे. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **५.००** | **५.००** | **५.००** |
| ९. योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | |

# नगर व क्षेत्र नियोजन विभाग – १० (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | **जागतिक आर्थिक केंद्र म्हणून MMR विकसित करणे (Growth Hub) निती आयोग व महाराष्ट्र शासन यांनी संयुक्तीकरीत्या मुंबई महानगर प्रदेशासाठी तयार केलेलया आर्थिक बृहत आराखडयाची अंमलबजावणी.** |
| २. | चालू /नवीन योजना | : | नवीन योजना. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्ट | : | अ) निती आयोगाने शहर क्षेत्रांना ग्रोथ हब (G-Hub) म्हणून विकसित करण्याची संकल्पना राबविली असून G-Hub नावाच्या या संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राची (महाराष्ट्र) पायलट सिटीरिजन म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन मुंबई महानगर क्षेत्राचा कालबध्द विकास करण्याकरिता Developing MMR as Global Economic Hub हा अहवाल दिनांक १२/०९/२०२४ रोजी प्रकाशित करण्यात आला आहे.<br>ब) मुंबई महानगर प्रदेश आर्थिक बृहत आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी गठीत करण्यात आलेल्या ग्रोथ हब नियामक मंडळ व ग्रोथ हब समन्वय समिती यांना सहाय्य करण्याकरिता मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाची अंमलबजावणी प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्या अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी युनिट स्थापन करण्यास दिनांक १२/०९/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्राप्त आहे.<br>क) यांस अनुसरुन, निती आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करुन मुंबई महानगर प्रदेशात थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्याकरिता सामंजस्य करार करण्याचे तसेच, या आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी केंद्रशासन, राज्य शासन व अंगिकृत महामंडळे इ. आणि आंतरराष्ट्रीय व इतर संस्था यांच्या सोबत समन्वय साधण्याचे प्रस्तावित आहे. |
| ४. | Work Order/LOA Number and Date, Awarded Cost of Work, Revised cost of Work, Name of Contractor/Consultant/PMC, Payment done till date, Balance payable Amount | : | लागू नाही. |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | : | सप्टेंबर, २०२४ |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | : | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | मुंबई महानगर क्षेत्राचा कालबध्द विकास करण्याकरिता Developing MMR as Global Economic Hub हा अहवाल दिनांक १२/०९/२०२४ रोजी प्रकाशित करण्यात आला आहे. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | : | मुंबई महानगर प्रदेशात थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्याकरिता सामंजस्य करार करुन या आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी केंद्रशासन, राज्य शासन व अंगिकृत महामंडळे इ. आणि आंतरराष्ट्रीय व इतर संस्था यांच्या सोबत समन्वय साधणे. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **०.००** | **०.००** | **१००.००** |

| | | |
|---|---|---|
| ९. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

*****

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग – ११ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नांव | : | मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसराचा **बृह्त आराखडा (Master Plan)** तयार करणे. |
| २. | चालू/नवीन योजना | : | चालू योजना. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | : | १. मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसराचा बृह्त आराखडा तयार करणे.<br>२. बृह्त आराखडा तयार करण्याकरता सल्लागाराची नेमणूक करणे. |
| ४. | Work order/LOA Number and Date, Awarded cost of work, Revised cost of work, Name of Contractor/Consultant/ PMC, Payment done till date, Balance payable amount. | | 1) LOI No. MMRDA/UOM-1.2/87/2019 Dt. 28/08/2019.<br>2) Awarded cost of work - Rs. 1,12,70,000/-.<br>3) Name of Consultant - M/s. DDF Consultants Pvt. Ltd.<br>4) Payment done till date - Rs. 4,96,000/-.<br>5) Balance payable amount - Rs. 1,07,74,000/-. |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | : | १. मुंबई विद्यापीठ व मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांच्यामधील सामंजस्य करार (MOU)दिनांक : १२.०५.२०१६.<br>२. मे. डी.डी.एफ. कन्सलटंट प्रा.लि. यांना दिनांक २८.०८.२०१९ रोजी देकार पत्र (Letter of Intent) देण्यात आले. |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख, EOT Date. | : | मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसराचा बृह्त आराखडा बनविण्याचे काम लवकरच पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | १. दिनांक २८.०८.२०१९ रोजी मे. डी.डी.एफ. कन्सलटंट प्रा.लि. यांना देकार पत्र (Letter of Intent) देण्यात येऊन त्यांची या कामाकरीता सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली.<br>२. सल्लागार व मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांच्यामध्ये दिनांक १६.१०.२०१९ रोजी करारनामा करण्यात आला.<br>३. सल्लागाराने दिनांक ०५.११.२०१९ रोजी प्राधिकरणास Inception Report सादर केला.<br>४. संकल्पचित्र आराखडा समितीची (Design Review Committee) पहिली बैठक दिनांक ११.१२.२०१९ रोजी झाली.<br>५. सल्लागाराने दिनांक ०९.०१.२०२० रोजी प्रकल्पाचे Design Brief सादर केले.<br>६. मुंबई विद्यापीठाने दिनांक १७.०८.२०२० रोजीच्या पत्रान्वये सल्लागाराने सादर केलेल्या Inception Report आणि Design Brief Report यांस मान्यता दिली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ७. सल्लागाराने करारानुसार कार्य-२अ सर्वेक्षण अहवाल, माहिती संकलन आणि नकाशे तसेच नकाशे तसेच, कार्य-२ब नुसार विद्यमान स्थिती अहवाल सादर केला असून दिनांक २६.०४.२०२१ रोजीच्या ई-मेलद्वारे कार्य-३ संकल्पनात्मक बह्त आराखडा अहवाल देखील सादर केला आहे. सल्लागाराने वर नमूद केलेल सदर अहवाल, प्राधिकरणाने मुंबई विद्यपीठ यांच्याकडे अवलोकनासाठी पाठविले आहेत.<br>८. सामंजस्य करारानुसार सुरु असलेल्या कामांच्या संदर्भात शासनस्तरावर वेळोवेळी आढावा बैठका घेण्यात आल्या. या विविध बैठकांदरम्यान प्राप्त झालेल्या सूचना व सुधारणा यावर सल्लागारामार्फत कार्यवाही करण्यात येऊन संकल्पनात्मक बृहत आराखडा तयार करुन प्राधिकरणास दोन पर्यायासह सादर केला. तद्नंतर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई विद्यापीठ यांचेमार्फत यापैकी एका पर्यायाची निवड करुन अंतिम बृहत आराखडा तयार करण्यात येईल.<br>९. मा. महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि. प्राधिकण आणि मा. कुलगुरु, मुंबई विद्यापीठ यांच्यामध्ये दिनांक ०२/०४/२०२४ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये झोपडपट्टी, कंपाऊंड वॉल, जमिनीचे प्रश्न, टी.डी.आर. समस्या, पुनर्वसन आणि कलिना कॅम्पसचा बृहत आराखडा अश्या वेगवेगळया मुद्दयांवर चर्चा करण्यात येऊन सादर केलेल्या बृहत आराखडयाच्या पर्यायावर मुंबई विद्यापीठ अभिप्राय पाठवितील असे मा. कुलगुरु यांच्यातर्फे आश्वासन देण्यात आले. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | : | मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसराचा बृह्त आराखडा बनविण्याचे काम पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१.०७** | **१.१०** | **१.१०** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | योजना राबविणारी संस्था | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

********

# नियोजन विभाग

**(इ)**

**अनुसूची**

| नियोजन विभाग |
| --- |

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | योजना | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- | --- |
| | **(सर्वेक्षणे, अभ्यास आणि प्रशिक्षणे)** | | |
| १ | प्रादेशिक योजनेची अंमलबजावणी व सुधारणा | १.०० | १८९ |
| २ | मुंबई महानगर प्रदेशातील ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा अभ्यास | ०.०० | १९२ |
| ४ | कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून वगळलेल्या २७ गावांच्या विकास योजना व ग्रोथ सेंटर | १.०० | १९३ |
| ६ | मुंबई महानगर प्रदेशाचे वाढीव अधिसूचित क्षेत्र (विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्र) | ११०.०० | १९८ |
| | **एकूण** | **११२.००** | |
| | **अनुदाने** | | |
| ४ | एकात्मिक ग्राम विकास योजना | ०.२५ | १९९ |
| ५ | प्रादेशिक दृष्ट्या महत्त्वाचे प्रकल्प : | ०.४५ | २०० |
| | **एकूण** | **०.७०** | |
| | **(प्रकल्प)** | | |
| ६ | प्रादेशिक विकास केंद्र (विशेष नियोजन प्राधिकरण) | १.०० | २०२ |
| ७ | मुंबई महानगर प्रदेशामध्ये अग्निशमन सेवा स्थापन करणे | ५.०० | २०३ |
| ८ | के. एस.सी. नव नगर प्रकल्प (कर्णाळा साई चिरनेर - NTDA) | १०००.०० | २०५ |
| | **एकूण** | **१००६.००** | |
| | | | |
| | **एकूण** | **१११८.७०** | |

## नियोजन विभाग - १ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | |
|---|---|---|
| **१.** | **योजनेचे नाव** | **प्रादेशिक योजनेची अंमलबजावणी व सुधारणा** |
| २. | चालू / नवीन योजना | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | शासनाच्या निर्देशाप्रमाणे प्रादेशिक योजनेची अंमलबजावणी व सुधारणा करणे -<br>प्रादेशिक योजनेतील शिफारसींच्या अंमलबजावणीकरिता प्रस्ताव उचित प्राधिकरणाकडे पाठविणे, प्रादेशिक योजनेतील प्रस्तावांच्या अंमलबजावणीबाबत कार्यप्रणाली तयार करणे, त्यांचे काम हाती घेणे आणि प्रादेशिक योजनेसंबंधित शासकीय कार्यालयांडून चौकशीकरिता प्राप्त विकास प्रस्तावांची छाननी करणे व प्राधिकरणाचे अभिप्राय संबंधित विभागाला कळविणे. |
| ४. | | |

| वर्क ऑर्डर/ स्विकृती पत्र क्र. व दिनांक | कामाची किंमत | कामाची सुधारित किंमत | कंत्राटदार/ सल्लागार/ प्र. व्य.स यांचे नाव | आजपर्यंत दिलेली रक्कम | शिल्लक देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - | - |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रारंभाची अंदाजित/प्रत्यक्ष तारीख | १९७५ |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | हे अव्याहत स्वरुपाचे काम आहे. |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंत अपेक्षित कामगिरी | १. **प्रादेशिक योजना १९९६-२०११**<br>महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेशाच्या सुधारित प्रादेशिक योजनेची (१९९६-२०११) दिनांक २३ सप्टेंबर, १९९९ रोजी अंतिम मंजूरी दिली आणि सदर योजना दिनांक १ डिसेंबर, १९९९ पासून अंमलात आली. सदर प्रादेशिक योजना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित (MSRDC) विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या अधिसुचनेद्वारे नव्याने समाविष्ट केलेल्या ३० गावांसाठी, दिनांक २३ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या स्वतंत्र अधिसुचनेद्वारे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अंतर्भूत झालेल्या १४ गावांसाठी तसेच खालापूर नगर पंचायतीतील ५ गावांसाठी, अशा विकास आराखडा अद्याप तयार नसलेल्या क्षेत्राकरिता तेथील प्रारुप विकास योजना प्रसिद्ध होईपर्यंत लागू राहील.<br>२. **प्रादेशिक योजना २०१६-२०३६**<br>**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४** मधील तरतुदींनुसार तसेच मुंबई महानगर नियोजन समितीने प्राधिकृत |

| | | |
|---|---|---|
| | | केल्यानुसार प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशाकरिता प्रारुप प्रादेशिक योजना, २०१६-३६ दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजी प्रसिद्ध केली. त्यानंतर विहित प्रक्रिया पार पाडून दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी सुधारित प्रारुप प्रादेशिक योजना मुंबई महानगर नियोजन समितीस सादर केली. प्रारुप प्रादेशिक योजनेबाबत संचालक, नगर रचना तसचे मुं.म.नि. सामिती यांनी वेळोवळी दिलेल्या सूचनांची पूर्तता केली. सदर समितीने योग्य ते बदल करुन दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी सुधारित प्रारुप प्रादेशिक योजना मंजूरीकरिता महाराष्ट्र शासनास सादर केली. सदर योजनेच्या भाग म्हणून प्रथमत: माथेरान पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रासाठीच्या क्षेत्रीय बृहत आराखड्याला (Zonal Master Plan) केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, यांच्या मान्यतेनंतर महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५(१) अन्वये दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९ रोजी अंतिम मंजूरी दिली. त्यापुढे इतर उर्वरित प्रदेशाकरिता प्रादेशिक योजना दिनांक २० एप्रिल, २०२१ रोजी शासनाने मंजूर केली आहे. ती दिनांक १९ जून २०२१ पासून अंमलात आली आहे.<br>३. तद्नंतर, अंतिम प्रदेशिक योजनेतील अहवाल आणि नकाशांच्या प्रती शासनाकडून प्रमाणित करुन घेऊन जनतेकरिता आणि संबंधित संस्थांना उपलब्ध करुन दिल्या. तसेच, त्या प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिल्या.<br>४. प्रादेशिक योजनेतील शिफारसी अंमलबजावणी करिता उचित प्राधिकरणाकडे पाठविल्या.<br>५. प्रादेशिक योजनेतील प्रस्तावांच्या अंमलबजावणी बाबत कार्यप्रणाली तयार करुन काम हाती घेतले.<br>६. शासनाने अंतिम प्रादेशिक योजनेला मंजूरी देताना विकास केंद्रे, स्थानिक विकास केंद्रे, उपनगरीय रेल्वेस्थानक परिसर, नागरीकरण क्षेत्रात समाविष्ट भागांसाठी तसेच पर्यटनदृष्ट्या महत्वाच्या भागांकतिरता विस्तृत नियोजन प्रस्ताव/क्षेत्र आराखडा बनविण्यासाठी दिलेल्या निर्देशांची पूर्तता करण्याचे काम हाती घेतले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) २०२५-२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | १) | विकास केंद्रे, स्थानिक विकास केंद्रे, उपनगरीय रेल्वेस्थानक परिसर, नागरीकरण क्षेत्रात समाविष्ट भागांसाठी तसेच पर्यटनदृष्ट्या महत्वाच्या भागांकरिता विस्तृत नियोजन प्रस्ताव तयार करणे व विहित प्रक्रिया पार पाडून, संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे मान्यतेकरिता सादर करणे इ. |
| | | २) | सदर नियोजन प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर संबंधित विकास केंद्रांचा नगर रचना परियोजना (TPS) अथवा इतर माध्यमातून विकास करणे. |
| | | ३) | प्रादेशिक योजनेसंबंधित शासकीय कार्यालयांनी अभिप्राय मागितल्यास विकास प्रस्तावांची छाननी करणे आणि प्राधिकरणाचे अभिप्राय संबंधित कार्यालयांस कळविणे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| १.०० | ०.५० | १.०० |

| ८. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
|---|---|---|

## नियोजन विभाग - २ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | |
|---|---|---|
| १. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंत अपेक्षित कामगिरी | **मुंबई महानगर प्रदेशातील ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा अभ्यास :**<br>मुंबई महानगर प्रदेशातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी नवीन योजना तयार करण्याच्या दृष्टीकोनातून एकूण ११४६ गावांच्या भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधांच्या स्थितीच्या अभ्यासासाठी ऑक्टोबर, २०२१ मध्ये सल्लागाराची नेमणूक केली आहे. या कामासाठी ऑक्टोबर, २०२४ पर्यंत ₹ १.१९ +GST कोटी इतकी रक्कम सल्लागारास वितरित करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर काम प्रगतीपथावर असून मार्च, २०२५ पर्यंत आणखी ₹ ०.७३ + GST कोटी वितरित करणे अपेक्षित आहे. |
| २ | ब) २०२५-२६ या वर्षासाठी कामगिरीचे उद्दिष्टे | मुंबई महानगर प्रदेशातील ग्रामीण भागाकरिता नव्याने तयार करण्यात येणाऱ्या ग्राम विकास योजनेच्या अभ्यासासाठी नेमणूक केलेल्या सल्लागारास उर्वरित ₹ ०.७३+GST कोटी रक्कम मार्च, २०२५ पर्यंत वितरित न झाल्यास वर्ष २०२५-२६ मध्ये सदर रक्कम वितरित होणे अपेक्षित आहे. |

| ३. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| १.७२ | १.२५ | ०.०० |

| | | |
|---|---|---|
| ४. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## नियोजन विभाग - ३ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून वगळलेल्या २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रासाठीची विकास योजना तसेच कल्याण तालुक्यातील १० गावांमध्ये सुमारे १०८९ हे. क्षेत्रावरील प्रस्तावित ग्रोथ सेंटर. |
| २. | चालू/नवीन योजना | : | चालू योजना. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाचे उद्दीष्टे | : | कल्याण तालुक्यातील ग्रोथ सेंटर विकसित करण्याची कार्यवाही ही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गतनगर रचना परियोजनेच्या माध्यमातून करणे. |
| ४. | (१) योजना सुरु झाल्याचा प्रत्यक्ष दिनांक | : | चालू योजना. |
| | (२) योजना पुर्ण करावयाचा अंदाजित दिनांक | : | चालू योजना. |
| ५. | आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | १. शासनाने दिनांक ०९ ऑगस्ट, २००६ च्याअधिसूचनेनुसार (शासन राजपत्रात दिनांक ०७ डिसेंबर, २००६ रोजी प्रसिद्ध झालेली) ठाणे जिल्ह्यातील कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१) (ग) नुसार प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली होती. शासनाने दिनांक ११ मार्च, २०१५, दिनांक ९ मे, २०१७ व दिनांक ३ जुन, २०१७ रोजीच्या अधिसुचनांन्वये व दिनांक १३ जुन, २०१७ रोजीच्या शुद्धिपत्रकानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अन्वये या अधिसूचित क्षेत्राच्या प्रारुप विकास योजनेस मंजूरी प्रदान केली आहे.<br>२. शासनाने दिनांक १४ मे, २०१५ च्या अधिसूचना क्र. कडोंम-१०१५/प्र.क्र.१५/नवि-२८ अन्वये सदर अधिसूचित क्षेत्र हे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दी मध्ये समाविष्ट केले. त्यानंतर शासनाने दिनांक ३० एप्रिल, २०१६ रोजीच्या अधिसूचने अन्वये कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रामधील मौजे भोपर (भागशः), संदप, उसरघर (भागशः), घारिवली (भागशः), माणगांव (भागशः), हेदुटणे (भागशः), कोळे, काटई (भागशः), निळजे (भागशः) वघेसर (भागशः) या १० गावांमधील सुमारे १०८९ हे. क्षेत्राच्या प्रस्तावित ग्रोथ सेंटरच्या क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कायम ठेवली आहे. प्राधिकरणाने या ग्रोथ सेंटर क्षेत्रामध्ये पायाभूत सोई सुविधा विकसीत करण्याकरिता अंदाजे रू. १०८९ कोटींच्या तरतूदीला प्राधिकरणाच्या दि. २६ ऑगस्ट २०१५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. १३४० अन्वये तत्वत: मान्यता दिली आहे.<br>३. प्राधिकरणाने दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी झालेल्या १४२ व्या बैठकीत पारित केलेल्या ठराव क्र. १४०६ द्वारे संपूर्ण ग्रोथ सेंटर पैकी (मंजूर किंवा बांधिल विशेष नगर वसाहत प्रकल्प योजना वजा करता) एक वा अनेक नगर रचना परियोजनेच्या (Town Planning Scheme) (टि.पी.एस.) माध्यमातून विकसित करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने, प्राधिकरणाने दिनांक २१ जून, २०१७ रोजी कल्याण ग्रोथ सेंटरमध्ये स्थित सुमारे ३१४ हे. आर. (फेझ-१) क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६०(१) अन्वये नगर रचना परियोजना क्र. १ साठी उद्देश घोषित केला होता. त्यानंतर प्राधिकरणाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० व ६२ अन्वये ग्रोथ सेंटरचे उर्वरित क्षेत्र (खोणी-अंतर्ली-हेदुटणे-कोळे एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाचे क्षेत्र आणि या नगर वसाहत प्रकल्पामुळे बंदिस्त झालेल्या जागा वगळून) या आधीच्या नगर रचना परियोजना क्र.१ मध्ये समाविष्ट करण्यासाठीचा उद्देश घोषित केला होता.<br>४. प्रस्तावित ग्रोथ सेंटर नगर रचना परियोजनेच्या (टी.पी.एस.) माध्यमातून विकसित करणेसाठी प्राधिकरणाने प्रचलित ई-निविदा प्रक्रिया राबवून दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी मे. एच.सी.पी. डिझाईन प्लॅनिंग ॲण्ड मॅनेजमेंट प्रा.लि., अहमदाबाद या सल्लागाराची नेमणूक केली आहे. सल्लागाराची नियुक्ती ही संपूर्ण ग्रोथ सेंटर क्षेत्रामधील जमिनींचे मालकी हक्काचे तपशिलवार सर्वेक्षण करुन सोबत प्रारुप नगर रचना परियोजना व Urban Design Guidelines प्राधिकरणास सादर करण्याकरिता केली होती. त्यानंतर प्राधिकरणाद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वयेची पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येण्याचे ठरले होते. सल्लागारामार्फत नोव्हेंबर, २०१७ मध्ये ग्रोथ सेंटर क्षेत्रामधील जमिनींच्या तपशिलवार सर्वेक्षणाचे काम सुरु करण्यात आले होते. परंतू स्थानिक गावक-यांच्या विरोधामुळे सदर काम तुर्तास स्थगित करण्यात आले. त्यामुळे सल्लागार मे एच.सी.पी. डिझाईन प्लॅनिंग ॲण्ड मॅनेजमेंट प्रा.लि. यांचे मार्फत जमिनींच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सर्वेक्षणाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण होऊ शकले नाही. सदर विकास केंद्राच्या प्रारुप नगर रचना परियोजना बनविण्याकरिता घोषित केलेल्या दोन्ही उद्देशांचा वैधानिक कालावधी संपुष्टात आला असल्याने प्राधिकरणाने दि. १५ जानेवारी, २०१९ रोजी नगर रचना परियोजने करीता म.प्रा.नि.व न.र. अधिनियम, १९६६ अन्वये नव्याने उद्देश घोषित केला आहे. सदर उद्देश घोषित करण्यासाठीची नोटीस दि. १८ जानेवारी, २०१९ रोजीच्या मराठी व इंग्रजी स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती.<br>५. प्रारुप नगर रचना परियोजना तयार करण्यासाठी, ग्रोथ सेंटर मधील जमिनींचे सर्वेक्षणाचे काम नियोजित वेळेत पूर्ण होणे, जे प्रारुप नगर रचना परियोजना तयार करण्यासाठी आवश्यक आहे, त्यासाठी प्राधिकरणाने प्रचलित ई-निविदा प्रक्रिया राबवून मे. पी. एन. शिधोरे, सिव्हिल इंजिनिअर्स इंडिया प्रा.लि. या संस्थेची ग्रोथ सेंटर क्षेत्राकरिता तपशिलवार ड्रोन सर्व्हे (Drone survey) करण्यासाठी दिनांक ०६ मार्च, २०१९ रोजी निवड करण्यात आली होती. सदर संस्थेमार्फत तपशिलवार ड्रोन सर्व्हेचे काम दिनांक १५ मार्च, २०१९ ते २२ मार्च, २०१९ या कालावधीत पूर्ण करण्यात आले होते. बेस मॅप (Base Map) तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले होते.<br>६. तसेच म. प्रा. वन.र. अधिनियम, १९६६ व सोबत The Maharashtra Town Planning Scheme Rules, १९७४ मधील Rule No. ४ नुसार प्रारुप नगर रचना परियोजना तयार करताना, प्राधिकरणास सदर परियोजनेच्या क्षेत्रातील स्थानिक जमिन मालकांची बैठक घेणे बंधनकारक आहे. सदर बैठकीत जमीन मालकांना प्राधिकरणाकडून तयार करण्यात येणाऱ्या नगर रचना परियोजनेच्या प्रस्तावाबाबत (Tentative Proposals of the draft scheme) माहिती मिळणे अपेक्षित आहे.<br>७. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या सोबत दि.२० एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत, स्थानिकांनी नगर रचना परियोजने मध्ये मिळणारे अंतिम विकसित भुखंड (Final Developed Plots), त्यावर चटईक्षेत्र निर्देशांक (FSI) व अस्तित्वातील अनधिकृत बांधकामे (Existing Un-Authorized Constructions) याबाबत मुद्दे उपस्थित केले होते. त्या अनुषंगाने, प्राधिकरणामार्फत तयार करण्यात येणाऱ्या नगररचना परियोजनेच्या प्रारुप आराखड्यावरमा. महानगर आयुक्त यांचे दालनात दि. २० जुन, २०१९ रोजी चर्चा झाली. यामध्ये असे निर्देशनास आले की, नियमानुसार बंधनकारक असलेली जमिनमालकांची बैठक घेण्यापुर्वी, परियोजना क्षेत्रासाठी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | लागु करण्यात येणाऱ्या चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) व अनधिकृत बांधकामांसाठीचे धोरण (Policy for Un-Authorized Constructions) याबाबत, अधिक स्पष्टता होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. त्यानुसार प्राधिकरणाने दिनांक २६ जुलै, २०१९ रोजीच्या पत्राद्वारे या विषयांबाबत शासन स्तरावर मार्गदर्शन होण्यास विनंती केली होती. सदर पत्रातील मुद्दयांवर शासनाकडून अभिप्राय आल्यानंतर उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार पुढील योग्यती वैधानिक कार्यवाही करण्यात येणार होती.<br>८. दरम्यान, सदर क्षेत्रासाठी दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजी नगर रचना परियोजनेचा उद्देश घोषित केल्यापासून परियोजनेचा मसुदा तयार करून प्रसिध्द करण्यासाठीचा ९ महिन्यांचा वैधानिक कालावधी म.प्रा. व न.र. अधिनियम, १९६६ च्या कलम ६१ (२) अन्वये दि. १४ सप्टेंबर, २०१९ रोजी समाप्त होत असल्याने व मूळ भुखंडा्चा एकत्रित नकाशा बनवून परियोजनेचा मसुदा (Draft Scheme) तयार करण्याकरीता, तसेच The Maharashtra Town Planning Scheme Rules, १९७४ मधील Rule No. ४ नुसार सदर परियोजनेच्या क्षेत्रातील स्थानिक जमिनमालकांची बैठक घेण्याकरीता अवधी लागणार असल्याने प्राधिकरणाने दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनास सदर परियोजने करीता उक्त अधिनियमाच्या कलम ६१ (३) नुसार दिनांक १५ सप्टेंबर, २०१९ पासून तीन महिन्यांची म्हणजेच दिनांक १४ डिसेंबर, २०१९ पर्यंत वाढीव मुदत देण्याची विनंती करण्यात आली होती.<br>९. तसेच, सदर क्षेत्रासाठी दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजी नगर रचना परियोजनेचा उद्देश घोषित केल्यापासून परियोजनेचा मसुदा तयार करून प्रसिध्द करण्यासाठीचा वैधानिक कालावधी देखील समाप्त झाला होता.<br>१०. दरम्यान, शासनाने दि. २४ जून, २०२० रोजीच्या उद्घोषणे मधील प्रारुप अधिसूचनेनुसार, २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रामधील १८ गावांकरिता स्वतंत्र "कल्याण उपनगर नगरपरिषद" या नावाने नगरपरिषद घटीत करण्यात येईल असे नमुद केले आहे, ज्यामध्ये कल्याण ग्रोथ सेंटर क्षेत्रामधील ५ गावांचा देखील समावेश आहे. तसेच शासनाने दि. १९ ऑगस्ट, २०२० रोजीच्या पत्राद्वारे प्राधिकरणाच्या कल्याण ग्रोथ सेंटर क्षेत्रामध्ये, सदर "कल्याण उपनगर नगरपरिषद" स्थापन हेऊन कार्यान्वीत होईपर्यंत, या क्षेत्रात सुरू होणा-या विकास कामांना, विकास परवानग्या व तदनुषंगिक इतर बाबींसाठी अडचण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून, प्राधिकरणाने ग्रोथ सेंटरच्या क्षेत्रामध्ये उक्त उद्घोषणेपूर्वी ते नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत असलेल्या क्षेत्रासाठी, विकास परवानगीच्या अनुषंगाने असलेली त्यांची कर्तव्ये शासनाचे पुढील आदेश पारीत होईपर्यंत सुरु ठेवण्यात यावीत असे कळविले आहे.<br>११. तसेच विशेष नियोजन प्राधिकरणाच्या ग्रोथ सेंटरच्या हद्दीत येणाऱ्या प्रस्तावांसाठी विकास परवानगी देण्याव्यतिरिक्त शासनाच्या निर्देशानुसार ग्रोथ सेंटरच्या लगत असलेल्या मेगासिटी प्रकल्पामध्ये देखील विकास परवानगीच्या प्रस्तावांना मंजूरी दिली जात आहे.<br>यामध्ये नोव्हेंबर, २०२२ तेऑक्टोबर, २०२३ अखेर पर्यंत विकास<br>परवानगी साठीची छाननी फी **₹**२३,२२,८३४/- व विकास शुल्क<br>**₹**५,३९,०९,९९१/- इतके प्राधिकरणाकडे जमा झालेले आहे. |
| ६. | २०२५-२६ साठी प्रत्यक्ष कामगिरी / उद्दीष्टे | : | १. शासनाच्या पुढील निर्देशानुसारची आवश्यक ती कार्यवाही करणे. |
| | | | २. अधिसूचित क्षेत्रातील विकास परवानगी प्रकरणांवर कार्यवाही करणे. |
| | | | ३. कल्याण तालुक्यातील ग्रोथ सेंटर विकसित करण्याची कार्यवाही ही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गतनगर रचना परियोजनेच्या माध्यमातून करणे. |
| | | | |

| **७.** | **अंदाजित खर्च -२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५**<br>**मूळ अंदाज** | **२०२४-२०२५**<br>**(सुधारीत)** | २०२५-२६<br>**अपेक्षित अंदाज** |
| **१.००** | **०.५०** | **१.००** |

| | | |
|---|---|---|
| ८. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## नियोजन विभाग - ४ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | |
|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | **मुंबई महानगर प्रदेशाचे वाढीव अधिसूचित क्षेत्र (विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्र)** |
| २. | चालू / नवीन योजना | नवीन योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | मुंबई महानगर प्रदेशाच्या वाढीव क्षेत्राकरिता सविस्तर विकास योजना तयार करणे. |
| ४. | | |

| वर्क ऑर्डर/ स्विकृती पत्र क्र. व दिनांक | कामाची किंमत | कामाची सुधारित किंमत | कंत्राटदार/ सल्लागार/ प्र. व्य.स यांचे नाव | आजपर्यंत दिलेली रक्कम | शिल्लक देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| PD/693/SPA/318/2024 Dt: 15/10/2024 | ₹१०७.४० कोटी | ₹१०७.४० कोटी | मे. टेककॉम अर्बन मॅनेजमेंट कन्सल्टंट ॲण्ड सर्विस प्रोव्हाइडर्स | ०.०० | ₹१०७.४० कोटी |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | २०२४-२५ मध्ये |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | २०२७-२८ |
| ७. | (अ) आतापर्यंत प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंत अपेक्षित कामगिरी | नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. ०९ जुलै, २०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये जि. पालघर येथील २२३ गावे व जि. रायगड येथील २२३ गावे समाविष्ट असलेल्या 'मुंबई महानगर प्रदेशाचे वाढीव अधिसूचित क्षेत्र' करिता प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे.<br>सदर क्षेत्राकरिता विकास योजना (Development Plan) तयार करणेसाठी सल्लागाराची नियुक्ती करुन कार्यवाही सुरु केली आहे. सद्यस्थितीत सदर काम प्रगतीपथावर असून मार्च, २०२५ पर्यंत ₹ ३०.०० कोटी वितरित करणे अपेक्षित आ |
| | (ब) २०२५-२६ या वर्षासाठी कामगिरीचे उद्दिष्ट | विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्राकरिता विकास योजना तयार करणे संबंधित विहित प्रक्रिया पार पाडणे. विकास योजनेच्या अभ्यासासाठी नेमणूक केलेल्या सल्लागारास ₹ ३०.०० कोटी रक्कम मार्च, २०२५ पर्यंत वितरित न झाल्यास त्यासह सल्लागाराचे उर्वरित शुल्क वर्ष २०२५-२६ मध्ये वितरित होणे अपेक्षित आहे. यासाठी वर्ष २०२५-२६ मध्ये ₹ ११०.०० कोटीची तरतूद करण्यात येत आहे. |
| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| **०.००** | **३०.००** | **११०.००** |

| | | |
|---|---|---|
| ८. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

# नियोजन विभाग - ५ (अनुदाने)

| | | |
|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | **एकात्मिक ग्राम विकास योजना** |
| २. | चालू योजना/नवीन योजना | चालू योजना |
| ३. | योजनेची संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | प्राधिकरण १९९९ पासून महानगर प्रदेशातील गावांच्या राहणीमान व पर्यावरण यात सुधारणा करण्याच्या उद्देशाने ग्राम विकास योजना व आदिवासी विकास योजना अंतर्गत अनुदानाच्या स्वरुपात ठाणे आणि रायगड जिल्हा परिषदांस अनुदान देत आले आहे. प्राधिकरणातर्फे उपलब्ध केलेल्या निधीचा परिणाम प्रकर्षाने जाणवेल असा "समूह विकास" पध्दतींचा अवलंब एकात्मिक ग्राम विकास योजनेच्या व्दारे करणे. |

४.

| वर्क ऑर्डर/ स्विकृती पत्र क्र. व दिनांक | कामाची किंमत | कामाची सुधारित किंमत | कंत्राटदार/ सल्लागार/ प्र. व्य.स यांचे नाव | आजपर्यंत दिलेली रक्कम | शिल्लक देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - | - |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रारंभाची अंदाजित/प्रत्यक्ष तारीख | १ एप्रिल, २००४. |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | -- |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | या योजनेमध्ये एकूण पात्र १०९ गावांकरीता प्रत्येकी ₹ २५.०० लाख अनुदान देण्याची तरतूद होती. सदर योजना मार्च, २०१७ मध्ये संपुष्टात आली असून, सदर योजनेंतर्गत मार्च, २०१७ नंतर कुठल्याही नवीन कामांना मंजूरी देण्यात आली नाही. मार्च, २०१७ अखेर १०६ गावांतील एकूण ₹२६.१९ कोटींच्या २२१ कामांना मान्यता प्रदान करण्यात आली होती. आतापर्यंत मंजूर झालेल्या कामांकरीता ₹२२.७२ कोटी इतका निधी अनुदान स्वरुपात वितरित केला आहे. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | एकात्मिक ग्रामविकास योजनेअंतर्गत मान्य करण्यात आलेल्या निधीमध्ये उर्वरित निधीतून ₹०.२५ कोटी २०२५-२६ मध्ये वितरित होणे अपेक्षित आहे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| ०.२५ | ०.०० | ०.२५ |

| | | |
|---|---|---|
| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | ठाणे, रायगड आणि पालघर जिल्हा परिषद |

# नियोजन विभाग - ६ (अनुदाने)

| | | |
|---|---|---|
| **१.** | **योजनेचे नाव** | **प्रादेशिक दृष्ट्या महत्त्वाचे प्रकल्प : अनुदाने** |
| २. | चालू / नवीन योजना | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | शासनाकडून अथवा प्राधिकरणामार्फत वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनेनुसार महानगर प्रदेशामधील विशेष प्रकल्प हाती घेणे अथवा अशा प्रकल्पांकरीता निधी उपलब्ध करुन देणे. |
| ४. | वर्क ऑर्डर/ स्विकृती पत्र क्र. व दिनांक: - ; कामाची किंमत: - ; कामाची सुधारित किंमत: - ; कंत्राटदार/ सल्लागार/ प्र. व्य.स यांचे नाव: - ; आजपर्यंत दिलेली रक्कम: - ; शिल्लक देय रक्कम: - | |
| ५. | प्रारंभाची अंदाजित/प्रत्यक्ष तारीख | घारापूरी- २०१६, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी-२०१८ |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | अव्याहत स्वरुपाची कामे आहेत. |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | **१. घारापुरी बेटावर विद्युत पुरवठा करणे:**<br>प्रादेशिक वास्तुवारसा क्षेत्र असलेल्या घारापुरी (एलिफंटा) बेटावर विद्युत पुरवठा करणेसाठी अनुदान स्वरुपात ₹२१.३२ कोटी निधी मंजूर झाला आहे. त्याकरिता महावितरणास ऑक्टोबर, २०२४ पर्यंत ₹१४.८४ कोटी इतका निधी वितरित केला आहे, आणि मार्च, २०२५ पर्यंत उर्वरित ₹ ६.४७ कोटी वितरित करणे अपेक्षित आहे. तथापि, सदर प्रकल्प पूर्ण झाला असून महावितरण कडून अनुदानासंदर्भात मागणी प्राप्त होत नसल्याने सदर अनुदान वितरित ₹१४.८४ कोटी पर्यंत सीमित करण्याची कार्यवाही चालू आहे.<br>**२. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी :**<br>पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी व लुप्त होत असलेल्या प्रजातींचे संवर्धन करण्यासाठी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीकडे उपलब्ध असलेल्या नमुन्यांचे अंकेक्षण (digitization) करण्याच्या प्रकल्पाकरिता अनुदान स्वरुपात ₹५.०० कोटी निधी मंजूर झाला आहे. सदर निधी १० वर्षांच्या कालावधीत प्रतिवर्षी भागश: वितरित होणे अपेक्षित आहे. त्यापैकी ऑक्टोबर, २०२४ पर्यंत ₹ १.३३ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे आणि मार्च, २०२५ पर्यंत आणखी ₹ ०.४५ कोटी वितरित करणे अपेक्षित आहे. |
| | ब) २०२५-२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | **बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी**<br>पर्यावरणासंबंधित नमुन्यांचे अंकेक्षण (digitization) प्रकल्पाकरीता वर्ष २०२५-२६ मध्ये ₹०.४५ कोटी |

| वर्क ऑर्डर/ स्विकृती पत्र क्र. व दिनांक | कामाची किंमत | कामाची सुधारित किंमत | कंत्राटदार/ सल्लागार/ प्र. व्य.स यांचे नाव | आजपर्यंत दिलेली रक्कम | शिल्लक देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - | - |

| | | |
|---|---|---|
| | | वितरित करणे अपेक्षित आहे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **७.००** | **०.४५** | **०.४५** |

| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | B.N.H.S. द्वारे राबविण्यात येणारे प्रकल्पांसाठी एमएमआरडीए मार्फत अनुदान उलपब्ध करुन देण्यात येते. |
|---|---|---|

# नियोजन विभाग - ७ (प्रकल्प)

| | | |
|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | **मुंबई महानगर प्रदेशातील प्रादेशिक विकास केंद्र. (विशेष नियोजन प्राधिकरण )** |
| २. | चालू / नवीन योजना | नवीन योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | मुंबई महानगर प्रदेशाच्या संतुलित विकासासाठी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तसेच इतर संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रादेशिक पातळीवरील महत्त्वाच्या प्रकल्पांमुळे जलदगतीने विकास होणे अपेक्षित असलेल्या भागांकरिता सविस्तर नियोजन प्रस्ताव बनविणे. तसेच प्रादेशिक योजनेस मान्यता देणाऱ्या दिनांक २० एप्रिल, २०२१ रोजीच्या अधिसुचनेप्रमाणे प्रस्तावित विकास केंद्रांच्या नियोजनाविषयीची प्राथमिक कामे सुरु करणे. |

४.

| वर्क ऑर्डर/ स्विकृती पत्र क्र. व दिनांक | कामाची किंमत | कामाची सुधारित किंमत | कंत्राटदार/ सल्लागार/ प्र. व्य.स यांचे नाव | आजपर्यंत दिलेली रक्कम | शिल्लक देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - | - |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | २०२४-२५ मध्ये |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | हे अव्याहत स्वरुपाचे काम आहे. |
| ७. | (अ) आतापर्यंत प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंत अपेक्षित कामगिरी | मुंबई महानगर प्रदेशात रोजगाराच्या संधी समान रीतीने उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने महानगर प्रदेशात विविध ठिकाणी विकास केंद्रे उभारण्याची गरज आहे. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील खारबाव परिसरात तसेच ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील व रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील काही गावे मिळून नेरळ परिसरात, पालघर जिल्ह्यातील बोईसर परिसरात, रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील पोयनाड परिसरात व कर्जत तालुक्यातील कर्जत परिसर, इ. ठिकाणी विकास केंद्रे विकसित करण्यासाठी या प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. वरिल संदर्भात शासनाच्या मान्यतेने अधिसुचना प्रसिद्ध झाल्यास सदर क्षेत्रांकरिता विकास योजना (Development Plan) तयार करणेबाबत कार्यवाही सुरु करणे अपेक्षित आहे. |
| | (ब) २०२५-२६ या वर्षासाठी कामगिरीचे उद्दिष्ट | प्रस्तावित विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्राकरिता विकास आराखडा तयार करणे संबंधित विहित प्रक्रिया पार पाडणे. |
| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| १.०० | ०.५० | १.०० |

| | | |
|---|---|---|
| ८. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## नियोजन विभाग - ८ (प्रकल्प)

<table>
<tr><td>१.</td><td>योजनेचे नाव</td><td>मुंबई महानगर प्रदेशामध्ये अग्निशमन सेवा स्थापन करण्याबाबत</td></tr>
<tr><td>२.</td><td>चालू योजना/नवीन योजना</td><td>नवीन योजना</td></tr>
<tr><td>३.</td><td>योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे</td><td>महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ प्रमाणे विशेष नियोजन प्राधिकरणांनी त्यांच्या परिक्षेत्रात अग्निशमन सेवा देणे.<br>मुंबई महानगर प्रदेशामधील मुंबई महानगरपालिका क्षेत्राबाहेरील भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्र, कल्याण विकास केंद्र, अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्र (अं.कु.ब.प.अ.क्षे.) यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास शासनाने विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे. त्याअनुषंगाने प्राधिकरणाच्या विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रांमध्ये प्राधिकरणाने अग्निशमन सेवा देणे.</td></tr>
<tr><td>४.</td><td colspan="2"><table>
<tr><th>वर्क ऑर्डर/ स्विकृती पत्र क्र. व दिनांक</th><th>कामाची किंमत</th><th>कामाची सुधारित किंमत</th><th>कंत्राटदार/ सल्लागार/ प्र. व्य.स यांचे नाव</th><th>आजपर्यंत दिलेली रक्कम</th><th>शिल्लक देय रक्कम</th></tr>
<tr><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>५.</td><td>प्रारंभाची अंदाजित/प्रत्यक्ष तारीख</td><td>सदर प्रकल्पाची अंमलबजावणी वर्ष २०२५-२६ मध्ये सुरू होणे अपेक्षित आहे.</td></tr>
<tr><td>६.</td><td>काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख</td><td>--</td></tr>
<tr><td>७.</td><td>अ. आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी</td><td>प्राधिकरणाच्या दिनांक. ०७ जुलै, २०२० रोजी झालेल्या १४९ व्या बैठकीत मुंबई महानगर प्रदेशामध्ये प्राधिकरणामार्फत स्वतंत्र अग्निशमन सेवा स्थापन करण्याच्या प्रस्तावास व त्याकरिता आवश्यक मनुष्यबळाची नेमणूक करण्यासाठी प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्या नेमणूकीची प्रक्रिया प्रशासन विभागामार्फत सुरू आहे. भिवंडी परिसर अधिसुचित क्षेत्रामध्ये अग्निशमन सेवा प्रस्थापित करण्यासाठी सदर मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्या नेमणुकीनंतर टप्पा क्र. १ च्या अंमलबजावणीअंतर्गत प्रस्तावित ४ पंपींग युनीटच्या एका अग्निशमन केंद्राच्या बांधकामाची सुरूवात होणे अपेक्षित आहे. त्याकरिता आवश्यक भांडवली खर्च ₹ १०.५२ कोटी व मनुष्यबळावर येणारा आवर्ती खर्च</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | ₹ ३.५० कोटी प्रतिवर्षी करणे अपेक्षित आहे.<br>तथापि, सदर कामांना काही कालावधी लागू शकतो प्राधिकरणाने मान्यता दिल्यानुसार महानगर प्रदेशामध्ये अग्निशमन सेवा कार्यान्वित करण्यासाठी प्राधिकरणात मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याची नेमणूक करणे, अग्निशमन केंद्राची उभारणी करणे, अग्निशमन वाहने व साधन सामुग्री खरेदी करणे, आवश्यक मनुष्यबळाची नेमणूक करणे, अग्निशमन सेवा पुरविण्यासाठी विविध स्त्रोतातून निधी उभारणे इ. कामांमध्ये सुसूत्रता आणणे तसेच अंमलबजावणी प्राधान्यक्रम ठरविणे ही कामे तातडीने हाती घेणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने, वरील नमूद कामांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करणेकरिता सक्षम अधिकाऱ्याच्या सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देणेसाठी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांना विनंती करण्यात आली आहे. |
| | ब. २०२५-२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | भिवंडी परिसर अधिसुचित क्षेत्राकरिता टप्पा क्र. १ नुसार प्रस्तावित ४ पंपींग युनीटच्या एका अग्निशमन केंद्राच्या बांधकामासाठी व अग्निशमन केंद्राकरिता आवश्यक असलेली अग्निशामक वाहने खरेदी करण्यासाठी वर्ष २०२५-२६ मध्ये अंदाजे ₹ ५.०० कोटी इतकी रक्कम वितरीत होणे अपेक्षित आहे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५<br>मूळ अंदाज** | **२०२४-२०२५<br>(सुधारीत)** | **२०२५-२०२६<br>अपेक्षित अंदाज** |
| ५.०० | ०.५० | ५.०० |

| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था: | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
|---|---|---|

## नियोजन विभाग - ९ (प्रकल्प)

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | **के.एस.सी. नव नगर (कर्णाळा साई चिरनेर- NTDA)** |
| २ | चालू/नवीन योजना | नवीन योजना |
| ३ | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | प्राधिकरणाने मुंबई बेटाला मुख्य भुमिशी जोडण्याकरिता मुंबई पारबंदर प्रकल्प राबविला आहे. त्यामुळे मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्राचा नवनगर म्हणून सुनियोजित विकास करणे व प्राधिकरणास उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणे.<br>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई पारबंदर प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होणेकरिता मुंबई पारबंदर प्रकल्प प्रभावक्षेत्रातील जमिनीची प्रत्याशित मुल्यवृद्धीचा वापर करून विकास साधणे |

४

| वर्क ऑर्डर/ स्विकृती पत्र क्र. व दिनांक | कामाची किंमत | कामाची सुधारित किंमत | कंत्राटदार/ सल्लागार/ प्र.व्य.स. यांचे नाव | आजपर्यंत दिलेली रक्कम | शिल्लक देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - | - |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रारंभाची अंदाजित/प्रत्यक्ष तारीख | १ एप्रिल, २०२४ |
| ६ | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | अव्याहत स्वरुपाचे काम आहे |
| ७ | (अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंत अपेक्षित कामगिरी | मुंबई पारबंदर प्रकल्प प्रभाव क्षेत्रातील जमिनींच्या प्रत्याशित मूल्यवृध्दिचा वापर करुन तेथे विकास साधण्यासाठी शासनाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्राधिकरणाची सदर क्षेत्रासाठी नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. सदर प्रकल्पात रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण व पेण तालुक्यातील १२४ गावे समाविष्ट असून त्याचे क्षेत्रफळ सुमारे ३२३.४४ चौ.कि.मी. आहे. सदर प्रस्तावित नवनगराचे ड्रोन सर्वेक्षण व नियोजन संबंधित कामे करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करून त्यांचेमार्फत सदर कामांची सुरूवात करणे अपेक्षित आहे. |
| | (ब) २०२५-२६ या वर्षासाठी कामगिरीचे उद्दिष्टे | सदर क्षेत्रातील शासकीय जमिनी हस्तांतरित करून घेणे तसेच खाजगी जमिनींचे भूसंपादन प्रक्रिया राबविणे.<br>या कामाकरिता आवश्यक कार्यालयाची स्थापना करणे व प्रकल्पाकरिता समर्पित आस्थापनेची नियुक्ती करणे. |
| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| **१६०.००** | **१००.००** | **१०००.००** |

| | | |
|---|---|---|
| ९. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## नियोजन विभाग

| | | |
|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | **मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी** |
| २. | चालू योजना/नवीन योजना | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | मुंबई नागरी विकास प्रकल्प (मुं.ना.वि.प्र.) करारानुसार मुं.ना.वि.प्र.- फिरता निधी स्थापन करण्यात आलेला असून त्या संबंधित कामे मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी, विनियम- १९८८ ने शासित केलेली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था व निम सरकारी संस्थांच्या नागरी पायाभूत सुविधा, निवारा, वाहतुकीची साधने, इत्यादी प्रकल्पांसाठी कर्ज सहाय्य तसेच प्रकल्पांची मांडणी, त्यांचे संनियंत्रण व प्रशासन पध्दतीत सुधारणा करण्यासाठी अनुदान आणि तांत्रिक सहाय्यासाठी हा निधी उपयोजिला जातो. |
| ४. | प्रारंभाची अंदाजित/प्रत्यक्ष तारीख | १९९०-९१ |
| ५. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | अव्याहत स्वरुपाचे काम आहे. |
| ६. | अ. आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | निधी कार्यान्वित झाल्यापासून प्राधिकरणाने ४६ प्रकल्पांना ₹ १५४१.१४ कोटी कर्ज व १५ अभ्यासांना ₹ १.८७ कोटी अनुदान मंजूर केलेले आहे. यापैकी ₹ १४५६.४८ कोटी इतके कर्ज व ₹ १.१६ कोटी इतके अनुदान माहे ऑक्टोबर, २०२४ पर्यंत वितरित केलेले आहे. चालू आर्थिक वर्षात या निधी अंतर्गत नवीन प्रकल्प प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याकरिता ५ कोटी रूपयांची सुधारीत तरतूद करण्यात येत आहे. |
| | ब. २०२५-२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | नवीन कर्ज प्रस्ताव प्राप्त होणे अपेक्षित आहे. याकरिता आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ₹ ५.०० कोटी रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **५.००** | **५.००** | **५.००** |

| | | |
|---|---|---|
| **८.** | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था: | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्था व इतर पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या संस्था |

## नियोजन विभाग

| **१.** | **योजनेचे नाव** | **मुंबई महानगर योजना -फिरता निधी** |
|---|---|---|
| २. | चालू योजना/नवीन योजना | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | केंद्र पुरस्कृत मुंबई महानगर योजना सन १९९२ ते २००५ या कालावधीमध्ये राबविण्यात आली. योजनेच्या वित्तीय आकृतिबंधानुसार एकूण नियव्ययाच्या ५०% रक्कम वित्तीय संस्थांकडून उभी करण्यात येत होती व उर्वरित ५०% रक्कम केंद्र शासन व राज्य शासन समप्रमाणात आपले अंशदान म्हणून जमा करत होते.<br>केंद्र शासनाच्या नागरी विकास मंत्रालयाने निर्गमित केलेल्या अंमलबजावणी मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेल्या प्रकल्प संचावर आधारित ₹ १७७७.८४ कोटी खर्चाच्या ६५ प्रकल्पांना केंद्र शासनाने नेमलेल्या मंजूरी समितीमार्फत डिसेंबर, २००५ अखेर मंजूरी देण्यात आली होती (यात २ अभ्यासांचा समावेश आहे). मुंबई, ठाणे, कल्याण, नवी मुंबई व भिवंडी-निजामपूर महानगरपालिका आणि बेस्ट, सिडको व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (म. रा. र. वि. म.) यांच्यामार्फत योजना राबविण्यात आली होती. मुं.म.प्र.वि. प्राधिकरण हे योजनेचे समन्वय अभिकरण (Nodal Agency) तसेच एक अंमलबजावणी संस्था म्हणून कार्यरत आहे. मुंबई महानगर योजना सन २००५ मध्ये बंद करण्यात आली आहे आणि यापूर्वी दिलेल्या कर्ज परतफेडीच्या रक्कमेतून फिरता निधी चालविण्यात येत आहे. |
| ४. | प्रारंभाची अंदाजित/प्रत्यक्ष तारीख | मुंबई महानगर योजना एप्रिल, १९९३,<br>महानगर योजना फिरता निधी, २००८-०९ |
| ५. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | महानगर योजना फिरता निधी - अव्याहत स्वरुपाचे काम आहे. |

| | | |
|---|---|---|
| ६. | अ. आतापर्यंत प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंत अपेक्षित कामगिरी | महानगर योजना फिरता निधीअंतर्गत ₹ ३११४.७३ कोटींच्या सहा प्रकल्पांना मंजूरी दिली आहे, ज्यामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा शहरी गरीबांसाठी मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) प्रकल्प, व सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांचा प्रकल्प, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका व कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या भुयारी गटार प्रकल्प तसेच या प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या मुंबई पारबंदर प्रकल्प रस्ता (Mumbai Trans Harbour Line - MTHL) व एमटीएचएल एक्स्टेंशन (MTHL Extension) (चिर्ले ते मुंबई पुणे एक्सप्रेस वे) प्रकल्पांचा समावेश आहे. त्या निधीपैकी ₹ २४८२.६० कोटी इतकी रक्कम ऑक्टोबर, २०२४ पर्यंत अंमलबजावणी संस्थांना वितरित केली आहे. |
| | ब. २०२५-२६ या वर्षासाठी कामगिरी उद्दिष्टे | सद्यस्थितीत प्रगतीपथावर असलेल्या दोन प्रकल्पांची अंमलबजावणी चालू असून त्यांचे संनियंत्रण करण्यात येईल. तसेच सध्याच्या सुरु असलेल्या प्रकल्पांवर अंमलबजावणी संस्थांच्या खर्चानुसार ₹ ६१२.९२ कोटी वर्ष २०२५-२६ मध्ये वितरित होणे अपेक्षित आहे. |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| ६१२.९२ | ६१२.९२ | ५.०० |

# इतर योजना

# नगर रचना विभाग

# नगर नियोजन विभाग

## भाडे तत्वावर निवासस्थाने शाखा

(ज)

अनुसूची

## इतर योजना

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | योजना | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **नगर रचना विभाग** | | |
| १ | नगर रचनेच्या दृष्टीकोनातून विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करणे | ५.०० | २०९ |
| २ | बँकबे पुन:प्रारण क्षेत्राच्या ब्लॉक ३ ते ६ साठी सुधारीत विकास आराखडा तयार करणे | २.०० | २१० |
| | **एकूण** | **७.००** | |
| | **नगर नियोजन** | | |
| १ | प्रादेशिक माहिती यंत्रणा/ नागरी वेध शाळा | ४८.०० | २११ |
| | **एकूण** | **४८.००** | |
| | **इतर योजना** | | |
| १ | भाडे तत्वावर निवासस्थाने शाखा | ३०.०० | २१२ |
| २ | रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टी पुनर्विकास (सल्लागार फी व भाडे) | ६००.०० | २१४ |
| ३ | स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारक टप्पा - २ | १००.०० | |
| | **एकूण** | **७३०.००** | |
| | **एकूण** | **७८५.००** | |

## नगर रचना विभाग – १ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | नगर रचनेच्या दृष्टीकोनातून विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करणे |
| २. | चालू योजना /नवीन योजना | : | नवीन योजना. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्ट | : | या योजनेअंतर्गत विविध प्रकलपांचा आराखडा तयार करणे आणि आराखडयानुसार प्रकल्पांची अंमलबजावणी करणे. तसेच इतर विभागांमार्फत सुरु असलेल्या प्रकल्पांमध्ये , नगर रचनेच्या दृष्टीकोनातून सहभागी होऊन माहिती देणे व मान्यता मिळालेल्या प्रकल्पांचा पाठपुरावा करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. |
| ४. | योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित / प्रत्यक्ष | : | मार्च, २०२१ |
| ५. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | : | अव्याहत योजना |
| ६. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | १) कलानगर उड्डाणपुल खालील पब्लिक प्लाझाचे कामकाज<br>२) जी-२० करिता तीन जागेवर/ ठिकाणी Welcome Signage<br>३) बी.के.सी. आर्ट प्लाझाचे कामकाज. |
| ६. | ब) २०२५-२०२६ ची प्रत्यक्ष कामगिरी / उद्दिष्टे | : | १. जी. ब्लॉक, बी.के.सी. येथे नगर रचनेच्या दृष्टीकोनातून प्रकल्प राबविणे.<br>२. मुंबई ट्रान्सं हर्बर लिंक मेन लॅड कोरीडॉर या प्रकल्पाबाबत प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करणे व सदर प्रकल्पाचा आराखडा तयार करणे प्रयोजन आहे.<br>३. कलानगर-वांद्रे आर्ट प्लाझा बाबतचे कामकाज.<br>४. नगर रचनेच्या दृष्टीकोनातून इतर प्रकल्पा राबविणे व प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता सल्लागारांची नियुक्ती करणे व इतर खर्च |

| ७. **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१.००** | **१.००** | **५.००** |
| ८) योजना राबविणारी संस्था : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | | |

## नगर रचना विभाग — २ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव. | : | बॅकबे पुन:प्रापण योजनेच्या ब्लॉक तीने ते सहा साठी विकास आराखडा तयार करणे. |
| २. | चालू योजना/नवीन योजना. | : | नवीन योजना. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये. | : | महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या १९६६ तरतूदींनुसार ब्लॉक तीन ते सहा साठी सुधारीत विकास आराखडा तयार करणे. |
| ४. | Work order/LOA Number and Date, Awarded cost of work, Revised cost of work, Name of Contractor/Consultant/ PMC, Payment done till date, Balance payable amount. | : | --- |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख. | : | शासन आदेश दिनांक २०/०३/२०२३ अनुसार. |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख/EOT Date | : | महाराष्ट्र प्रादेशिकर नगर रचना १९६६ अन्वये. |
| ७. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी. | : | शासन आदेश दिनांक २०/०३/२०२३ अनुसार या क्षेत्रासाठी सुधारीत विकास आराखडा प्राधिकरणाने तयार करायचा आहे. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची अद्दिष्टये. | : | सुधारीत विकास आराखडा तयार करुन शासनास मंजूरीसाठी सादर करणे. |

| ८. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **२५.००** | **३.००** | **२.००** |
| ९. | योजना राबविणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

# नगर नियोजन विभाग — १ (सर्वेक्षण व अभ्यास)

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | योजनेचे नाव | :: | 'प्रादेशिक माहिती यंत्रणा (Regional Information System)'/ नागरी वेधशाळाची रचना व मुंबई महानगर प्रदेशाकरिता विकास व अंमलबजावणी करण्यासाठी सिस्टिम इंटिग्रेटर (SI) ची निवड करणे करीता विनंती प्रस्ताव. |
| **२.** | चालू /नवीन योजना | :: | नवीन योजना. |
| **३.** | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | :: | १. प्रणालीच्या अंमलबजावणी चे प्राथमिक उद्दिष्ट आणि व्याप्ती हे शहरी नियोजन, पायाभूत सुविधा विकास, पर्यावरणीय देखरेख आणि सार्वजनिक सेवा वितरणासाठी MMRDA चे समर्थन आहे ज्या मध्ये भौगोलिक कव्हरेज, डेटाप्रकार (लोक संख्याशास्त्रीय, आर्थिक, पर्यावरण), जिओ-हबची निर्मिती समाविष्ट आहे. नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी निर्णय प्रक्रियेत मदत करणे.<br>२. प्रादेशिक माहिती प्रणाली (RIS) मध्ये निर्णय समर्थन साधने समाविष्ट आहेत जी प्रादेशिक सहयोग आणि निर्णय घेण्यास समर्थन देतील. |
| **४.** | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख | :: | १४ ऑक्टोबर २०२४ |
| **५.** | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | :: | ऑक्टोबर२०२५ |
| **६.** | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | :: | प्रकल्पासाठी लागणारे हार्डवेअर वितरण<br>हार्डवेअरची स्थापना<br>डेस्कटॉप साधने आणि वेब सॉफ्टवेअर साधने इतर |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | :: | अ) सामान्य GIS बेस नकाशाची निर्मिती<br>मूळ नकाशा पूर्ण करणे.<br>सुरक्षिततेसह सर्व समावेशक ऑडिट<br>CERT कडूनप्रमाणन, VAPT आणि लोड चाचणी सर्व अर्जांसाठी सर्टिन पॅनेल केलेली एजन्सी<br>कामाच्या व्याप्तीनुसार विकसित. गो-लाइव्ह |

| ७. | **अंदाजित खर्च-२०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
|---|---|---|
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **१.००** | **०.००** | **४८.००** |

## इतर योजना - २

## भाडे तत्वावरील घरे योजना

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | भाडे तत्वावरील घरे योजना |
| २. | चालू योजना/ नवीन योजना | : | चालू योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टे | : | मुंबई महानगर प्रदेशात राबविण्यात येणा-या भाडे तत्वावरील घरे योजनेचे प्रमुख उद्दिष्टे हे मुंबई महानगर प्रदेशामध्ये परवडतील अश्या घरांचा साठा उपलब्ध करुन देण्याचे आहे. गरीब लोकांसाठी घरांची वाढती मागणी आणि शासनाच्या गृहनिर्माण धोरणाच्या मूळ उद्देशाच्या अनुषंगाने, प्रोत्साहनपर चटईक्षेत्र निर्देशांकाच्या बदल्यात १६०/३२० चौ.फूट तळपृष्ठ क्षेत्राची स्वयंपूर्ण भाडे तत्वावरील घरे बांधून उपलब्ध होणार होती.<br>परंतु, शासनाने माहे, ऑगस्ट, २०१४ मध्ये नगरपालिका क्षेत्रामध्ये लागू असलेली 'भाडे तत्वावरील घरे योजना' परवडणारी घरे योजनेमध्ये रुपांतरीत केली आहे तर नागरी क्षेत्र -१ व २ येथे भाडे तत्वावरील घरे योजना ऑगस्ट २०१४ नंतर लागू असणार नाही. |
| ४. | प्रारंभाची तारीख अपेक्षित / प्रत्यक्ष | : | २००८-०९ |
| ५. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | : | भाडे तत्वावरील घरे योजनेंतर्गत मंजूरी दिलेल्या प्रकल्पांचे बांधकाम वेगवेगळया टप्प्यात सुरु असून सदर काम अव्याहत स्वरुपाचे आहे. |
| ६. | अ) आता पर्यंतची प्रत्यक्ष आणि मार्च, २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाने भाडे तत्वावरील घरांच्या ३८ प्रकल्पांना लोकेशन क्लिअरन्स दिलेले आहेत. ज्याद्वारे ३२० चौ.फूट तळपृष्ठ क्षेत्राची सुमारे ३१,७८६ भाडे तत्वावरील घरे तयार होणे अपेक्षित आहे. तसेच, ३८ भाडे तत्वावरील घरे योजनेद्वारे सुमारे १६० चौ. फूट तळपृष्ठ क्षेत्राची ५५१ व ३२० चौ.फूट तळपृष्ठाची ९२ व्यापारी सदनिका (दुकाने) तयार होणे अपेक्षित आहे. |
| | ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टे | : | • भाडे तत्वावरील घरे योजनेंतर्गत मंजूरी दिलेल्या प्रस्तावांना सुधारीत लोकेशन क्लिअरन्स आणि सुधारीत नकाशा मंजूरी देणे, संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून भाडे तत्वावरील घरे घटकास तसेच विक्री योग्य घटकास बांधकाम प्रमाणपत्र व भोगवटा पत्र प्राप्त करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे.<br>• भाडे तत्वावरील घरांचा ताबा घेणे व ठरवलेल्या धोरणाप्रमाणे वाटप करणे.<br>• भाडे तत्वावरील घरे योजनेंतर्गत तयार होणा-या इमारतींच्या बांधकामावर देखरेख ठेवण्यासाठी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अभियांत्रिकी विभागाबरोबर समन्वय साधणे.<br>• नगरपालिका क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी विविध संस्थांसोबत समन्वय साधणे.<br>• पायाभूत सुविधा शुल्काची मागणी करणे, त्याचा स्विकार व विनियम करणे. |

| **७.** | **अंदाजित खर्च २०२५-२६** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|
| | **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **तपशील** | **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **विकासकांकडून प्राप्त झालेल्या पायाभूत सुविधा शुल्क संबंधित महानगर पालिका / नगर पालिकांना हस्तांतरण** | **२४.०५** | **२.३५** | **१.७०** |
| **प्राधिकरणाच्या अर्थिक तरतूदितून पायाभूत सुविधा कामे.** | **००** | **२८.३०** | **२८.३०** |
| **एकूण** | **२४.०५** | **३०.६५** | **३०.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महावितरण (MSEDCL) व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी. |

## झोपडपट्टी पुनर्वसन योजना (SRA) - २

| | | |
|---|---|---|
| १. | योजनेचे नाव : | रमाबाई आंबेडकर नगर व कामराज नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना |
| २. | चालू योजना/नवीन योजना : | नवीन योजना |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्टये : | गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णया अन्वये मुंबई महानगर प्रदेशातील झोपडपट्टी पुर्नवसन योजना राबविताना काही झोपडपट्टी पुर्नवसन योजना या बृहन्मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको व म्हाडा इत्यादी अन्य महामंडळे/प्राधिकरणे/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत संयुक्त भागीदारी तत्वावर राबविण्यास काही अटी व शर्तीवर मान्यता दिली आहे.<br>शासनाच्या सदर निर्णयानुसार, मुंबई येथील भूकर क्रमांक १९४ (भाग) व १९५ (भाग) या जमिनीवरील रमाबाई आंबेडकर नगर व कामराज नगर झोपडपट्टीचा पुर्नविकास करण्याकरिता संयुक्त भागीदारी तत्वावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकासक म्हणून राबवित आहे.<br>प्राधिकरणाने दिनांक २७/०२/२०२४ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासोबत संयुक्त भागीदारी करार (JV) केला आहे. |
| ४. | Work order/LOA Number and Date, Awarded cost of work, Revised cost of work, Name of Contractor/Consultant/ PMC, Payment done till date, Balance payable amount. | या क्षेत्राकरीता प्राधिकरण हे विकासक म्हणून कार्यरत आहे. प्राधिकरणाने मे.संदीप शिक्रे व असोसिएशन यांची वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून दिनांक ०६/०८/२०२४ रोजीचा कार्यादेशाद्वारे नमणूक केली आहे. |
| ५. | प्रारंभाची अंदाजित / प्रत्यक्ष तारीख : | जानेवारी २०२४. |
| ६. | काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख : | साधारणत: ४ वर्ष |
| ७. | (अ) आतापर्यंत प्रत्यक्ष आणि मार्च, २०२५ पर्यंतची अपेक्षित कामगिरी : | (i) वास्तुविशारद, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व कंत्राटदार यांची नेमणूक करणे.<br>(ii) सदर योजना राबविण्याकरीता वित्त संस्था/बँक/ शासनाकडून निधी उपलब्ध करणे.<br>(iii) टप्पा-१ अंतर्गत पुनर्वसन सदनिकांचे कामाकरिता कंत्राटदाराची नेमणूक करणे |

| | | |
|---|---|---|
| | (ब) २०२५-२०२६ या वर्षासाठी कामगिरीची उद्दिष्टये : | (i) झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणासोबत संयुक्त भागीदारी करार करणे.<br>(ii) झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणासोबत सदर झोपडपट्टीचे सर्वेक्षण होऊन, पात्रता निश्चित झाल्यानंतर, पात्र झालेल्या झोपडपट्टीधारकांशी करार करणे.<br>(iii) सदर योजनांचा प्रस्तावित आरखडा बनविणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा.यांच्याकडून प्रस्तावित आराखडा मंजुरी मिळवणे.<br>(iv) पुर्नवसन सदनिकेचे बांधकाम करणे.<br>(v) सदर योजनेतून उपलब्ध होणारा विकास अधिकार / विक्री घटकातील जमीन खुल्या बाजारात विक्री करणे. |

| **८.** | **अंदाजित खर्च-२०२४-२५** | | **(रुपये कोटीत)** |
|---|---|---|---|

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२३-२०२४ मूळ अंदाज** | **२०२३-२०२४ (सुधारीत)** | **२०२४-२०२५ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| **६००.००** | **४४४.००** | **६००.००** |

| | | |
|---|---|---|
| ९. | योजनेची अंमलबजावणी करणारी संस्था : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

## इतर योजना - २

## महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | : | महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था (अनुदान) | | |
| २. | चालू / नवीन योजना | : | चालू योजना | | |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना | : | महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेला वांद्रे-कुर्ला समूहाच्या एच ब्लॉकमधील अंदाजे १५ हेक्टर खुले क्षेत्र करुन त्यावर संस्थेद्वारे महाराष्ट्र निसर्ग उद्यान विकसित करण्यात आलेले आहे. पर्यावरण संरक्षण, निसर्ग संवर्धन व निसर्ग शिक्षण हया विशिष्ट हेतूंच्या पूर्ततेसाठी प्रस्थापित करण्यात आलेल्या हया महाराष्ट्र निसर्ग उद्यानाच्या विकासाची तसेच संवर्धनाची कामे महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था करत आहे.<br>उद्यानाच्या पुढील विकासाच्या दृष्टीने व संस्थेची उदिष्टये (पर्यावरण संरक्षण व निसर्ग शिक्षण) साध्य करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.<br>टप्पा - १ : महाराष्ट्र निसर्ग उद्यान सोसायटीने प्रस्तावित केलेली कामे. | | |
| | | | १ | दृकश्राव्य सभागृहाचे नुतनीकरण | |
| | | | | अ) | सभागृहात इको सिस्टम बसवणे. |
| | | | | ब) | दृकश्राव्याची नविन अद्यावत यंत्रणा उभारणे. |
| | | | | क) | सभागृहात योग्य आसन व्यवस्था करणे. |
| | | | २ | महाराष्ट्र निसर्ग उद्यानाच्या टप्पा - ४ च्या नावाने ओळखल्या जाणा-या परिसरात | |
| | | | | अ) | संरक्षक भिंत उभारणे. |
| | | | | ब) | सुरक्षा रक्षकांच्या वाहनासाठी रस्ता तयार करणे व या भागात गस्तीसाठीचे रस्ते बनविणे. |
| | | | | क) | परिसरात निसर्ग फेरीसाठी पदभ्रमण मार्ग तयार करणे. |
| | | | | ड) | या भागात रात्रीच्या प्रकाशासाठी दिवे लावणे. |
| | | | ३ | निसर्ग उद्यानाची जुनी अंतर्गत पाणी पुरवठयाची यंत्रणा बदलणे. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ४ | निसर्ग उद्यानातील प्रसाधनगृहांची संख्या वाढविणे. | |
| | | | ५ | शैक्षणिक साधने :- | |
| | | | | अ) | शैक्षणिक तक्ते |
| | | | | ब) | कार्यालय व डेटा उपकरणे |
| | | | | क) | पुस्तके तयार करणे व प्रसिध्द करणे (माहिती पुस्तिका तसेच इतर प्रकारची) |
| | | | | ड) | फर्निचर |
| | | | | इ) | ग्रंथालय |
| | | | | फ) | ग्रंथ / वाड्मय |
| | | | | ग) | शैक्षणिक साधने |
| | | | | ह) | प्रयोगशाळा उपकरणे |
| | | | | ज) | दृकश्राव्य साधने |
| | | | | य) | माहिती फलक बसविणे |
| | | | | ल) | पार्कची साधने |
| | | | ६ | दुरुस्तीची व आवश्यक काम हाती घेण्यात येतील. | |

| **४.** | **अंदाजित खर्च २०२५-२६ (रुपये कोटीत)** | |
|---|---|---|
| **खालील वर्षाचा अंदाजित खर्च** | | |
| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
| **४.००** | **२.४८** | **५.२०** |

५. योजना अंमलबजावणी करणारी संस्था : महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था

## इतर योजना - ३

## उद्यान कक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | : | मुं.म.प्र. वि. प्राधिकरणाच्या अखत्यारित असलेल्या भूभावरील विविध मैदाने, उद्याने, रस्ता दुभाजके, वाहतुक बेटे, मोकळया जागा, पट्टा उद्याने, उड्डाण पुलाखालील भूभाग यांचे उद्यापनविषयक सुशोभिकरण विकास व परिरक्षण करणे, तसेच वृक्ष लागवड, संवर्धन, संरक्षण व तत्सम कामे. |
| २. | चालू /नवीन योजना | : | नवीन योजना. |
| ३. | योजनेचे संक्षिप्त वर्णन व योजना राबवून साध्य करावयाची उद्दिष्ट | : | मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाच्या अखत्यारित असलेल्या भूभागावरील विविध मैदाने, उद्याने, रस्ता दुभाजके, वाहतुक बेटे, मोकळया जागा, पट्टा उद्याने, उड्डाण पुलाखालील भूभाग यांचे उद्यापनविषयक सुशोभिकरण विकास व परिरक्षण करणे |
| ४. | अ) योजनेच्या प्रारंभाची तारीख अपेक्षित / प्रत्यक्ष | : | ०१ जानेवारी, २०२१<br>विकास कामे सुरु झाल्यापासून ३ महिने व परिरक्षण पुढील ३ वर्षे |
| ५. | अ) आतापर्यंतची प्रत्यक्ष कामगिरी व मार्च, २०२४ पर्यंतची अपेक्षित कामगिरी | : | सदर योजना नियोजनबध्द पध्दतीने अमलात आणण्यासाठी प्राधिकरणामार्फत नव्यानेच उद्यान कक्षाची स्थापना. तसेच प्रारंभिक पातळीवर बीकेसी व परिसरातील विविध उद्याने, वाहतुक बोटे, रस्ता दुभाजके यांचे उद्यान विषयक सौंदर्यीकरण प्रगती पथावर, व बीकेसी परिसरात वृक्ष संवर्धन व परिरक्षण करीता कंत्राटदाराची नियुक्ती (तसेच पुर्व द्रुतगती / पश्चिम द्रुतगती / मेट्रो, मोनो इ. ठिकाणी उद्यानविषयक सुशोभिकरण व परिरक्षण नियोजित) |
| ६. | २०२४-२०२५ साठी प्रत्यक्ष कामगिरी / उद्दिष्टे | : | उपरोक्त कार्यासाठी प्राधिकरणाच्या अखत्यारित असलेल्या मनोरंजन मैदाने व उद्याने, खेळाचे मैदाने, मोनो, मेट्रो प्रकल्पाखालील भुभाग, रस्ता दुभाजके, वाहतुक बेटे, मोगळया जागा, पट्टा उद्याने, उड्डाण पुलाखालील भुभाग यांचे उद्यान विषयक सुशोभिकरण विकास व परिरक्षण, रोपवाटिका विकसित रकणे, नवीन वृक्ष लागवड व त्याचे परिरक्षण, धोकादायक वृक्षांची छाटणी व मृत वृक्ष काढणे, उद्यान विषयक सुशोभिकरण व परिरक्षण व वृक्षलागवड व संवर्धन कामी कंत्राटदाराची नेमणूक करून प्रत्यक्ष काम सुरु करणे व इतर उद्यान विषयक कामे. |

**७. अंदाजित खर्च २०२५-२६** **(रुपये कोटीत)**

**खालील वर्षाचा अंदाजित खर्च**

| **२०२४-२०२५ मूळ अंदाज** | **२०२४-२०२५ (सुधारीत)** | **२०२५-२०२६ अपेक्षित अंदाज** |
|---|---|---|
| **९.००** | **२.५०** | **९.००** |

८ योजना राबविणारी संस्था : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण